७० वर्ष
निर्भीड पत्रकारीतेची

दैनिक
# संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

शुक्रवार, दि. ३१ जुलै २०२६

www.dainikesandhya.com   www.youtube.com/@sandhyalivenews

संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : २१६ | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ७ रूपये

## पुरंदर विमानतळासाठी ६ हजार कोटी रुपयांच्या कर्जास मंजुरी

### नवी मुंबई विमानतळ उभारणीच्या अनुभवाचा उपयोग करुन विमानतळ विकासाची कामे कालबद्ध पद्धतीने पूर्ण करावीत : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

मुंबई (दै. संध्या)



नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ उभारणीचा यशस्वी अनुभव लक्षात घेऊन महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी (एमएडीसी)ने पुरंदर आंतरराष्ट्रीय विमानतळाचा विकासही निश्चित कालमर्यादित पूर्ण करावा, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. शिर्डी आंतरराष्ट्रीय विमानतळावरील एअर कार्गो कॉम्प्लेक्ससह विविध पायाभूत सुविधा आगामी कुंभमेळा-२०२७ पूर्वी पूर्ण करण्यासाठी आवश्यक यंत्रणा बळकट करण्याचे निर्देशही त्यांनी दिले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीच्या (एमएडीसी) संचालक मंडळाची ९३ वी बैठक मंत्रालयात झाली. बैठकीस एमएडीसीचे कार्यकारी संचालक दीपक कपूर, परिवहन विभागाचे अपर मुख्य सचिव संजय सेठी, गृहनिर्माण विभागाचे अपर मुख्य सचिव असीम गुप्ता, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ. पी. गुप्ता, मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव लोकेश चंद्रा, प्रधान सचिव डॉ. श्रीकर परदेशी, उद्योग विभागाचे प्रधान सचिव पी. अन्बलगन, मुख्यमंत्र्यांचे गुंतवणूक सल्लागार कौस्तुभ धवसे, आयुक्त विपिन इटनकर तसेच विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, पुरंदर आंतरराष्ट्रीय विमानतळासाठी स्थापन करण्यात आलेल्या संयुक्त कंपनीमध्ये एमएडीसीसोबत सिडको, एमआयडीसी आणि पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (पीएमआरडीए) यांचा सहभाग असून या महत्त्वाकांक्षी प्रकल्पासाठी हडकोमार्फत ६ हजार कोटी रुपयांच्या कर्जास मंजुरी देण्यात आली आहे. त्यामुळे प्रकल्पाच्या अंमलबजावणीला गती देत सर्व कामे नियोजित वेळेत पूर्ण करावीत. कुंभमेळा-२०२७ दरम्यान देश-विदेशातून मोठ्या संख्येने भाविक शिर्डीत येणार असून चार्टर्ड विमानांचीही मोठ्या प्रमाणात ये-जा अपेक्षित आहे. त्यामुळे शिर्डी विमानतळावरील टॅक्सीवे, एप्रन, एअर कार्गो कॉम्प्लेक्स तसेच इतर आवश्यक सुविधांची कामे तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले. राज्यातील विमानतळांच्या विकासाला वेग एमएडीसीमार्फत नांदेड, नाशिक, जळगाव, कोल्हापूर, सिंधुदुर्ग, गोंदिया आणि अमरावती या सात विमानतळांचा विकास करण्यात येत असून रत्नागिरी विमानतळाचे काम अंतिम टप्प्यात आहे. बारामती विमानतळाच्या आधुनिकीकरणासाठी ६४ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असून लातूर विमानतळासाठी ३८ कोटी रुपये खर्च करण्यात येणार आहेत. कराड विमानतळाच्या १,७०० मीटर धावपट्टीच्या विस्ताराची कार्यवाही सुरू असून भविष्यात येथे नाईट लँडिंगची सुविधा उपलब्ध करण्याचे नियोजन आहे. तसेच चंद्रपूर येथील फ्लाईंग क्लब तसेच धाराशिव आणि यवतमाळ येथील विमानतळ करण्याबाबतही बैठकीत चर्चा झाली. नांदेड विमानतळावर आधुनिक टर्मिनल नांदेड विमानतळावर अत्याधुनिक प्रवासी टर्मिनल उभारण्यात येणार असून येथे प्रवासी संख्येत सातत्याने वाढ होत आहे. सध्या नऊ विमानसेवा उपलब्ध असून चंदीगड आणि अमृतसर येथून नांदेडसाठी थेट विमानसेवा सुरू करण्यासाठी प्रयत्न करण्यात येणार असल्याची माहिती मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिली. एमएडीसीकडून मिहान परिसरात विविध प्रकल्पांना चालना मिहान परिसरात एमएडीसीच्या माध्यमातून विविध विकास प्रकल्प राबविण्यात येत आहेत.

## सशक्त समाजाच्या निर्मितीसाठी ‘ड्रग फ्री मुंबई’ अभियान महत्त्वपूर्ण : नरेंद्र मोदी

मुंबई (दै. संध्या)



■ प्रधानमंत्री नरेंद्र मोदींकडून 'ड्रग फ्री मुंबई' अभियानाबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे अभिनंदन

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते ‘ड्रग फ्री मुंबई’ अभियानाचा शुभारंभ करण्यात आला. या अभियानाच्या प्रारंभाबद्दल प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे अभिनंदन केले आहे. महाराष्ट्र शासनाच्या या उपक्रमाचे स्वागत करत हे अभियान नशामुक्त, जागरूक आणि सशक्त समाजाच्या निर्मितीसाठी महत्त्वपूर्ण पाऊल असल्याचे त्यांनी नमूद केले. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी पाठविलेल्या संदेशात म्हटले आहे की, नशा ही समाजाच्या आरोग्य, सुरक्षितता, शांतता आणि विकाससमोरील गंभीर समस्या असून, त्याचा व्यक्तीच्या निर्णयक्षमतेवर, आत्मविश्वासावर आणि जीवनाच्या दिशेवर प्रतिकूल परिणाम होतो. मादक पदार्थांचे व्यसन हे विशेषतः तरुणांच्या भविष्याला, त्यांच्या प्रतिभेला आणि संधींना मोठा धोका निर्माण करणारे आहे. त्यामुळे नशामुक्त समाजाच्या उभारणीसाठी जनजागृतीबरोबरच कुटुंबातील संस्कार, समाजाची सामूहिक जबाबदारी आणि विविध संस्थांचे समन्वित प्रयत्न आवश्यक आहेत. देशाच्या विकासात युवकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असल्याचे नमूद करत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सांगितले की, विकसित भारताच्या निर्मितीची सर्वात मोठी ताकद ही युवकांची स्वप्ने, संकल्प, ऊर्जा आणि सकारात्मक विचारसरणी आहे. तरुणांनी शिस्त, आत्मविश्वास आणि निरोगी जीवनमूल्ये स्वीकारल्यास ते स्वतःच्या प्रगतीबरोबरच राष्ट्राच्या विकासातही मोलाचे योगदान देऊ शकतात, असे त्यांनी म्हटले. ‘नशामुक्त भारत’ या राष्ट्रीय संकल्पाच्या पूर्ततेसाठी देशभरात जनजागृती, जनसहभाग, समुपदेशन सेवा आणि पुनर्वसन यांसारखे विविध उपक्रम सातत्याने राबविण्यात येत असल्याचे प्रधानमंत्र्यांनी नमूद केले.

## नेपाळमध्ये जातीय हिंसाचार उसळला, २ लोकांचा मृत्यू

मुंबई (दै. संध्या)



■ अनेक जिल्ह्यांमध्ये संचारबंदी लागू; कावड यात्रेदरम्यान डीजे वाजवण्यावरून वाद झाला होता

नेपाळच्या सुनसरी जिल्ह्यात रविवार रात्री कावड यात्रेदरम्यान मोठ्या आवाजात डीजे वाजवण्यावरून सुरू झालेला एक किरकोळ वाद आता मोठ्या जातीय तणावात बदलला आहे. सुरुवातीला हे प्रकरण दोन समुदायांमधील शाब्दिक वादापुरते मर्यादित होते, पण बघता बघता हिंसाचार पसरला आणि परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी पोलिसांना गोळीबार करावा लागला. या हिंसाचारात आतापर्यंत दोन लोकांचा मृत्यू झाला आहे, तर अनेक लोक जखमी झाले आहेत. घटनेनंतर संपूर्ण तराई-मधेश प्रदेशात निदर्शने सुरू झाली. निदर्शनादरम्यान सिराहामध्ये आणखी एका तरुणाच्या मृत्यूनंतर तणाव आणखी वाढला. परिस्थिती पाहून प्रशासनाने सिराहा, धनुषासह अनेक जिल्ह्यांमध्ये पुढील आदेशापर्यंत संचारबंदी लागू केली आहे.

भाविक कोसी बॅरेजमधून पाणी घेऊन परत येत होते आणि त्यांच्यासोबत डीजे व लाऊडस्पीकरही वाजत होते. याच दरम्यान दुसऱ्या समुदायातील काही लोकांनी मोठ्या आवाजात वाजत असलेल्या संगीतावर आक्षेप घेतला. सुरुवातीला दोन्ही गटांमध्ये वाद झाला, नंतर धक्काबुक्की सुरू झाली आणि बघता बघता प्रकरण हिंसक हाणामारीत बदलले. सुरुवातीला स्थानिक पोलीस घटनास्थळी पोहोचले आणि दोन्ही गटांना शांत करण्याचा प्रयत्न केला. पण थोड्याच वेळात दोन्ही समुदायांचे आणखी लोक घटनास्थळी पोहोचले. अनेक लोकांच्या हातात लाठी, बांबू, दगड आणि भाले यांसारखी शस्त्रे होती. यानंतर दोन्ही बाजूंनी दगडफेक सुरू झाली. दगडफेकीत 8 पोलीस कर्मचारी, ज्यात एक इन्स्पेक्टरही होता, जखमी झाले. परिस्थिती बिघडल्यावर आसपासच्या पोलीस ठाण्यांमधून आणि सशस्त्र पोलीस दलाच्या (APF) अतिरिक्त तुकड्यांना बोलावण्यात आले.

## महिला व बालकांच्या सर्वांगीण विकासावर भर : आदिती तटकरे

### संयुक्त राष्ट्रसंघाशी शाश्वत विकास ध्येय गाठण्याचे निर्देश

मुंबई (दै. संध्या)



राज्यातील प्रत्येक नागरिकाला उत्तम आरोग्य, पोषण, सुरक्षित मातृत्व, बालकांचा सर्वांगीण विकास आणि महिलांचे सक्षमीकरण सुनिश्चित करण्यावर भर देण्यात येत असून सर्व संबंधित विभागांनी परस्पर समन्वयाने कार्य करून शाश्वत विकास ध्येयांची विहित कालमर्यादेत प्रभावी पूर्तता करण्याचे निर्देश महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिले. महिला व बालविकास विभागामार्फत मंत्रालयात शाश्वत विकास ध्येयांसंदर्भात आढावा बैठक झाली. यावेळी महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे म्हणाल्या, सन २०३० पर्यंत संयुक्त राष्ट्र संघानी निश्चित केलेली शाश्वत विकास ध्येये प्रभावीपणे साध्य करण्यासाठी सर्व विभागांनी नियोजनबद्ध, परिणामकारक आणि समन्वयात्मक पद्धतीने काम करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत.

या पार्श्वभूमीवर योजनांची फलनिष्पत्ती वाढविण्यासाठी नियमित मूल्यमापन, प्रभावी अंमलबजावणी आणि परिणामाधारित कार्यपद्धतीवर विशेष भर देण्याचे निर्देश महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिले. महिला व बालविकास विभागाचे सचिव डॉ. अनुपकुमार यादव उपस्थित होते. एकात्मिक बाल विकास सेवा योजना, नवी मुंबई यांच्या आयुक्त श्रीमती माधवी सरदेशमुख आणि महिला व बालविकास आयुक्त श्रीमती वर्षा लड्डा या दूरदृश्यप्रणालीद्वारे सहभागी झाल्या. बैठकीत महिला व बालविकास तसेच सार्वजनिक आरोग्य विभागाशी संबंधित शाश्वत विकास ध्येयांतील विविध निर्देशकांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. राज्याची सद्यस्थिती, राष्ट्रीय स्तरावरील क्रमवारी, विविध योजनांच्या अंमलबजावणीतील प्रगती तसेच सन २०३० पर्यंत निर्धारित उद्दिष्टे साध्य करण्यासाठी आवश्यक उपाययोजनांवर सखोल चर्चा करण्यात आली.

महिला व बालविकास विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीमुळे अनेक महत्त्वाच्या निर्देशकांमध्ये महाराष्ट्राने उल्लेखनीय प्रगती नोंदविली आहे. प्रधानमंत्री मातृ वंदना योजनेच्या लाभार्थी संख्येत लक्षणीय वाढ झाली असून, गर्भवती महिलांमधील ॲनिमियाचे प्रमाण कमी करण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या उपाययोजनांचे सकारात्मक परिणाम दिसून येत आहेत. तसेच पाच वर्षांखालील बालकांमधील कुपोषण, कमी वजन आणि बुटकेपणा कमी करण्यासाठी राबविण्यात आलेल्या पोषणविषयक उपक्रमांमुळे समाधानकारक सुधारणा झाल्याचे अद्ययावत आकडेवारीवरून स्पष्ट झाले असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले. संस्थात्मक प्रसूती, माता मृत्यू दर आणि पाच वर्षांखालील बालमृत्यू दर या आरोग्यविषयक निर्देशकांमध्ये राज्याने शाश्वत विकास ध्येयांच्या अनुषंगाने समाधानकारक कामगिरी कायम राखली आहे. याशिवाय महिलांच्या पोषणस्थितीत सुधारणा, कुटुंबातील निर्णयप्रक्रियेत महिलांचा वाढता सहभाग आणि मोबाईल फोन वापरणाऱ्या महिलांच्या प्रमाणात झालेली वाढ ही महिला सक्षमीकरणाच्या दिशेने होत असलेल्या सकारात्मक प्रगतीची महत्त्वाची निदर्शके असल्याची माहिती यावेळी देण्यात आली. आगामी कृती आराखड्याच्या अनुषंगाने सर्व विभागांनी प्रलंबित माहिती विहित मुदतीत अद्ययावत करावी, विविध निर्देशकांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या राज्यांच्या सर्वोत्तम कार्यपद्धतींचा अभ्यास करून त्यांचा अवलंब करावा, तसेच व्यवस्थापन माहिती प्रणाली (MIS) अधिक सक्षम करून योजनांचे रिअल-टाईम निरीक्षण करण्यावर भर द्यावा, असे निर्देश देण्यात आले. आगामी अर्थसंकल्पीय नियोजन हे शाश्वत विकास ध्येये आणि ‘विकसित महाराष्ट्र २०४७’ या राज्याच्या विकासदृष्टीशी सुसंगत ठेवण्यावर विशेष भर देण्यात आला. प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या वार्षिक गोपनीय अहवालात (APAR) शाश्वत विकास ध्येयांशी संबंधित कामगिरीचा महत्त्वाचा कार्यप्रदर्शन निर्देशक (KPI) म्हणून समावेश करण्याबरोबरच आकांक्षित जिल्हे आणि आकांक्षित तालुक्यांच्या प्रगतीवर विशेष लक्ष केंद्रित करण्याचेही निश्चित करण्यात आले.

क्युआर स्कॅन करून दै. संध्याच्या युट्युब चॅनलला सबस्क्राईब करा
SUBSCRIBE
e-paper www.sandhyaepaper.com

ढिंग-टांग




### दिल्लीतील विद्यार्थी आंदोलनानंतर नवा राजकीय ट्विस्ट!

## पवारांच्या राष्ट्रीय प्रवक्त्याच्या घरी दिपकेंचा आश्रय

मुंबई (दै. संध्या)



दिल्लीतील जंतर-मंतरवर रंगलेल्या विद्यार्थी आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर एक खळबळजनक राजकीय घडामोड समोर आली आहे. 'कॉकरोच जनता पार्टी'चे संस्थापक अभिजीत दिपके हे आंदोलन काळात राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे राष्ट्रीय प्रवक्ते अनिश गवांडे यांच्या दिल्लीतील निवासस्थानी मुक्कामाला होते, अशी माहिती उघडकीस आल्याने राजकीय गोटात तर्कवितर्कांना उधाण आले आहे. दरम्यान, या प्रकरणी अभिजित दिपके यांना आज छत्रपती संभाजीनगरमध्ये पत्रकारांनी विचारले असता, अनिश माझा मित्र असल्याचे सांगितले. या मागे कुठलाही राजकीय हेतू नसल्याचे स्पष्टीकरणही दिले. मात्र, ऐन आंदोलनकाळात ही घडामोड आता आंदोलन यशस्वी झाल्यानंतर चांगलीच चर्चेत आली आहे. कॉकरोच पार्टीचे संस्थापक अभिजित दिपके यांनी नीट पेपरफुटीप्रकरणी आंदोलन सुरू केले. शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी केली. या आंदोलनाला पाठिंबा देत सोनम वांगचुक ही मैदानात उतरले. वांगचुक यांनी 26 दिवसांनी मागण्या मान्य झाल्याचे सांगत उपोषण सोडले. मात्र, दिपकेंनी आपला लढा सुरूच ठेवला. या दरम्यान शरद पवार यांनी दिपकेंची भेट घेतली. तर दुसऱ्याच दिवशी शरद पवारांनी नरेंद्र मोदी यांचीही भेट घेतल्याचे समोर आले. या गाठीभेटीमुळे संपूर्ण घडामोडींमागे काय रणनीती होती, याबद्दल चर्चा रंगू लागल्या आहेत. महाराष्ट्रातील पुरोगामी वर्तुळातील अनेक विचारवंतांनी अभिजित दिपके आणि सोनम वांगचुक यांच्या दिल्लीतील आंदोलनावर संशय व्यक्त केला होता. हे दोघेही भाजप आणि विशेषतः राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे हस्तक असल्याचे म्हटले होते. महाराष्ट्रातील विचारवंत आणि ज्येष्ठ पत्रकार राजू परुळेकर यांनी याबद्दल वारंवार आपले मत मांडले होते. यू-ट्यूब चॅनलला मुलाखती देत आपली सविस्तर भूमिका स्पष्ट केली होती. सोनम वांगचुक यांनी उपोषण मागे घेतले. त्यानंतरही दिपकेंचे आंदोलन सुरू राहिले आणि शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा दिला. त्यामुळे दिपकेंच्या भूमिकेवर घेतला गेलेला संशय आणि चर्चाही थंडावल्या होत्या. दुसरीकडे शरद पवार आणि नरेंद्र मोदी यांचे सौख्य साऱ्यांना माहितीच आहे. खरे तर 2024 च्या लोकसभा निवडणुकांती पंतप्रधान नरेंद्र मोदींनी शरद पवारांचे नाव न घेता त्यांना राजकीय स्थैर्याला हानी पोहचवणारी 'भटकती आत्मा' म्हटले होते. तर 2014 च्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकांदरम्यान मोदींनी शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसला 'नॅचरली करप्ट पार्टी' (नैसर्गिकरित्या भ्रष्ट पक्ष) म्हणत जनतेला 'काका-पुतण्या'च्या (शरद पवार आणि अजित पवार) जोडीला सत्तेतून खाली खेचण्याचे आवाहन केले होते. त्यानंतरही शरद पवार हे राजकारण वेगळ्या ठिकाणी आणि वैयक्तिक संबंध वेगळ्या ठिकाणी म्हणत मोदींच्या जवळ आल्याचे अनेकदा दिसले. दिपकेंचा तो मुक्कामही यामुळेच चर्चेत राहिला आहे.

नरेंद्र मोदींनी 2015 मध्ये बारामती दौऱ्यादरम्यान सार्वजनिकरित्या शरद पवारांच्या दीर्घ राजकीय अनुभवाची प्रशंसा करत पवारांनी राजकारणाच्या सुरुवातीच्या दिवसांत हात धरून चालायला शिकवल्याचे म्हटले होते. राजकीय मतभेद असूनही मोदी सरकारने 2017 मध्ये शरद पवारांना देशातील दुसऱ्या सर्वोच्च नागरी सन्मान पद्मविभूषणने सन्मानित केले होते. शरद पवार हे देशातील मोजक्या विरोधी नेत्यांपैकी एक मानले जातात, ज्यांचा पंतप्रधानांशी थेट संपर्क आहे. ते राष्ट्रीय मुद्द्यांवर किंवा महाराष्ट्रातील प्रशासकीय संकटांवर अनेकदा पंतप्रधान मोदींशी वन-टू-वन भेट घेतात.

## नवे शिक्षणमंत्रीही विचित्रच, बलात्काऱ्यांचे समर्थन करतात

### अभिजित दिपकेंचा संताप, अमित शहांच्या राजीनाम्याची केली मागणी



**अमित शहांच्या राजीनाम्याची मागणी**

आंदोलनांना बाहेरून फंडिंग येत असल्याच्या आरोपांवर बोलताना दिपके यांनी थेट केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनाच लक्ष्य केले. जर आम्हाला खरोखरच बाहेरून फंडिंग येत असेल, तर हे गृहमंत्री अमित शहांचे मोठे अपयश आहे आणि त्यासाठी त्यांनी त्वरित राजीनामा दिला पाहिजे, अशी मागणी त्यांनी केली. तसेच २० तारखेला विद्यार्थ्यांवर झालेल्या लाठीचार्जचे आदेशही अमित शहांचेच असतील, असा संशय त्यांनी व्यक्त केला.

मुंबई (दै. संध्या)

विद्यार्थी आंदोलनाचे नेतृत्व करणारे अभिजित दिपके यांनी छत्रपती संभाजीनगर येथील निवासस्थानी पत्रकार परिषद घेत केंद्र सरकार, भाजप आणि पोलिस प्रशासनावर गंभीर आरोप केले. विद्यार्थ्यांवरील लाठीमार, दगडफेक आणि पोलिसांच्या कारवाईबाबत पूर्वनियोजन करण्यात आल्याचा दावा करत त्यांनी या संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी केली. रामदेव बाबा यांच्यावरही दिपके यांनी निशाणा साधला.

अभिजीत दिपके म्हणाले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि महात्मा गांधी यांचा फोटो घेऊन चालणे, जय भीमचे नारे देणे आणि लोकशाहीसाठी रस्त्यावर उतरणे म्हणजे जर संस्कृती बदनाम करणे असेल, तर रामदेव बाबांना सांगा की होय, आम्ही संस्कृती बदनाम करतोय, ते म्हणाले, रामदेव बाबांनी आमच्यावर बोलण्यापेक्षा त्यांच्या पतंजलीच्या उत्पादनांवर लक्ष द्यावे.

सर्वोच्च न्यायालयानेही त्यांच्या उत्पादनांवरून फसवणूक होत असल्याचे म्हटले आहे. देश आणि संस्कृती आम्ही झेन झी पिढी सांभाळून घेऊ, तुम्ही तुमच्या उत्पादनांकडे लक्ष द्या, नाहीतर ती बंद पडतील. तसेच, इथून पुढे शेतकरी आणि त्यांच्या नेत्यांना जेव्हा गरज पडेल, तेव्हा आम्ही त्यांच्या पाठीशी उभे राहू, अशी ग्वाही त्यांनी दिली.

आंदोलनाबाबत बोलताना दिपके यांनी पोलिसांच्या भूमिकेवर मोठे प्रश्नचिन्ह उभे केले. त्यांनी आरोप केला की, १९ तारखेच्या रात्री आणि २० च्या सकाळी मी स्वतः पाहिले आहे की, पोलिसांनी दगडांनी भरलेला एक ट्रक आणि आधीच तुटलेली एक व्हॅन तिथे आणून ठेवली होती. दगडफेकीचे प्लॅनिंग पोलिस आणि भाजपने मिळून केले होते. याप्रकरणी आपण थेट डीसीपी यांची भेट घेऊन त्यांना जाब विचारल्याचेही ते म्हणाले. पोलिसांनी संविधानाचे पालन करावे. जर त्यांना भाजपचेच समर्थन करायचे असेल, तर त्यांनी थेट भाजपच्या मुख्यालयासमोर उभे राहून 'मै भी चौकीदार' म्हणावे," असा टोला त्यांनी हाणला.

केंद्र सरकार आणि नव्या शिक्षणमंत्र्यांवरही दीपकेंनी नाराजी व्यक्त केली. देशाचे शिक्षणमंत्री आता बलात्काऱ्यांचे स्वागत आणि कौतुक करत आहेत. प्रधान यांना हटवून सरकारने अजून एक विचित्र माणूस तिथे बसवून ठेवला आहे. हे सरकार बलात्काऱ्यांचे समर्थन करणारे आहे, अशी टीका त्यांनी केली. सध्या झेन झी पिढीला जाणूनबुजून ट्रोल केले जात असल्याचेही ते म्हणाले.

राज्यातील राजकीय घडामोडींवर भाष्य करताना दिपके यांनी भाजपवर केंद्रीय यंत्रणांच्या गैरवापराचा आरोप केला. राज्यात जी शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस फोडली गेली, ती केवळ सीबीआय आणि ईडी च्या दबावाखाली आणि दमावरच फोडली गेली आहे, असा दावा त्यांनी या पत्रकार परिषदेत केला.

# संपादकीय

## आपल्या मुलांनी असा काय अपराध केला आहे?

जगासमोरील सर्वांत मोठे संकट कोणते, असा प्रश्न विचारला तर युद्ध, दहशतवाद, आर्थिक मंदी किंवा महामारी अशी उत्तरे मिळतील. मात्र, यापैकी कोणतेही संकट आज हवामान बदलाइतके व्यापक आणि दीर्घकालीन नाही. विशेष म्हणजे या संकटाचा सर्वाधिक फटका बसत आहे तो अशा वर्गाला, ज्याचा त्यात काहीही दोष नाही, तो म्हणजे मुलांना. दि. १६ जून २०२६ रोजी युनिसेफने प्रसिद्ध केलेला Children's Climate Risk Report 2026 हा अहवाल या वास्तवावर कठोर प्रकाश टाकतो. या अहवालानुसार, जगातील जवळपास प्रत्येक मूल किमान एका हवामानविषयक धोक्याचा सामना करत आहे. तब्बल १८० कोटी मुलांवर दुष्काळाचे सावट आहे, १५० कोटी मुले उष्णतेच्या लाटांच्या धोक्यात आहेत, तर १२० कोटी मुले अतितीव्र उष्णतेच्या झळा सहन करत आहेत. सुमारे ११० कोटी मुले एकाचवेळी तीन किंवा अधिक हवामानविषयक धोक्यांच्या विळख्यात अडकली आहेत. ही आकडेवारी केवळ पर्यावरणीय संकट दर्शवत नाही, ती मानवजातीच्या भवितव्याची धोक्याची घंटा आहे. युनिसेफच्या डेटानुसार, भारतातील सुमारे ३९.२ कोटी मुले, म्हणजेच १८ वर्षांखालील जवळपास ९२ टक्के मुले, अतितीव्र उष्णतेच्या धोक्याला सामोरी जात आहेत. सुमारे ८.९ कोटी मुले उष्णतेच्या लाटांच्या प्रभावाखाली आहेत. जगातील सर्वाधिक युवा लोकसंख्या असलेल्या देशासाठी ही आकडेवारी भविष्यातील गंभीर इशारा आहे. हवामान बदलाचा सर्वाधिक परिणाम आरोग्य, पोषण, शिक्षण आणि मानसिक विकासावर होणार असेल तर त्याची किंमत भारतातील युवापिढीला मोजावी लागणार आहे. या संदर्भात महाराष्ट्राचे वास्तव अधिक अस्वस्थ करणारे आहे. विदर्भ आणि मराठवाड्यातील दुष्काळ, कोकणातील अतिवृष्टी, मुंबई-ठाणे-नवी मुंबईतील पूर, तर राज्यभर वाढणाऱ्या उष्णतेच्या लाटा हे आता अपवाद राहिलेले नाहीत. मात्र, या सर्व संकटांचा सर्वात कमी चर्चिला जाणारा परिणाम म्हणजे कुपोषण. राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षण-५ (NFHS-5, २०१९-२१) नुसार महाराष्ट्रातील पाच वर्षांखालील ३५.२ टक्के मुले खुंटलेल्या वाढीची, २५.६ टक्के मुले तीव्र कुपोषणाची आणि ३६.१ टक्के मुले कमी वजनाची होती. म्हणजेच राज्यातील प्रत्येक तीन मुलांपैकी एक मूल कुपोषणाच्या छायेत वाढत होते. आर्थिकदृष्ट्या देशातील सर्वात सक्षम राज्यांपैकी एक असलेल्या महाराष्ट्रासाठी ही आकडेवारी लज्जास्पदच म्हणावी लागेल. हवामान बदल आणि कुपोषण यांचा संबंध आता वैज्ञानिकदृष्ट्याही स्पष्ट झाला आहे. दुष्काळामुळे अन्नधान्य उत्पादन घटते, पावसाचे चक्र विस्कळीत होते, महागाई वाढते, गरीब कुटुंबांच्या ताटातील पोषणमूल्य कमी होते आणि सर्वात मोठी किंमत बालकांना मोजावी लागते. पाणीटंचाई, दूषित पाणी आणि संसर्गजन्य आजार यामुळे कुपोषणाचे दुष्टचक्र अधिकच गडद होते. त्यामुळे हवामान बदल हा पर्यावरणाचा नव्हे, तर अन्नसुरक्षा आणि सार्वजनिक आरोग्याचा प्रश्न आहे. याहूनही वेदनादायक बाब म्हणजे आपण अजूनही या प्रश्नाकडे आवश्यक त्या संवेदनशीलतेने पाहात नाही. पालघर, नंदुरबार, गडचिरोली, धुळे-जळगाव, अमरावती, यवतमाळ आणि इतर आदिवासीबहुल जिल्ह्यांमध्ये कुपोषण अजूनही वास्तव आहे. परंतु, ही समस्या तेवढ्यावरच थांबत नाही. मुंबई, ठाणे, नवी मुंबई, पुणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर आणि नागपूरसारख्या शहरांतील झोपडपट्ट्यांमध्ये राहणाऱ्या स्थलांतरित कुटुंबांतील हजारो मुलांनाही पुरेशा पोषणापासून वंचित राहावे लागते. एका बाजूला विकासाची गगनचुंबी इमारत उभी राहात असताना दुसऱ्या बाजूला कुपोषण वाढत असेल, तर त्या विकासाचा अर्थ नव्याने तपासण्याची वेळ आली आहे. यंदाचा उन्हाळा गेल्या अनेक वर्षांतील सर्वांत उष्ण उन्हाळा होता. त्यातच विविध विकास प्रकल्पांमुळे होणारी वृक्षतोड, नद्या-समुद्रात होणारा भराव विपरित परिणाम करत आहेत. यावर्षीचा पावसाळा लांबल्याने खरिपाचा हंगाम लांबणीवर गेला. त्यामुळे अन्नधान्य टंचाईचे संभाव्य संकट घोंगावत आहे.

## संस्कृत सुभाषित

कारे नाठविशी कृपाळू देवासी । पोशितो जगासी एकलाचि

अर्थ : संकुचित बुद्धी व स्वार्थ माणसाला खरे सुख कधीच देत नाही. उदार मन आणि त्याग हाच आपल्या संस्कृतीचा स्थायीभाव आहे.

## गुरु वचन

### मन करारे प्रसन्न सर्व सिद्धीचे कारण

एक खूप प्राचीन कथा आहे. श्वेतकी नावाचा एक राजा होता. तो खूप यज्ञ करत असे. त्यामुळे त्याची खूप ख्याती झाली होती. त्याने एकदा सलग बारा वर्षे अग्नीदेवाला अखंड शुद्ध तुपाची आहुती दिल्याने अग्नी देवाची पाचनशक्ती वाढली. याचा वाईट परिणाम असा झाला, की अग्नीदेवतेचे तेज कमी झाले आणि तो मंद पडला मग त्याने ब्रह्मदेवाकडे धाव घेतली आणि त्यांना तेज परत मिळविण्याचा मार्ग विचारला. तेव्हा ब्रह्मदेवाने त्याला खांडव येथील जंगल जाळून टाकण्याचा सल्ला दिला. त्याने तसे केले, परंतु इंद्रदेवाने पाणी टाकून ती आग विझवली. मग त्याने कृष्ण आणि अर्जुनाला आपल्या साह्यतेचे आवाहन केले.

अर्जुनाने अग्नी देवाला विनंती केली, की मला देवेंद्राशी युद्ध करण्यासाठी तू शस्त्रे पुरवायची. अग्नी देवाने त्याला गांडीव धनुष्य आणि दिव्यास्त्र दिले, तर कृष्णाला एक चक्र भेट दिले. यानंतर अग्नी देवाने आपल्या शक्तीद्वारे पुन्हा खांडव जंगल जाळण्यास सुरुवात केली.

वाढत्या आगीने पृथ्वीवर मात्र हाहाकार माजला. त्यावर परत देवेंद्राने आपल्या शक्तीने पाऊस पाडण्यास सुरुवात केली, परंतु अर्जुन आणि कृष्णाने पावसाला रोखले. यावेळी इंद्राच्या मदतीला देव, असुर, यक्ष, राक्षस, सर्प असे अनेक जण धावून आले, परंतु या साऱ्यांचा कृष्ण आणि अर्जुनापुढे निभाव लागला नाही.

अखेर अग्नी देवतेने आपली आग पसरवल्याने त्यांची तब्बेत पूर्ववत झाली. आणि त्यांच्या चेहऱ्यावर तेज परतले. तात्पर्य इतकेच की, जर शरीर सुखी असेल, तर मनही प्रसन्न राहते. आणि मन प्रसन्न तर चेहऱ्यावर आपोआप तेज दिसते.

तुम्हाला ताजेतवाने दिसायचे असेल तर तुम्हाला आपले शरीर तर स्वस्थ ठेवायलाच हवे. परंतु, याच सोबत आपले मनही प्रसन्न ठेवणे गरजेचे आहे.

## उपदेशकथा

### ईश्वरदर्शनाची साधना

एक संसारी साधू होता. त्याच्याकडे एक खरा जिज्ञासू आला आणि म्हणाला, महाराज! आपल्याला ईश्वरदर्शन झाले आहे काय? साधू म्हणाला, ते मला माहीत नाही. पण ईश्वर माझ्याबरोबर असतो खरा. जिज्ञासू बोलला, आपणच काय साधना करता? साधूने उत्तर दिले, भूक लागली की मी खातो, झोप आली की मी निजतो. स्नान झाले की मी पांडुरंगाची पूजा करतो हीच माझी साधना जिज्ञासू म्हणाला, अहो या गोष्टी तर सगळे करतात त्यावर तो साधू ठसक्याने बोलला, नाही, नाही! सगळे असे करीत नाही. कसे ते पहा. मी जेवतो तेव्हा पांडुरंग जेवतो. मी निजतो तेव्हा पांडुरंग विश्रांती घेतो. मी पूजा करतो तेव्हा हृदयस्थ ईश्वराला आवळतो. अशा प्रकारे ईश्वरावाचून एक क्षणभर मी एकटा राहात नाही. यात त्याचे दर्शन होते का नाही ते तू पहा.

कथा उपदेश : ईश्वर आपल्याबरोबरच आहे असे गृहित धरून वागावे म्हणजे मग ईश्वरदर्शन होईल.

## पंचांग

| | |
|---|---|
| पंचांग | नक्षत्र:धनिष्ठा १९:२६:२८ |
| ३१जुलै २०२६ | योग:सौभाग्य २३:५३:३६ |
| शुक्रवार | करण:तैतिल १०:०४:२१ |
| विक्रम संवत्– २०८२ | करण:गर २२:३१:५७ |
| आषाढ शके | सूर्य:कर्क |
| संवत्– १९४८ | चन्द्र:कुम्भ०६:३७:४३ |
| संवत्सर – पराभवनाम | हिजरी सन् – १४४८ |
| अयन– दक्षिणयन | मुस्लिम मास – सफर |
| मास– आषाढ | तारीख – १६ |
| ऋतु– सौर वर्षा | विशेष |
| कृष्ण पक्ष | नाना शंकरशेट पुण्यथिती |
| तिथि:द्वितीया २२:३१:५७ | शुभ दिवस |

## दैं. 'संध्या' धमाल सूडोकु क्र. १०२६

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 5 | 1 | 3 | 7 | | | 6 | | |
| 4 | | | | | 5 | | 7 | 3 |
| 7 | | | | | | | | |
| 8 | 2 | 4 | | 9 | | 3 | 1 | |
| | | | 5 | 3 | 8 | | | |
| | 5 | 9 | | 4 | | 7 | 8 | 6 |
| | | | | | | | | 7 |
| 2 | 6 | | 1 | | | | | 8 |
| | | 7 | | | 4 | 5 | 6 | 9 |

### : सूडोकु :

खेळाचे नियम : प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३–३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

सूडोकु क्र. १०२५ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 9 | 2 | 4 | 6 | 8 | 1 | 3 | 7 | 5 |
| 6 | 5 | 1 | 7 | 9 | 3 | 2 | 4 | 8 |
| 8 | 3 | 7 | 2 | 5 | 4 | 1 | 9 | 6 |
| 1 | 6 | 8 | 9 | 2 | 5 | 7 | 3 | 4 |
| 7 | 9 | 2 | 3 | 4 | 8 | 5 | 6 | 1 |
| 5 | 4 | 3 | 1 | 7 | 6 | 8 | 2 | 9 |
| 2 | 7 | 6 | 8 | 1 | 9 | 4 | 5 | 3 |
| 3 | 8 | 5 | 4 | 6 | 2 | 9 | 1 | 7 |
| 4 | 1 | 9 | 5 | 3 | 7 | 6 | 8 | 2 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- ७८१ – जपानच्या फुजियामा ज्वालामुखीच्या उद्रेकाची प्रथम नोंद.
- १००९ – सर्जियस चौथा पोपपदी.
- १४९८ – क्रिस्टोफर कोलंबस त्रिनिदादला पोचला.
- १७०३ – डॅनियेल डॅफोला सरकारविरुद्ध वात्रटिका लिहिल्याबद्दल राजद्रोहाच्या आरोपाखाली चौकात बांधून ठेवून दगडांनी मारण्याची शिक्षा. या वात्रटिका जनतेला इतक्या आवडल्या की त्यांनी डॅफोला दगडांऐवजी फुलांनीच मारले.

### राष्ट्रीय

- १८४९ – ईश्वरचंद विद्यासागर यांच्या प्रेरणेमुळे मुंबईत परमहंस चर्चा मंडळाची स्थापना.

### जन्म

- ११४३ – निजो, जपानी सम्राट.
- १५२७ – मॅक्सिमिलियन दुसरा, पवित्र रोमन सम्राट.
- १८८० – मुन्शी प्रेमचंद, उत्कृष्ट कादंबऱ्यांचे लेखक.
- १९०२ – सर ऑस्वाल्ड ब्राउनिंग ऍलन, इंग्लिश क्रिकेट खेळाडू.
- १९०७ – दामोदर धर्मानंद कौसंबी, प्रसिद्ध प्राच्यविद्या पंडित व गणितज्ञ.
- १९१२ – बिल ब्राउन, ऑस्ट्रेलियन क्रिकेट खेळाडू.
- १९१२ – मिल्टन फ्रीडमन, अमेरिकन अर्थतज्ञ.
- १९१९ – लेफ्टनंट कर्नल हेमु अधिकारी, भारतीय क्रिकेट खेळाडू.
- १९५३ – जिमी कूक, दक्षिण आफ्रिकेचा क्रिकेट खेळाडू.

### निधन

- ११०८ – फिलिप पहिला, फ्रांसचा राजा.
- १५०८ – नाओद, इथियोपियाचा सम्राट.
- १५४७ – फ्रांसिस पहिला, फ्रांसचा राजा.
- १७५० – होआव पाचवा, पोर्तुगालचा राजा.

## : SMS :

Teacher: Itna late kyun aaye?

Student: Sir, sapne me padh raha tha, alarm ne utha diya

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | ३१.६ | २४.१ |
| अहमदनगर | ३०.४ | २३.१ |
| अकोला | ३० | २६. |
| अमरावती | ३१ | २५. |
| बीड | ३८ | २५.३ |
| भंडारा | ३८.५ | २६. |
| बुलढाणा | ३८.३ | २६.४ |
| चंद्रपूर | ३७.७ | २५. |
| चेन्नई | ४१.६ | ३१ |
| नवी दिल्ली | ४०.५ | ३१.६ |
| धुळे | ३४.३ | २३.७ |
| गोंदिया | ३६.५ | २६.४ |
| जळगाव | ३०. | २५. |
| कोल्हापूर | २७ | २२ |
| लातूर | ३३ | २३ |
| मुंबई | ३४ | ३२ |
| नागपूर | ३८ | २५.८ |
| नांदेड | ३५ | २५.८ |
| नंदूरबार | ३०.२ | २५.५ |
| नाशिक | २७.३ | २३ |
| पुणे | २६ | २२.६ |
| पंढरपूर | ३३.९ | २४.७ |
| सातारा | २७ | २१.२ |
| सांगली | ३१.४ | २३ |
| सोलापूर | ३४.८ | २५ |
| वर्धा | ३३.२ | २४.९ |

## आजचे राशिभविष्य

**मेष :** शुभ रंग: गुलाबी, शुभ दिशा: पूर्व बौद्धीक कामाकडे जास्त लक्ष द्या. ओळखीच्या व्यक्तीचा फायदा करून घ्या.

**वृषभ :** शुभ रंग:लाल, शुभ दिशा:पश्चिम अडचणीवर मात कराल. सामाजिक यशात व प्रतिष्ठेत वाढ होईल.

**मिथुन :** शुभ रंग:हिरवा, शुभ दिशा:पश्चिम शुभ कार्यात सहभागी व्हाल. व्यापारात मनासारखा फायदा मिळेल. प्रतिस्पर्ध्यापासून दूर रहा.

**कर्क :** शुभ रंग:पिवळा, शुभ दिशा:पूर्व व्यापारातील चढ–उतारामुळे मन चिंतीत राहील. मुलांच्या कामामुळे दु:खी व्हाल.

**सिंह :** शुभ रंग:केसरी, शुभ दिशा:पश्चिम एकादे महत्वाचे काम सफल झाल्याने आनंदी रहाल. आर्थिक स्थिती चांगली राहील. समाजात मान सन्मान मिळेल.

**कन्या :** शुभ रंग:काळा, शुभ दिशा: पूर्व योग्य दिशेने प्रयत्न केले तर अडकलेले पैसे मिळतील. व्यापार चांगला चालेल.

**तुळ :** शुभ रंग:निळा,शुभ दिशा:पूर्व आधिकारी वर्ग आपल्या कामावर खुष राहतील. हट्टीपणा करू नका.

**वृश्चिक :** शुभ रंग:पांढरा, शुभ दिशा:पश्चिम एखादे महत्वाचे काम यशस्वी झाल्यामुळे आनंदी रहाल. व्यापार चांगला चालेल.


**धनु :** शुभ रंग:हिरवा,शुभ दिशा:पूर्व चांगल्या बातम्या ऐकण्यास मिळतील. कुटुंबात कुरबुर होण्याची शक्यता आहे. मानसिक समाधान मिळेल.

**मकर :** शुभ रंग: गुलाबी, शुभ दिशा: दक्षिण विनयशील राहून कोणतेही काम केल्यास यश मिळेल. व्यापारात यश मिळण्यासाठी प्रयत्न केल्यास ते प्रयत्न यशस्वी राहतील.

**कुंभ :** शुभ रंग: लाल, शुभ दिशा:पश्चिम अगोदर योजलेली कामे पूर्ण होतील. आळसामुळे नुकसान होण्याची शक्यता आहे.

**मीन :** शुभ रंग:केसरी, शुभ दिशा:पश्चिम गुप्त कारवायांपासून सावध रहा. आवश्यकतेपेक्षा जास्त खरेदी करू नका. असंतुलन होण्याची शक्यता.

## 'दैं. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. १०२६



१. नष्ट होणारे
३. पृथ्वी
५. लाचलुचपतीची कमाई
९. द्यूतात नशीब बदलणारा
१०. मर्कट
१२. घाण, धूळकट थर
१३. प्रतिष्ठित
१६. साका, कचरा
१८. ठार मारणे (वा.प्र.)
२४. पौर्णिमा
२५. दान दिल्याचा कागद
२७. नौदल
२८. रमापती
३०. डोंगराचे उभे टोक
३१. आई
३२. मारल्याची खूण
३३. जीभ
३४. खर्चाची दुसरी बाजू
३६. आवाज, छंद
३७. कृष्णसखी
३८. होम, यज्ञ
३९. कमलनयन
४०. शाब्दिक हजामत
४२. परंतु
४३. खोकला
४५. तुझे
४६. जपानी चलन
४७. जाणे–येणे, वहीवाट
४८. मनसोक्त
५०. मोठी बहीण
५२. सेवक
५३. वन्य पशू
५५. श्रीयुत
५७. होकाराच्या विरुद्ध
५९. मुरली
६०. धमकी
६१. निकट, जवळ
६३. तह, तहाचा मसुदा
६४. मर्यादा
६५. राजा, सम्राट
६६. व्यवस्था, कामाची व्यवस्था

### उभे शब्द

१. अत्यल्प
२. नमनीय
३. व्रत
४. मुंबईकरांचा घरगडी
५. विहीर
६. खास पुणेरी चटकदार पदार्थ
७. राष्ट्रीय फूल
८. बूड
११. शंकराला प्रिय असणारे फळ
१४. नरक
१५. उगीच
१६. गीत
१७. चीजवस्तू
१९. जाड सतरंजी
२०. अत्यंत घाबरणे (वा. प्र.)
२१. जहर
२२. वार्ताहरांबरोबर बैठक
२३. पाठ्यपुस्तकातील गीत
२६. धावण्याबरोबर पळण्याचा शब्द
२७. करून सवरून वेगळे राहणे
२९. फळातील द्रव
३२. चेहरा, मुख
३४. एक बारीक धान्य
३५. इंद्रिय
३६. अंगण वाकडे म्हणणाऱ्यांची खरी स्थिती
३७. रक्षा
३८. आग्रही स्वभाव
४१. प्रवासातील टप्पा
४३. कर्णेंद्रिय
४४. समूह, जमाव
४५. पाण्यावरील तेलाचा थर
४८. रम्य
४९. ढीग
५०. टवटवी, ताजेपणा (हिंदी)
५१. मंत्रीमंडळ
५३. अरण्य
५४. सिंह
५५. चामखीळ
५६. एकरूप
५८. सुंदर युवती
५९. छोटा, लहान
६०. औषध
६२. अंधार
६३. मडके
६४. चबुतरा, कट्टा

### जम्बो शब्दकोडे क्र. १०२५ चे उत्तर

आडवे उत्तर १.राजकाज ४.तोच चारा ७.पान ९.कासव १२.गरम १४.राहू १५.मनकवडा १८.रसा १९.तातडी २१.बाकदार २२.लसलस २४.फार २५.रस २७.समर २९.वरीस ३२.लखलाभ ३५.माकड ३७.तड ३८.कथेकरी ४१.लाजलावणा ४४.तट ४५.सवड ४७.चार ४८.बालवाडी ५१.कणखर ५३.पर ५४.रत ५५.नजरानजर ५७.शारदा ५८.वंदन ६०.वानवा ६३.सजावट ६५.उदर ६६.सावन ६७.नम्रता ६८.तर ६९.दमा ७१.वखार ७३.रजनीनाथ ७४.सेना ७६.समरस ७८.पड ८०.नायक ८२.खग ८३.दादर ८४.सटरफटर ८६.नाल ८७.सरकार ८८.वातड ८९.टर ९०.वाटप

उभे उत्तर : १.राग २.जरतारी ३.कामत ४.तोरा ५.चहुबाजूला ६.रामदास ७.पाक ८.नवल १०.सरसरीत ११.वसा १४.रज १६.नरम १७.डास २०.डीर २३.लव २४.हरकत २६.सल २८.रमावर ३०.सडसडीत ३१.पोक ३३.खप्पड ३४.भलावण ३६.कणा ३९.थेट ४०.रीस ४२.लाचार ४३.साल ४६.वदन ४८.बारदान ४९.वारस ५०.सांज ५१.करवंद ५२.खनन ५३.परवानगी ५५.नवजात ५६.राकट ५९.दररोज ६१.वानरसेना ६२.सतार ६४.वरवर ६५.उमा ६६.सामनावीर ६९.दर ७०.खसखस ७२.खासदार ७३.रड ७५.नायनाट ७७.मगर ७८.परवा ७९.खेटर ८१.कलप ८४.सड ८५.फट

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे–४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०–२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे

### सनातनच्या वतीने देशभरात ८१ ठिकाणी; तर पुणे शहर परिसरात ४ ठिकाणी आणि भोर येथे 'गुरुपौर्णिमा महोत्सव' संपन्न!

**पुणे : दैनिक संध्या**

पुणे - "संपूर्ण जगावर घोंघावणारे तिसऱ्या विश्वयुद्धाचे संकट, वाढती महागाई, बेरोजगारी आणि जीवघेण्या स्पर्धेमुळे समाजाला ग्रासलेले नैराश्य, अशा अत्यंत भीषण आणि अस्थिर परिस्थितीतून समाजाला तारण्यासाठी आता केवळ भौतिक उपाययोजना पुरेशा नाहीत. आज दिशाहीन झालेल्या समाजाला पुन्हा एकदा प्रभू श्रीरामांच्या आदर्शांवर आधारित 'रामराज्याची' नितांत आवश्यकता आहे. मात्र, हे रामराज्य केवळ राजकीय किंवा भौतिक प्रयत्नांतून साकार होणार नाही, तर त्यासाठी समाजाला 'साधनेचे' आणि 'गुरुचरणांचे' भक्कम आध्यात्मिक अधिष्ठान असणे अनिवार्य आहे. जेव्हा समाजाची आध्यात्मिक श्रद्धा प्रत्यक्ष सुशासनात परिवर्तीत होते, तेव्हाच खऱ्या अर्थाने रामराज्याची पहाट होते," असे ओजस्वी प्रतिपादन सनातन संस्थेच्या सौ. ज्योती दाते यांनी केले. सनातन संस्थेच्या वतीने सिंहगड रस्ता, पुणे येथील 'सिद्धार्थ हॉल' येथे अत्यंत भावपूर्ण वातावरणात आयोजित करण्यात आलेल्या 'गुरुपौर्णिमा महोत्सवात' त्या बोलत होत्या. यंदा संस्थेच्या वतीने मराठी, हिंदी, गुजराती, कन्नड, इंग्रजी, तेलुगु, मल्याळम् आदी विविध भाषांमध्ये देशभरात ८१ ठिकाणी, तर पुणे जिल्ह्यात ५ ठिकाणी हा महोत्सव संपन्न झाला. स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे पणतू सात्यकी सावरकर आणि हिंदु जनजागृती समितीच्या कु. क्रांती पेटकर यांनी डेक्कन जिमखाना, पुणे येथील 'श्रुति मंगल कार्यालया'त मार्गदर्शन केले. तसेच या ठिकाणी 'स्वभावदोष निर्मूलन आणि गुणवृद्धी' आणि 'प्रार्थना' या २ इबुकचे प्रकाशन त्यांचे हस्ते करण्यात आले. हडपसर येथे हिंदु जनजागृती समितीचे पराग गोखले, विणकर सभागृह सातारा रस्ता येथे श्री नागेश जोशी,भोर येथील रामबाग हॉल येथे श्री. दीपक आगवणे यांनी उपस्थितांना संबोधित केले. आगामी जागतिक युद्धाचे आणि आपत्काळाचे सावट पहाता, हिंदूंनी प्रथमोपचार, अग्नीशमन आणि स्वसंरक्षण प्रशिक्षण घेण्याचे आवाहन संस्थेच्या वतीने करण्यात आले. या महोत्सवात प्रारंभी श्री व्यासपूजन आणि प.पू. भक्तराज महाराज यांचे प्रतिमापूजन (गुरुपूजन), सनातन संस्था आणि संस्थेचे संस्थापक सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांचे कार्य यावर लघुपट, सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांचा संदेश वाचन, धर्मरक्षक आणि हिंदुनिष्ठ यांचे सत्कार, स्वसंरक्षणाच्या सोप्या पद्धतींची प्रात्यक्षिके, रामराज्याच्या स्थापनेसाठीचा संकल्प आणि नामजप भावपूर्णरित्या करण्यात आला. या वेळी हजारोंच्या संख्येने भाविकांची उपस्थिती लाभली आणि ऑनलाईनच्या माध्यमातूनही उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

### सोयाबीन बियाणे उगवलेच नाही; राज्यात २४ हजार हेक्टरवर फटका

**पुणे : दैनिक संध्या**

खरीप हंगामात सोयाबीन बियाणे न उगविल्यामुळे राज्यातील २४ हजार ६६७.५४ हेक्टर क्षेत्र बाधित झाले आहे. याप्रकरणी राज्यभरातून १७ हजार ४७३ तक्रारी प्राप्त झाल्या असून, संबंधित बियाणे कंपन्यांविरुद्ध आतापर्यंत ८५ एफआयआर दाखल करण्यात आले आहेत, अशी माहिती कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी बुधवारी (दि. २९) पत्रकार परिषदेत दिली. ते म्हणाले, "राज्यात यंदा सोयाबीनचे सर्वसाधारण क्षेत्र ४७.२१ लाख हेक्टर असून २७ जुलैअखेर सुमारे ४५.१० लाख हेक्टर क्षेत्रावर सोयाबीनची पेरणी झाली आहे. हंगामासाठी सोयाबीन बियाण्यांची गरज १३.१२५ लाख क्विंटल असताना राज्यात एकूण १८.५७ लाख क्विंटल बियाणे उपलब्ध करून देण्यात आले होते. पुरेसा बियाणे साठा असतानाही काही कंपन्यांच्या बियाण्यांची उगवण न झाल्याने शेतकऱ्यांना दुबार पेरणीचा आर्थिक फटका सहन करावा लागला आहे."

### एफडीएकडून पुणे विभागातील २१ हॉटेल, रेस्टॉरंट, बेकरी व डेअरींचे परवाने निलंबित

**पुणे : दैनिक संध्या**

राज्यातील अन्नपदार्थांची गुणवत्ता आणि स्वच्छतेबाबत अन्न व औषध प्रशासनाने (एफडीए) कारवाईचा बडगा उगारला आहे. 'सेफ फूड, सेफ ड्रग, सेफ महाराष्ट्र' या विशेष मोहिमेअंतर्गत पुणे विभागात हॉटेल, रेस्टॉरंट, बेकरी आणि डेअरी आस्थापनांची धडक तपासणी करण्यात आली. या तपासणीत मोठ्या प्रमाणावर अस्वच्छता, अन्न सुरक्षा व मानके कायद्याचे उल्लंघन आणि स्वच्छतेच्या निकषांची पायमल्ली आढळून आल्याने पुणे विभागातील तब्बल २१ आस्थापनांचे परवाने व नोंदणी तात्काळ निलंबित करण्यात आली. अन्न सुरक्षा कायद्यांतर्गत २३ ते २८ जुलैदरम्यान ही विशेष मोहीम राबविण्यात आली. कारवाई झालेल्या आस्थापनांमध्ये पुण्यातील ११, सातारा जिल्ह्यातील ४, सांगलीतील ३ आणि कोल्हापूरमधील ३ आस्थापनांचा समावेश आहे. स्वच्छता व सुरक्षिततेच्या नियमांकडे दुर्लक्ष करणाऱ्या व्यावसायिकांवर तातडीने कारवाई करण्यात आली. पुण्यातील इंटिग्रिटी फूड सर्व्हिसेस (बालेवाडी), ब्लिंकिट कॉमर्स प्रा. लि. (लोहगाव), हॉटेल लक्ष्मण (प्रभात रोड), पंजाबी शेफ (मुंढवा), मदिना फॅमिली रेस्टॉरंट (भवानी पेठ), हिना बेकरी (सिंहगड रस्ता), माधव बिर्याणी (मुंढवा), इंडियन बेकरी आणि ब्लिंक कॉमर्स प्रा. लि. (नऱ्हे) यांच्यासह अन्य आस्थापनांवर कारवाई करण्यात आली. सातारातील न्यू सम्राट हॉटेल, हॉटेल केशर, हॉटेल लक्ष्मी गार्डन फॅमिली रेस्टॉरंट आणि बेंगलोर अय्यंगार बेकरी, सांगलीतील हॉटेल श्री प्युअर व्हेज, मैत्री चायनीज सेंटर, हॉटेल २५२० गावरान तडका, तसेच कोल्हापूरमधील श्रीकृष्ण बेंगलोर अय्यंगार बेकरी, डायमंड बेकरी आणि केदारलिंक बेकरी यांचाही कारवाईत समावेश आहे. एफडीएने सर्व खाद्य व्यावसायिकांना ग्राहकांसाठी मोफत शुद्ध पिण्याचे पाणी उपलब्ध करून देणे, फूड-ग्रेड दर्जाचे पॅकिंग साहित्य वापरणे, वापरलेल्या तेलाचा पुनर्वापर टाळणे, दिशाभूल करणारी माहिती मेनू कार्डवर न देणे आणि वैध परवान्यासह व्यवसाय करणे बंधनकारक असल्याचे स्पष्ट केले आहे. अन्नपदार्थांच्या दर्जाबाबत किंवा स्वच्छतेबाबत तक्रार असल्यास नागरिकांनी १८००२२२३६५ या टोल-फ्री क्रमांकावर संपर्क साधावा. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या आस्थापनांविरोधात कठोर कारवाई करण्यात येईल.

### कुंडमळा पुलासाठी ८ कोटींचा निधी मंजूर तरीही 'डीआरडीओ'च्या विरोधामुळे आराखडा कागदावरच

**पुणे : दैनिक संध्या**

मावळ तालुक्यातील कुंडमळा येथील पूल पडून झालेल्या दुर्घटनेनंतर नवा पूल बांधण्यात येईल ही घोषणा अजूनही कागदावरच राहिली आहे. यासाठी ८ कोटींचा निधी मंजूरही झाला. मात्र, पुलाच्या जागेवर नवीन पूल बांधण्यासाठी संरक्षण संशोधन आणि विकास संस्थेने (डीआरडीओ) सुरक्षेच्या कारणावरून विरोध दर्शविला आहे. त्यामुळे आता पुलासाठी नवीन जागा निश्चित करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभाग महिनाभरात प्रकल्प अहवाल तयार करणार आहे. त्यानंतर तांत्रिक बाबी पूर्ण झाल्यानंतर पुलाच्या कामाला सुरुवात होणार आहे. त्यासाठी किमान आणखी वर्षभराचा कालावधी लागण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. कुंडमळा (ता. मावळ) येथे १४ जून रोजी पूल कोसळून ४ जणांचा मृत्यू, तर अनेकजण जखमी झाले होते. त्यानंतर दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांनी घटनास्थळी भेट देऊन गावकऱ्यांच्या सोयीसाठी नवा पूल बांधू असे आश्वासन दिले होते. मात्र, हे आश्वासन अजूनही कागदावरच असल्याचे स्पष्ट झाले आहे. या पुलाशेजारी असलेल्या संरक्षण संशोधन आणि विकास संस्थेने (डीआरडीओ) या पुलाच्या बांधकामाला विरोध दर्शविला आहे. हा पूल संस्थेच्या १०० मीटर आत असल्याने सुरक्षेच्या कारणावरून विरोध होत असल्याचे अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे.

# विठूनामाच्या गजरात दुमदुमला सूर्यदत्त नॅशनल स्कूलचा परिसर

■ पुणे (दै. संध्या)

ज्ञानोबा माउली-तुकाराम, जय हरी विठ्ठल, विठ्ठल विठ्ठल, असा विठूनामाचा गजर आणि पर्यावरण संवर्धनाचा जागर करीत सूर्यदत्त नॅशनल स्कुलमध्ये आषाढी एकादशीनिमित्त पालखी सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. महाराष्ट्राच्या समृद्ध वारकरी परंपरेचा संस्कार चिमुकल्या विद्यार्थ्यांवर व्हावा, त्याचबरोबर पर्यावरण संवर्धनाची जाणीव निर्माण व्हावी, या उद्देशाने सूर्यदत्त नॅशनल स्कूलमध्ये विद्यार्थ्यांसाठी पारंपरिक पालखी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. विठ्ठल-रुक्मिणीच्या जयघोषाने, अभंगांच्या सुरांनी आणि टाळ-मृदंगाच्या गजराने संपूर्ण शाळा परिसर भक्तिमय वातावरणात न्हाऊन निघाला.

सूर्यदत्त एज्युकेशन फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया व उपाध्यक्षा सुषमा चोरडिया यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजिलेल्या या पालखी सोहळ्यात विद्यार्थ्यांनी पारंपरिक वारकरी वेशभूषा परिधान करून दिंडीत उत्स्फूर्त सहभाग घेतला. डोक्यावर तुळशीची वृंदावने, हातात भगवे पताके, टाळ-चिपळ्या आणि विठूनामाचा अखंड गजर यामुळे शाळेच्या परिसरात पंढरीच्या वारीचे जिवंत चित्र साकार झाले. चिमुकल्यांनी सादर केलेल्या अभंग, भक्तिगीते आणि सांस्कृतिक कार्यक्रमांनी उपस्थित पालक व शिक्षकांची मने जिंकली.

या उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना वारकरी संप्रदायाची परंपरा, आषाढी वारीचे महत्त्व तसेच संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम आणि इतर संतांच्या विचारांचा परिचय करून देण्यात आला. श्रद्धा, समता, सेवा, नम्रता आणि समाजहिताचा संदेश देणारी वारकरी परंपरा अनुभवात्मक शिक्षणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यात आली. कथाकथन, भक्तिगीते, संवादात्मक उपक्रम आणि विविध सांस्कृतिक सादरीकरणांतून विद्यार्थ्यांनी भारतीय संस्कृतीचा आनंद घेतला.

पंढरपूरची वारी ही महाराष्ट्राची सर्वात मोठी सांस्कृतिक व धार्मिक परंपरा आहे.



ही वारी म्हणजे संतपरंपरा, भक्ती, समता आणि सामाजिक ऐक्य यांचे प्रतीक आहे. यंदाच्या पालखी सोहळ्याचे विशेष आकर्षण 'जलसंवर्धन' हा सामाजिक संदेश होता. पाण्याचे महत्त्व, पाणी वाचविण्याच्या सवयी, पावसाचे पाणी साठविण्याची गरज आणि दैनंदिन जीवनात पाण्याचा जबाबदारीने वापर करण्याबाबत विद्यार्थ्यांना विविध कृतीप्रधान उपक्रमांद्वारे मार्गदर्शन करण्यात आले. संस्कृतीसोबतच पर्यावरण संवर्धनाची जाणीव विद्यार्थ्यांच्या मनात रुजविण्याचा शाळेचा हा प्रयत्न विशेष कौतुकास्पद ठरला, असे प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया यांनी नमूद केले.

सूर्यदत्त नॅशनल स्कूलमध्ये विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी भारतीय संस्कृती, नैतिक मूल्ये आणि पर्यावरणपूरक जीवनशैली यांचा समन्वय साधणारे विविध उपक्रम सातत्याने राबविले जातात. अशा उपक्रमांतून विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जबाबदारी, सांस्कृतिक अभिमान आणि पर्यावरणाबद्दलची संवेदनशीलता अधिक दृढ करण्याचा शाळेचा सातत्यपूर्ण प्रयत्न आहे, असेही त्यांनी नमूद केले.

## रांगोळीच्या माध्यमातून ग्रंथप्रेमाचा अनोखा गौरव

■ पुणे (दै. संध्या)

गुरुपौर्णिमेनिमित्त अभिनव कला भारती संस्थेच्या वतीने रांगोळीच्या माध्यमातून ग्रंथप्रसारक व संदर्भतज्ज्ञ प्रसाद भडसावळे यांच्या वाचनप्रसार व ग्रंथसंस्कृती संवर्धनाच्या कार्याचा गौरव करण्यात आला. संस्थेच्या वैशिष्ट्यपूर्ण 'गुरुपौर्णिमा कृतज्ञता उपक्रम' अंतर्गत दि रास्ता पेठ एज्युकेशन सोसायटीच्या आबासाहेब अत्रे विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयातील ग्रंथालयात भेट देऊन आकर्षक रांगोळी साकारत ग्रंथांप्रती आणि वाचन चळवळीसाठी सुरू असलेल्या कार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यात आली.



पुण्यात गेली बारा वर्षे कार्यरत असलेली अभिनव कला भारती संस्था मोफत रांगोळी प्रशिक्षणासाठी प्रसिद्ध असून आजवर ८ हजारांहून अधिक कलाप्रेमींना प्रशिक्षण दिले आहे. यातील अनेकांसाठी ही कला रोजगाराचे साधन ठरली आहे. विविध सामाजिक उपक्रमांसह दरवर्षी एका वैशिष्ट्यपूर्ण विषयावर अभ्यासपूर्ण दैनंदिनी प्रकाशित करणे, हेही संस्थेचे वैशिष्ट्य आहे. याप्रसंगी संस्थेचे कार्याध्यक्ष सागर कुलकर्णी यांच्यासह श्रेया येवलेकर, तन्वी माने, आदिती कुडापणे, सिद्धी उपरे, वेदश्री राऊतमारे, विधी दुधे, उत्कर्ष उणेचा, मंदा घोडके, शुभदा ओतारी, राजश्री ढमाले, वनिता पाचंगे, ओम कुडापणे, रितेश बुरुड, चेतन धरपाले, प्रतिमा खराडे, साक्षी भंडारी आणि उत्तम साळवे उपस्थित होते. याप्रसंगी प्रसाद भडसावळे यांनी उपस्थित सर्वांना घरोघरी असावी ग्रंथसंपदा या उपक्रमांतर्गत पुस्तक भेट दिले.

## आशाताई शिंदे-गायकवाड यांना 'संविधान सन्मान साहित्य पुरस्कार'

■ पुणे (दै. संध्या)

विश्वबंधुता साहित्य परिषद, विश्वबंधुता काव्यमंच आणि काषाय प्रकाशन या संस्थांच्या वतीने क्रांती दिन आणि स्वातंत्र्य दिनाच्या पार्श्वभूमीवर आयोजित तिरंगा महोत्सवात दिला जाणारा 'संविधान सन्मान साहित्य पुरस्कार' यंदा प्रसिद्ध गीतकार आशाताई शिंदे-गायकवाड यांना जाहीर झाला आहे. शनिवार, ८ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी १० वाजता पत्रकारभवन, नवी पेठ, पुणे येथे होणाऱ्या महोत्सवात तिरंगा महावस्त्र, संविधान राष्ट्रग्रंथ, सन्मानचिन्ह आणि मानपत्र देऊन सन्मानित करण्यात येणार आहे, अशी माहिती महोत्सवाचे अध्यक्ष बंधुताचार्य प्रकाश रोकडे यांनी दिली.





"महोत्सवात ज्येष्ठ साहित्यिका ॲड. प्रार्थना सदावर्ते यांच्या हस्ते कादंबरीकार प्रा. शंकर आथरे यांच्या 'वाणी विश्वबंधुतेची' या भाषण संग्रहाचे प्रकाशन होईल. 'विश्वबंधुतेची पहाट' काव्यसंमेलनात २५ निमंत्रित कवी सहभागी होतील. स्वागताध्यक्ष डॉ. बंडोपंत कांबळे, प्रा. चंद्रकांत वानखेडे, कवयित्री संगीता झिंजुर्के, प्रकाशक मंदाकिनी रोकडे यांचा विशेष सहभाग असणार असून, काही निवडक साहित्यिकांना 'विश्वबंधुता प्रकाशदूत साहित्य पुरस्कार' देऊन सन्मानित करण्यात येणार आहे," असे प्रकाश रोकडे यांनी नमूद केले.

## २ लाखांपर्यंतच्या सर्व पात्र शेतकऱ्यांची कर्जमाफी होणार

■ पुणे (दै. संध्या)

"राज्यातील ज्या शेतकऱ्यांची थकीत कर्ज रक्कम २ लाखांपर्यंत आहे, त्या सर्व पात्र शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमाफी केली जाणार आहे. 'हेअरकट'मुळे कर्जमाफीच्या यादीत रक्कम कमी दिसत असली तरी शेतकऱ्यांनी घाबरण्याचे किंवा काळजी करण्याचे कोणतेही कारण नाही, संबंधित बँकांशी समन्वय साधून या सर्व तक्रारींचे तातडीने निराकरण करण्यात येत असल्याचे" कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी स्पष्ट केले. सरकारने कर्जमाफीच्या पहिल्या टप्प्यात १६ लाख ९६ हजार पात्र खात्यांची यादी प्रसिद्ध केली असून दुसरी यादी पुढील काही दिवसात जाहीर होणार असल्याचेही त्यांनी यावेळी बोलताना सांगितले.

पुण्यात कृषी क्षेत्राशी संबंधित विषयांवर आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी बोलताना कृषीमंत्री दत्तात्रय भरणे म्हणाले की, 'हेअरकट' म्हणजे राज्य शासन आणि बँका यांच्यातील आर्थिक समझोता असून, कर्जमाफीमध्ये सरकार आणि बँकांनी किती रक्कम उचलायची याचे सूत्र आहे. याचा अर्थ शेतकऱ्यांचे कर्ज कमी करणे असा नसून, सरकार आणि बँका यांच्यातील आर्थिक वाटा निश्चित करणे हा त्यामागील उद्देश आहे.त्यामुळे शेतकऱ्यांच्या कर्ज खात्यातील प्रत्यक्ष थकीत रक्कम आणि शासनाने जाहीर केलेल्या कर्जमाफीच्या यादीतील रक्कम यामध्ये तफावत दिसून येत आहे. त्यामुळे अनेक शेतकऱ्यांच्या मनात माझे संपूर्ण कर्ज माफ झाले का नाही असा संभ्रम निर्माण झाला आहे. मात्र, शेतकऱ्यांनी कोणतीही चिंता करण्याचे कारण नाही. कर्जमाफीच्या यादीत कमी दिसणारी उर्वरित रक्कम संबंधित राष्ट्रीयीकृत बँकांकडून नियमानुसार वर्ग केली जाणार असून, पात्र शेतकऱ्यांच्या संपूर्ण कर्जमाफीवर त्याचा कोणताही परिणाम होणार नाही.

## खेळाडूंची तायक्वांदो स्पर्धेत चमकदार कामगिरी

■ पुणे (दै. संध्या)




दक्षिण कोरियातील मुजू येथे नुकत्याच झालेल्या जागतिक तायक्वांदो स्पर्धेत (वर्ल्ड तायक्वांदो कल्चर एक्सपो चॅम्पियनशिप - डब्ल्यूटीसीई) पुण्यातील आर. बी. होरांगी तायक्वांदो दो-जांग असोसिएशनच्या खेळाडूंनी उत्कृष्ट कामगिरी केली. मुजू येथे झालेल्या स्पर्धेत संघाने तीन सुवर्ण, तीन रौप्य आणि तीन कांस्य, तर इंचॉन येथे झालेल्या वर्ल्ड ऑलिम्पिक तायक्वांदो फेडरेशनच्या वतीने झालेल्या स्पर्धेत सहा रौप्य आणि पाच कांस्य पदके जिंकून भारताचा गौरव वाढवला.

मुजूमध्ये झालेल्या स्पर्धेत पूमसे आणि क्योरोगी प्रकारात मंथन देवी व कृती दवे याने यांनी प्रत्येकी एक सुवर्ण व एक रौप्य, आरवी गवारे हिने दोन कांस्य, कल्याणी डफळ हिने एक सुवर्ण व एक कांस्य, तर प्रांजल पानसे हिने एक रौप्य व एक कांस्य पदक जिंकले. इंचॉन येथे झालेल्या स्पर्धेतही उल्लेखनीय कामगिरी करीत पूमसे आणि क्योरुगी प्रकारात मंथन देवी याने दोन रौप्य, कृती दवे हिने एक रौप्य व एक कांस्य, आरवी गवारे हिने एक रौप्य व एक कांस्य, कल्याणी डफळ हिने एक रौप्य व एक कांस्य, प्रांजल पानसे हिने एक रौप्य व एक कांस्य पदक पटकविले.

या स्पर्धेत एकूण २८ देशांनी सहभाग घेतला होता. 'डब्ल्यूटीसीई' स्पर्धेत ३,००० हून अधिक, तर 'डब्ल्यूओटीएफ' स्पर्धेत २,३०० हून अधिक खेळाडूंनी सहभाग घेतला. वर्ल्ड तायक्वांदो कल्चर एक्सपोच्या अध्यक्षांच्या नेतृत्वात आयोजित या स्पर्धेला अनेक देशांतील 'ग्रँड मास्टर्स' उपस्थित होते. सारंग ढोका, योगेश मुदलियार, श्रीनिवास केडगोनी, तनिष्क बांगर, क्रिश केडगोणी, बसवराज भंडारी, आदिनाथ कुदळे, राजेंद्र साळुंखे, विशाल गावटे, स्वाती भंडारी यांच्यासह पालकांनी स्पर्धेसाठी सहकार्य केले. संपूर्ण आंतरराष्ट्रीय दौरा, संघ व्यवस्थापन आणि खेळाडूंचे प्रशिक्षण यांचे नेतृत्व मास्टर रवींद्र भंडारी यांनी केले. समारोपावेळी आर. बी. होरांगी तायक्वांदो दो-जांग असोसिएशनचे अध्यक्ष मास्टर रवींद्र भंडारी यांना मुख्य मंचावर आमंत्रित करीत तायक्वांदोच्या प्रसारासाठी दिलेल्या उत्कृष्ट योगदानाबद्दल आणि त्यांच्या संघाच्या नेत्रदीपक यशाबद्दल 'विशेष प्रशंसा पुरस्कार' देऊन सन्मानित करण्यात आले.

# प्रॅक्टिशनर्स असोसिएशनच्या अध्यक्षपदी ज्ञानेश्वर नरवाडे यांची बिनविरोध निवड

■ पुणे (दै. संध्या)

महाराष्ट्र टॅक्स प्रॅक्टिशनर्स असोसिएशनच्या (एमटीपीए) अध्यक्षपदी ॲड. ज्ञानेश्वर नरवाडे यांची बिनविरोध निवड करण्यात आली. ४६ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत वर्ष २०२६-२७ साठी नवीन कार्यकारिणीची बिनविरोध निवड करण्यात आली.

यामध्ये ॲड. नरवाडे यांच्यासह उपाध्यक्षपदी ॲड. प्रणव शेठ, सचिवपदी मिलिंद हेंद्रे, सहसचिवपदी कैलास काशीद आणि खजिनदारपदी सीएमए नवनाथ नलावडे यांची निवड झाली.

नवनिर्वाचित अध्यक्ष ॲड. ज्ञानेश्वर नरवाडे यांनी सभासदांचे आभार मानत, संस्थेची उज्ज्वल परंपरा जपत अधिक दर्जेदार, अभ्यासपूर्ण आणि नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्याचा संकल्प व्यक्त केला. कर सल्लागारांचे ज्ञान अद्ययावत ठेवण्यासाठी अधिकाधिक स्टडी सर्कल्स, सेमिनार्स आणि प्रशिक्षण कार्यक्रम केवळ पुण्यातच नव्हे तर राज्यातील विविध भागांत आयोजित केले जातील, असे त्यांनी सांगितले.

नवीन कार्यकारिणीच्या नेतृत्वाखाली 'एमटीपीए' सभासदांच्या व्यावसायिक प्रगतीसाठी आणि कर क्षेत्रातील बदल प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी अधिक जोमाने कार्य करेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला. यावेळी माजी अध्यक्ष ॲड. नरेंद्र सोनावणे, सीएमए श्रीपाद बेदरकर, मनोज चितळीकर, अनुरुद्र चव्हाण, प्रसाद देशपांडे आदी उपस्थित होते.




कर सल्लागार संस्था आपल्या कार्यामुळे महाराष्ट्रासह संपूर्ण देशात प्रसिद्ध आहे. दोन हजाराहून अधिक मान्यवर सभासद आहेत. संस्थेकडून सर्व कर सल्लागार, सनदी लेखापाल आदींना कर रचनेतील विविध बदल याबाबत मार्गदर्शन करण्याबरोबरच, प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष करांबाबत सरकारच्या विविध योजनांचा प्रसार केला जातो.

## थोडक्यात पण महत्वाचे

### ‘व्याघ्र’च्या १५० मीटरवर पंप्ड स्टोरेजला मंजुरी; होणार लवकरच उभारणी

नवी दिल्ली : दैनिक संध्या

महाराष्ट्रातील सातारा जिल्ह्यात सह्याद्री व्याघ्र प्रकल्पाच्या बफर क्षेत्रापासून सुमारे १५० मीटर अंतरावर प्रस्तावित असलेल्या अदानी ग्रीन एनर्जी लिमिटेड (एजीईएल) च्या पंप्ड स्टोरेज प्रकल्पाला (पीएसपी) केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाच्या तज्ज्ञ समितीची महत्त्वाची मंजुरी मिळाली आहे. ३६० चौरस किमीपेक्षा अधिक क्षेत्रात पसरलेल्या प्रस्तावित प्रकल्पाचे स्थान जुलै २०२२ मधील केंद्र सरकारच्या मसुदा अधिसूचनेनुसार पश्चिम घाटातील पर्यावरण-संवेदनशील क्षेत्रात (ईएसए) आहे. अधिसूचनेची मुदत ७२५ दिवसांनंतर संपुष्टात आल्याने सोमवारी सुधारित आवृत्ती जारी केली. पर्यावरण मंत्रालयाच्या २०१३च्या अधिसूचनेनुसार पश्चिम घाटातील पर्यावरण-संवेदनशील क्षेत्रात जलविद्युत प्रकल्पांना परवानगी आहे. निवकणे (एकात्मिक) पंप्ड स्टोरेज प्रकल्प (२७०० मेगावॅट) या नावाने ओळखल्या जाणाऱ्या प्रकल्पाला पर्यावरण मंत्रालयाच्या तज्ज्ञ मूल्यांकन समितीने (ईएसी) १५ जुलै रोजीच्या बैठकीत मंजुरी देण्याची शिफारस केली. या परिसरात अनुसूची-१ मधील भारतीय गवा, बार्किंग डिअर, बिबट्या यांसह १४ प्राणी तसेच व्हाईट-आयड बजर्ड आणि भारतीय मोर या दोन पक्षी प्रजातींचा समावेश आहे. पंप्ड स्टोरेज प्रकल्पामध्ये दोन जलाशय उभारले जातात. त्यापैकी एक उंचावर आणि दुसरा खालच्या स्तरावर असतो. कमी उंचीवरील जलाशयातील पाणी वरच्या जलाशयात पंप केले जाते. नंतर ते टर्बाइनमधून सोडून वीजनिर्मिती केली जाते. मात्र, प्रकल्पाच्या बांधकामापूर्वी वन्यजीव मंडळाच्या स्थायी समितीची मंजुरी घेणे बंधनकारक असेल, या अटीवर ईएसीने शिफारस केली आहे.

### पॅलेट गनमुळे जखमी झाल्याचा ज्यानं सुप्रीम कोर्टात केलेला दावा; त्याचा मेडिकल रिपोर्ट समोर आला

नवी दिल्ली : दैनिक संध्या

जुलैच्या जंतर मंतरवरील आंदोलनात पोलिसांनी आंदोलकांवर लाठीचार्ज केला. यावेळी पॅलेट गनचाही वापर करण्यात आल्याचा दावा विरोधकांकडून करण्यात येत आहे. या पॅलेट गनमुळे जखमी झालेला २५ वर्षीय युवक शेख इरशाद मन्सूरी सुप्रीम कोर्टात पोहचला होता. आता इरशादच्या मेडिको लीगल केस रिपोर्टमधून मोठा खुलासा झाला आहे. सर्जरीवेळी त्याच्या डोके, गळा, चेहरा आणि शरीरातील अन्य भागातून धातूचे कण काढण्यात आल्याचं समोर आले आहे. लेडी हार्डिंग मेडिकल कॉलेज (LHMC) येथील ईएनटी आणि हेड-नेक सर्जरी विभागाच्या २४ जुलैच्या एमएलसी रिपोर्टनुसार, २१ जुलै २०२६ रोजी जनरल ॲनेस्थेशिया (GA) देऊन रुग्णाच्या शरीरात रुतलेले धातूचे कण काढण्यासाठी शस्त्रक्रिया करण्यात आली. रुग्णाच्या डोक्याच्या आणि मानेच्या अनेक भागांमध्ये कण रुतले होते असं रिपोर्टमध्ये उल्लेख करण्यात आला आहे. ईएनटी ऑपरेशन थिएटर (OT) च्या नोंदीनुसार, रुग्णाच्या उजव्या मॅक्सिलरी अँट्रम (चेहऱ्याच्या हाडाच्या आत), उजव्या खालच्या ओठाच्या आतील अस्तरातून (लॅबियल म्युकोसा), उजव्या खांद्यावरून, उजव्या मानेवरून आणि डाव्या कपाळावरून अंदाजे २ मिमी आकाराचे धातूचे कण काढण्यात आले. हे कण शरीराच्या मऊ उतींमध्ये वरवर रुतलेले होते असं अहवालात नमूद केले आहे. रुग्णाच्या डाव्या डोळ्याच्या कक्षेच्या भागावर आणि खालच्या पापणीवर शस्त्रक्रिया करून एक बाह्य कण काढण्यात आला. डोळ्याच्या स्नायूच्या वरच्या भागाजवळ सुमारे ८ ते १० मिमी खोलीवर एक धातूचा कण आढळला. त्यानंतर ३ मिमीचा छेद घेऊन तो कण काढण्यात आला. तो कण अंदाजे ३ x ३ मिमी आकाराचा होता, त्याला धातूसारखी चमक होती, त्याच्या कडा तीक्ष्ण होत्या आणि तो दाब दिल्यावरही दबत नव्हता. शस्त्रक्रियेनंतर रुग्णाला आवश्यक औषधे देऊन पट्टी बांधण्यात आली. दरम्यान, सर्जरीवेळी काढण्यात आलेले धातूचे कण हॉस्पिटलने त्यांच्याकडेच ठेवले. हे कण त्यांच्याकडे सुरक्षित ठेवले जातील असं हॉस्पिटलने रुग्णाला सांगितले. आता हे कण फॉरन्सिक तपासासाठी पाठवले की नाही याची कल्पना नाही असं मन्सूरीने सांगितले.

### २ शिफ्टमध्ये काम, सुट्टीच्या दिवशीही ताण वाढला; तुकाराम मुंढेंविरोधात २९ अधिकारी एकवटले

नवी दिल्ली : दैनिक संध्या

गेल्या काही दिवसांपासून राज्यात अन्न आणि औषध प्रशासन खाते चांगलेच चर्चेत आले आहे. आयएएस अधिकारी तुकाराम मुंढे यांच्या धडाडीच्या कारवाईमुळे अनेकांचे धाबे दणाणले आहेत. मात्र आता मुंढे यांच्या कार्यशैलीविरोधात विभागातील अधिकारी, कर्मचारी यांनी तक्रारी केल्या आहेत. छत्रपती संभाजीनगरच्या अन्न आणि औषध प्रशासन प्रयोगशाळेतील २९ अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी मुंढे यांच्या कामावर आक्षेप घेत या खात्याचे मंत्री नरहरी झिरवाळ यांच्याकडे तक्रार केली आहे. १५ जुलैला पाठवलेल्या या पत्रात २ शिफ्टमध्ये काम, शनिवार-रविवारच्या सुट्टी दिवशीही कामाचे आदेश आणि रिक्त पदांमुळे कर्मचाऱ्यांवर येणारा ताण याबाबत उल्लेख करण्यात आला आहे. या तक्रार पत्रावर अधिकारी, कर्मचारी यांनी सह्याही केल्या आहेत. अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी ही लेखी तक्रार तुकाराम मुंढे यांच्या कार्यशैलीविरोधात केली आहे. अन्न आणि औषध प्रशासनाच्या प्रयोगशाळेत अचानक २ शिफ्ट सुरू करण्याचा निर्णय घेतला गेला. परंतु त्यासाठी आवश्यक मनुष्यबळ विभागात नाही. रिक्त पदे मोठ्या प्रमाणावर असून विद्यमान कर्मचाऱ्यांवर अतिरिक्त कामाचा ताण पडत असल्याचा आरोप अधिकारी-कर्मचाऱ्यांनी केला आहे.

### शाळांच्या ५० मीटर परिसरात ‘जंक फूड’ बंदी

नवी दिल्ली : दैनिक संध्या

मुंबई : राज्यातील शालेय विद्यार्थ्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने अन्न व औषध प्रशासनाने (एफडीए) मोठा निर्णय घेतला आहे. शाळांच्या ५० मीटरच्या परिसरात प्रक्रिया केलेले, डबाबंद खाद्यपदार्थ, जास्त चरबी, साखर व मीठ असणाऱ्या पदार्थांच्या विक्री, मोफत वाटपासह जाहिरातीवर असलेल्या बंदीची कठोर अंमलबजावणी करण्यात येणार आहे. याचा अनुपालन आदेश जारी केला आहे, अशी माहिती एफडीए आयुक्त तुकाराम मुंढे यांनी बुधवारी पत्र परिषदेत दिली. राज्यातील दोन कोटी विद्यार्थ्यांच्या आरोग्य संरक्षणासाठी हा निर्णय लागू करण्यात आला आहे. विद्यार्थ्यांना फळे, भाज्या, कडधान्ये, दूध व पौष्टिक पदार्थ उपलब्ध करण्यावर भर देण्यात येणार आहे. शाळांमध्ये पिण्याचे स्वच्छ पाणी, स्वच्छता, कचरा व्यवस्थापन याची काटेकोर अंमलबजावणी करावी लागेल. प्रत्येक शाळेला स्वतंत्र अन्न सुरक्षा मंडळ स्थापन करावे लागणार आहे. कॅन्टीनमधील तसेच शाळेत उपलब्ध होणाऱ्या अन्नाची तपासणी करण्यासाठी एका पर्यवेक्षकाची नियुक्ती करणे सक्तीचे. शाळेच्या मुख्य प्रवेशद्वारावर ५० मीटर परिसरात जंक फूड विक्री आणि जाहिरातींना बंदी असल्याचा सूचना फलक लावणे बंधनकारक. शाळेचे कॅन्टीन, मेस किंवा मध्यान्ह भोजन पुरवणाऱ्या कंत्राटदाराकडे भारतीय अन्न सुरक्षा, मानक प्राधिकरणाचा वैध परवाना असणे आवश्यक. ...तर व्यवस्थापन जबाबदार : शाळा व्यवस्थापनाला अन्न सुरक्षिततेसाठी प्राथमिक जबाबदार ठरवण्यात येईल. ५० मीटर परिसरात नियमबाह्य विक्री आढळल्यास अन्नसुरक्षा अधिकारी व स्थानिक स्वराज्य संस्थेला कळवावे लागेल. राज्य मंडळ व इतर मंडळांनी स्कूल फूड रेग्युलेशनचे पालन संलग्नता व नूतनीकरणासाठी अनिवार्य करावे आणि गंभीर उल्लंघनावर कारवाई करावी, असे मुंढे यांनी स्पष्ट केले.

# अजब कारभार; रशियात असलेल्या विद्यार्थ्यावर गुन्हा

■ पटना (दै. संध्या)

नीट प्रश्नपत्रिका फुटीप्रकरणी झालेल्या आंदोलनानंतर बिहार पोलिसांच्या कारवाईवर पुन्हा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. किशनगंज जिल्ह्यातील मोहम्मद सदाकत कोनन राही या विद्यार्थ्याच्या नावावर आंदोलनप्रकरणी एफआयआर करण्यात आला आहे. मात्र, संबंधित विद्यार्थ्याने आपण गेल्या चार महिन्यांपासून रशियात वास्तव्यास असल्याचा दावा करत समाजमाध्यमावर व्हिडीओ प्रसिद्ध केला आहे.

बहादूरगंज येथे आंदोलन झाले, त्या दिवशी आपण रशियातच होतो. घटनास्थळी उपस्थित नसतानाही त्याचे नाव आंदोलनकर्त्यांच्या यादीत समाविष्ट करण्यात आल्याचा आरोप त्याने केला आहे. या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून आपल्या विरोधातील कारवाईचा फेरआढावा घ्यावा, अशी मागणी राहीने जिल्हा प्रशासनाकडे केली आहे. बहादूरगंज आंदोलनप्रकरणी एकूण ४६ विद्यार्थ्यांविरोधात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. रशियातून विद्यार्थ्याचा व्हिडीओ समोर आल्यानंतर पोलिसांकडून सुरू असलेल्या तपासाबद्दल प्रश्न उपस्थित होत आहेत. पटना येथील बेऊर कारागृहाबाहेर बुधवारी सकाळपासून अटक करण्यात आलेल्या विद्यार्थ्यांचे नातेवाइक आणि मित्र मोठ्या संख्येने उपस्थित होते. सकाळी सहा वाजल्यापासून प्रतीक्षा करूनही विद्यार्थ्यांची सुटका झाली नसल्याचा आरोप त्यांनी केला. विद्यार्थ्यांच्या नातेवाइकांनी तातडीने सुटका न झाल्यास आंदोलन छेडण्याचा इशारा दिला. तसेच, पूर्वी गोऱ्या इंग्रजांचे राज्य होते, आता काळ्या इंग्रजांचे राज्य आले आहे, अशा शब्दांत त्यांनी प्रशासनावर तीव्र टीका केली.



## जन्म-मृत्यू नोंदणीबाबतचे नियम अधिक कडक




■ नवी दिल्ली (दै. संध्या)

जन्म आणि मृत्यूची उशिराने नोंदणी करण्याबाबतचे नियम अधिक कडक करण्यासाठी केंद्र सरकारने बुधवारी लोकसभेत जन्म व मृत्यू नोंदणी (दुरुस्ती) विधेयक, २०२६ सादर केले. या विधेयकानुसार, घटना घडून दोन वर्षांहून अधिक कालावधीनंतर जन्म किंवा मृत्यूची नोंदणी करायची असल्यास प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकाऱ्याची परवानगी घेणे बंधनकारक राहणार आहे.

केंद्रीय गृह राज्यमंत्री नित्यानंद राय यांनी विधेयक सादर केले. सध्या एका वर्षानंतर पण दोन वर्षांच्या आत नोंदणीसाठी जिल्हाधिकारी, उपविभागीय दंडाधिकारी किंवा अधिकृत कार्यकारी दंडाधिकाऱ्याच्या आदेशाची आवश्यकता असते. ही तरतूद कायम राहणार असून, दोन वर्षांनंतरच्या नोंदणीसाठी न्यायालयीन मंजुरी अनिवार्य करण्यात आली आहे.

या दुरुस्तीमुळे जन्म आणि मृत्यूच्या घटनांची वेळेत नोंदणी करण्यास प्रोत्साहन मिळेल. जन्म-मृत्यू नोंदणी प्रमाणपत्र हे व्यक्तीच्या कायदेशीर ओळखीचे महत्त्वाचे दस्तऐवज असल्याने त्याची विश्वासार्हता अधिक मजबूत करण्याचा उद्देश या विधेयकाचा आहे. या बदलांमुळे केंद्र सरकारवर कोणताही अतिरिक्त आर्थिक भार पडणार नसल्याचेही विधेयकात नमूद करण्यात आले आहे. लोकसभा आणि विधानसभांच्या एकाच वेळी निवडणुका घेण्यासंबंधीच्या ‘एक देश, एक निवडणूक’ विधेयकाचा अभ्यास करणाऱ्या संसदेच्या संयुक्त समितीला अहवाल सादर करण्यासाठी हिवाळी अधिवेशनाच्या अखेरच्या आठवड्याच्या पहिल्या दिवसापर्यंत मुदतवाढ देण्यात आली. समितीचे अध्यक्ष पी. पी. चौधरी यांनी यासंदर्भातील ठराव मांडला व तो आवाजी मतदानाने मंजूर करण्यात आला.

## पर्यावरण रक्षणासाठी केंद्र सरकारकडून सातवा मसुदा अधिसूचना जारी

■ नवी दिल्ली (दै. संध्या)

केंद्र सरकारने पश्चिम घाटातील ५६ हजार ८२५.७ चौरस किलोमीटर क्षेत्र पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील क्षेत्र (ईएसए) म्हणून घोषित करण्यासाठी सातवा मसुदा अधिसूचना जारी केली आहे.

याआधीचा मसुदा ३१ जुलै २०२४ रोजी प्रसिद्ध झाला होता. मसुदा अधिसूचना ७२५ दिवसांनंतर कालबाह्य होत असल्याने नवीन मसुदा जारी करण्यात आला आहे. जैवविविधतेने समृद्ध आणि संवर्धनासाठी विशेष संरक्षणाची गरज असलेल्या भागांना पर्यावरण मंत्रालयाकडून ईएसएचा दर्जा दिला जातो. नव्या मसुद्यानुसार गुजरातमधील ४४९, महाराष्ट्रातील १७,३४०, गोव्यातील १,४६१, कर्नाटकातील २०,६६८, तामिळनाडूतील ६,९१४ आणि केरळमधील ९,९९३.७ चौरस किलोमीटर क्षेत्राचा पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील भागात समावेश करण्यात आला आहे. पश्चिम घाटातील अंतिम सीमांकन आणि क्षेत्रफळाबाबत सहा राज्यांनी मांडलेल्या आक्षेप व सूचनांचा अभ्यास करण्यासाठी २०२२मध्ये माजी महासंचालक (वन) संजय कुमार यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली होती. ही समिती राज्य सरकारांशी चर्चा करून अंतिम शिफारशी मंत्रालयाकडे सादर करणार आहे. पश्चिम घाटाला पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील घोषित करण्याची शिफारस प्रथम २०११ मध्ये माधव गाडगीळ समितीने केली होती. त्यानंतर २०१३मध्ये डॉ. के. कस्तुरीरंगन समितीनेही अहवाल दिला. १,५०० किमी लांबीच्या पश्चिम घाटात दुर्मीळ वनस्पती आहेत. तसेच तो प्राण्यांचे नैसर्गिक अधिवास आहे.



## १२ वर्षांत भारतीय रेल्वेने किती नोकऱ्या दिल्या? संसदेत रेल्वे मंत्र्यांनी सगळी आकडेवारी दिली

■ नवी दिल्ली (दै. संध्या)

भारतीय रेल्वे विविध विभागांतील लोकांच्या गरजांनुसार भरती प्रक्रिया राबवते. रेल्वे भरती परीक्षा मोठ्या प्रमाणावर घेतल्या जातात. रेल्वेने नेहमीच मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करून पारदर्शकपणे परीक्षा घेतल्या आहेत. काळानुसार बदलणाऱ्या तंत्रज्ञानामुळे लोकांच्या गरजा बदलत राहतात. हे लक्षात घेऊन विविध पदांसाठी भरती केली जाते, अशी माहिती भारतीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी दिली.

गेल्या १२ वर्षांत भारतीय रेल्वेने किती नोकऱ्या दिल्या, याबाबतही अश्विनी वैष्णव यांनी सभागृहाला सविस्तर माहिती दिली. गेल्या १२ वर्षांत भारतीय रेल्वेने ५ लाखांहून अधिक लोकांना रोजगार दिला. २०१४ ते जून २०२६ या कालावधीत रेल्वेमध्ये ५.५६ लाख नोकऱ्या देण्यात आल्या. यामध्ये विविध पदांवरील नियुक्त्यांचा समावेश आहे. याच कालावधीत दक्षिण रेल्वेमध्ये ५०,४८५ लोकांना नोकरी देण्यात आली. तसेच २००४-०५ ते २०१३-१४ या काळात काँग्रेसच्या नेतृत्वाखालील यूपीए आघाडीचे सरकार होते. या काळात ४.११ लाख लोकांची भरती करण्यात आली होती, असे वैष्णव यांनी सांगितले.



नांदेडचे खासदार रवींद्र वसंतराव चव्हाण यांनी टीटीईंवरील कामाच्या ताणाचा मुद्दा उपस्थित केला. सध्याच्या प्रणालीनुसार उत्तर रेल्वेच्या ट्रेनमध्ये विशेषतः दिल्लीतील सराई रोहिल्ला आणि जम्मू-काश्मीरमधील उधमपूर दरम्यान धावणाऱ्या ट्रेन क्रमांक २२४०१/२२४०२ मध्ये अतिरिक्त टीटीई प्रवास करतात का?, असा प्रश्न विचारला होता. यावर वैष्णव यांनी सांगितले की, नवीन मार्गदर्शक तत्त्वांनुसार, एका टीटीईला जास्तीत जास्त पाच एसी कोचसाठी किंवा तीन चेअर कार किंवा स्लीपर कोचसाठी तैनात केले जाते.

एका ट्रेनमध्ये तैनात केलेल्या टीटीईंची संख्या कोचच्या संख्येवर आणि प्रकारावर अवलंबून असते. उपलब्ध कर्मचाऱ्यांचा पुरेपूर वापर होतो. योग्य तिकीट तपासणी व प्रवासी सहाय्य सुनिश्चित होते. कर्मचाऱ्यांचा अधिक चांगला वापर करण्यासाठी उपाययोजना करण्याकरिता विभागीय रेल्वेला वेळोवेळी प्रशासकीय मार्गदर्शक तत्त्वे जारी करण्यात आली आहेत, असे ते म्हणाले.

## वाहनांचे रबराचे भाग बदलावे लागू शकतात

■ नवी दिल्ली (दै. संध्या)

२००५ ते २०१६ दरम्यान उत्पादित बीएस-३ वाहनांमध्ये ई-२० (२० टक्के इथेनॉल मिश्रित पेट्रोल) वापरल्यास काही रबराचे भाग आणि गॅस्केट बदलण्याची गरज भासू शकते, अशी माहिती केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी राज्यसभेत दिली. मात्र, वाहनांच्या इंजिनमध्ये कोणतेही बदल करण्याची आवश्यकता नसल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. इंडियन ऑइल, इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ पेट्रोलियम, एआरएआय आणि सियाम यांच्या संयुक्त अभ्यासात ई-२० इंधनामुळे वाहनांच्या कामगिरीत किंवा इंजिनच्या झिजेमध्ये कोणताही लक्षणीय फरक आढळला नाही.


### वर्तमानपत्रातील जाहिरातीचा नमुना
### जिल्हाधिकारी कार्यालय पुणे
### निविदेसाठी सूचना

जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे यांच्या कार्यालयीन कॅन्टीनचे संचालन, व्यवस्थापन, पॅन्ट्री व हॉस्पिटॅलिटी सेवा तसेच कार्यालयाच्या निर्धारित बर्हाह्य परिसर व ग्राउंड प्लस चार मजली पार्किंगच्या हाऊसकीपिंग व स्वच्छता सेवांसाठी (कॅन्टीन भाड्याच्या ऐवजी सेवा देण्याच्या तत्त्वावर) पात्र व अनुभवी संस्थांकडून दोन लिफाफा पद्धतीऐवजी केवळ तांत्रिक पात्रतेच्या आधारे (Technical Bid Only) ऑनलाईन ई-निविदा मागविण्यात येत आहेत. (निविदेचा कालावधी : ०३ (तीन) वर्षे) निविदेची सविस्तर माहिती, पात्रता निकष, कामाचे स्वरूप, अटी व शर्ती, वेळापत्रक तसेच निविदा दस्तऐवज महाराष्ट्र शासनाच्या महा-टेंडर्स (http://maharashtra.gov.in/tenders) संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. प्रस्ताव सादर करण्याची अंतिम मुदत १२/०८/२०२६. आहे.

(Tender Ref. No-GB/Canten/2027 and Tender ID-2026_RFCP_1322832_1)

स्थळ : पुणे

सही/-
(ज्योती कदम)
निवासी उपजिल्हाधिकारी, पुणे

जिमाका/पुणे/जाहिरात /१७९/२०२६-२७.



### सासवड नगरपरिषद, सासवड जि. पुणे

सासवड, ता. पुरंदर, जि. पुणे
ULB CODE: 802817
फॅक्स नं. ०२११७-२२२४३६ Email: saswadmc@gmail.com

सार्वजनिक सूचना

घनकचरा व्यवस्थापन नियम, २०२६ ची अंमलबजावणी बाबत

केंद्र शासनाच्या पर्यावरण, वने व वातावरणीय बदल विभागाच्या दिनांक २७ जानेवारी २०२६ च्या अधिसूचनेनुसार घनकचरा व्यवस्थापन नियम, २०२६ निर्गमित करण्यात आलेले असून सदर नियम दिनांक ०१ एप्रिल २०२६ पासून अमलात आले आहेत.

सासवड शहराच्या हद्दीतील सर्व नागरिक, व्यापारी, संस्था, गृहनिर्माण संस्था, अस्थापना, लोकप्रतिनिधी तसेच मोठ्या प्रमाणात कचरा निर्माण करणारे घट (Bulk Waste Generators) यांना सूचित करण्यात येते की सदर नियमानुसार व मा. सर्वोच्च न्यायालयाच्या नागरी अपील क्र. ६१७४/२०२३ मधील आदेशानुसार प्रत्येक नागरिक व संस्थेवर कचरा वर्गीकरण व वैज्ञानिक व्यवस्थापनाची जबाबदारी निश्चित करण्यात आलेली आहे.

नियमांनुसार प्रत्येक घर, दुकान, अस्थापना, कार्यालय, हॉटेल, बाजारपेठ, संस्था व इतर कचरा निर्मात्यांनी

खालीलप्रमाणे कचऱ्याचे स्रोतावरच वर्गीकरण करणे बंधनकारक राहील-

१) ओला कचरा- उरलेले अन्न (खरकटे), शिळे अन्न, भाजीपाला आणि फळांचे तुकडे, सुका पालापाचोळा, फुले, झाडांच्या छाटलेल्या फांद्या आणि गवत.
२) सुका कचरा-प्लास्टिक, कागद, वर्तमानपत्र, वह्यांची पाने, खोकी, टिशू पेपर आणि पेपर टॉवेल.
३) सॅनिटरी कचरा - डायपर्स, सॅनिटरी नॅपकिन्स इ.
४) विशेष/घातक कचरा बॅटरी, बल्ब, औषधे, ईलेक्ट्रोनिक कचरा इ.

नागरिकांची जबाबदारी-

* घरगुती कचऱ्याचे चार प्रकारात वर्गीकरण करुनच कर्मचाऱ्याकडे/घंटागाडीत सुपूर्द करणे.
* सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकू नये.
* प्लास्टिक, बांधकाम कचरा स्वतंत्रपणे देणे.
* ओला व सुका कचरा वेगळा देणे.
* सॅनिटरी कचरा सुरक्षितरीत्या गुंडाळून देणे. कचरा जाळणे, नाले, रस्त्यावर टाकणे टाळावे.

लोकप्रतिनिधींची जबाबदारी-

आपल्या प्रभागात/वॉर्डात स्वच्छताविषयक जनजागृती करणे.
नागरिकांना कचरा वर्गीकरणासाठी मार्गदर्शन करणे.
स्वच्छता, कचरा प्रक्रिया व पर्यावरण संवर्धन सक्रिय सहभाग घेणे. स्थानिक स्वराज्य संस्थेस सहकार्य करुन घनकचरा व्यवस्थापन नियम,
२०२६ बावत प्रभावी अंमलबजावणी करणे.

(Bulk Waste Generators (BWG) मोठ्या प्रमाणात कचरा निर्माण करणारे यांची जबाबदारी-

ज्या संस्था/इमारती/संकुले यांचे क्षेत्रफळ २०,००० चौ. मी. पेक्षा जास्त आहे किंवा दररोज १०० किलोपेक्षा अधिक कचरा निर्माण होतो अथवा ४०,००० लिटर पेक्षा जास्त पाण्याचा वापर होतो, अश्या आस्थापनाना Bulk Waste Generators म्हणून घोषित करण्यात आले आहे.

अशा संस्थांची जबाबदारी -

ओल्या कचऱ्याची जागेवरच कंपोस्ट/बायोगॅस प्रक्रिया करणे.
कचयाची स्वतंत्र साठवणूक व वर्गीकरण करणे.
प्रक्रिया न झालेला कचरा उघडयावर टाकू नये.
स्थानिक स्वराज्य संस्थेच्या नियमांचे पालन करावे.

अधिकृत कचरा प्रक्रिया यंत्रणेशी समन्वय ठेवणे बंधनकारक राहील. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्ती, संस्था किंवा आस्थापनांवर "Polluter Pays Principle" नुसार दंडात्मक कारवाई व पर्यावरण भरपाई आकारण्यात येईल.

तरी सर्व नागरिकांनी सासवड शहर स्वच्छ, सुंदर व पर्यावरणपूरक शहर निर्मितीसाठी घनकचरा व्यवस्थापन नियम, २०२६ चे काटेकोर पालन करावे.

| | | |
|---|---|---|
| सही /- | सही /- | सही /- |
| मुख्याधिकारी | उपनगराध्यक्ष | नगराध्यक्षा |
| सासवड नगरपरिषद, सासवड | सासवड नगरपरिषद, सासवड | सासवड नगरपरिषद, सासवड |



## थोडक्यात पण महत्वाचे

### पिंपरी-चिंचवडची कन्या अतुल्या डोंगरेचा महापौरांकडून गौरव

पिंपरी : दैनिक संध्या

पिंपरी-चिंचवड शहराची कन्या कु. अतुल्या डोंगरे हिने NEET 2026 परीक्षेत अखिल भारतीय स्तरावर 498 वा क्रमांक (AIR 498) मिळवत शहराच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. तिच्या या दैदिप्यमान आणि उल्लेखनीय यशाबद्दल आज पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे महापौर रवि लांडगे यांच्या हस्ते तिचा विशेष सत्कार करण्यात आला. यावेळी महापौरांनी पुष्पगुच्छ, स्मृतिचिन्ह देऊन तिचे अभिनंदन केले तसेच तिच्या पुढील वैद्यकीय शिक्षणासाठी आणि उज्वल भविष्यासाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. यावेळी बोलताना महापौर रवि लांडगे म्हणाले की, “स्पर्धेच्या युगात कठोर परिश्रम, सातत्यपूर्ण अभ्यास, शिस्त आणि आत्मविश्वास यांच्या बळावर कोणतेही ध्येय गाठता येते, हे अतुल्या डोंगरे हिने सिद्ध करून दाखवले आहे. तिचे हे यश केवळ तिच्या कुटुंबाचे नसून संपूर्ण पिंपरी-चिंचवड शहरासाठी अभिमानाची बाब आहे. तिच्या यशातून शहरातील हजारो विद्यार्थी प्रेरणा घेतील आणि आपल्या स्वप्नांच्या दिशेने अधिक जोमाने वाटचाल करतील, असा विश्वास आहे.” महापौरांनी विद्यार्थ्यांना आवाहन करताना सांगितले की, प्रत्येक विद्यार्थ्यामध्ये अमर्याद क्षमता दडलेली असते. योग्य नियोजन, सातत्यपूर्ण मेहनत आणि सकारात्मक दृष्टिकोन ठेवला तर कोणतेही ध्येय अशक्य नसते. अतुल्यासारख्या विद्यार्थ्यांचे यश हे नव्या पिढीसाठी प्रेरणादायी ठरणारे असून, शहरातील गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव करण्यासाठी महानगरपालिका नेहमीच कटिबद्ध राहील. कु. अतुल्या डोंगरे हिने आपल्या यशाचे श्रेय आई-वडील, शिक्षक आणि कुटुंबीयांच्या पाठिंब्याला देत, सातत्याने अभ्यास, वेळेचे योग्य नियोजन आणि आत्मविश्वास यामुळे हे यश मिळाल्याचे सांगितले. विद्यार्थ्यांनी कोणत्याही परिस्थितीत हार न मानता आपल्या ध्येयासाठी सातत्याने प्रयत्न करत राहावे, असा संदेशही तिने यावेळी दिला. या प्रसंगी उपस्थित मान्यवरांनीही अतुल्या डोंगरे हिचे अभिनंदन करत तिच्या पुढील शैक्षणिक आणि व्यावसायिक वाटचालीसाठी शुभेच्छा व्यक्त केल्या. अतुल्या डोंगरे हिची मेहनत, जिद्द, चिकाटी आणि उत्कृष्ट कामगिरी ही पिंपरी-चिंचवडमधील विद्यार्थ्यांसाठी निश्चितच प्रेरणादायी ठरणार असून, तिच्या उज्ज्वल भविष्यासाठी सर्व स्तरातून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

### दत्त साई सेवा कुंज आश्रमात गुरुपौर्णिमा महोत्सव भक्तिमय वातावरणात संपन्न..!

पिंपरी : दैनिक संध्या

कासारवाडी-पिंपळे गुरव येथील श्री दत्त साई सेवा कुंज आश्रमात गुरुपौर्णिमेनिमित्त आयोजित धार्मिक आणि सामाजिक कार्यक्रम बुधवारी भक्तिमय वातावरणात उत्साहात संपन्न झाले. त्यानंतर गायक विशालजी रसाळ यांनी सादर केलेल्या भक्तिमय संगीत कार्यक्रमाला भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. त्यांनी सादर केलेल्या सुमधुर भक्तिगीतांनी उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. यावेळी लोकनेते दिवंगत आमदार लक्ष्मणभाऊ जगताप यांच्या स्मरणार्थ राबविण्यात आलेल्या ‘आरोग्य वारी पंढरीच्या दारी’ या उपक्रमातील सहभागी डॉक्टर, वारकऱ्यांची चरणसेवा करणारे चरण सेवा करणाऱ्या सेवेकऱ्यांचा यावेळी आमदार शंकर जगताप यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये विशेष सन्मान करण्यात आला. या सोहळ्यास गोसेवक, प्रसिद्ध बांधकाम व्यावसायिक विजू शेठ जगताप, जगद्गुरू कृपांकित डॉ. ह.भ.प. चैतनानंदजी महाराज पुणेकर यांच्यासह प्रशासक, त्रिवेणी आश्रम, आर्ट ऑफ लिव्हिंग ब्रह्मचारी माधवानंदजी, शल्यचिकित्सक, जिल्हा रुग्णालय, सांगवीचे डॉ. अंबादास देवमाने, जिल्हा रुग्णालय रुग्ण कल्याण समिती सदस्य डॉ. देविदास शेलार, दादा वेदपाठक, स्टेट टीचर, आर्ट ऑफ लिविंग वसंत सानप, ह.भ.प. शेखर महाराज जांभुळकर, स्टेट टीचर समन्वयक, आर्ट ऑफ लिविंग माणिक भोंग, तुषार आल्हाट, सुरज आंग्रे, डॉ दिलीप सातव, डॉ दीपक खोडवे मुकुंदराव गुरव, गोरक्षक राजकुमार चौगुले, विनोद बंसल, एम.डी. डायबेटोलॉजिस्ट चंद्रकांत कणसे आदी उपस्थित होते. यावेळी मान्यवरांनी गुरुपौर्णिमेचे आध्यात्मिक महत्त्व विशद करतानाच आश्रमाच्या धार्मिक आणि सामाजिक कार्याचे कौतुक केले. महोत्सवानिमित्त आर्ट ऑफ लिविंग यांच्या पुढाकारातून आणि पूना सीरॉलॉजिकल इन्स्टिट्यूटच्या सहकार्याने रक्तदान शिबिराचेही आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात ११७ रक्तदात्यांनी उत्स्फूर्तपणे रक्तदान करून सामाजिक बांधिलकीचा आदर्श निर्माण केला. धार्मिक उत्सवाला समाजसेवेची जोड देणारा हा उपक्रम विशेष कौतुकाचा ठरला. यावेळी बोलताना डॉ.देविदास शेलार म्हणाले, “पंढरपूरला जाऊन विठ्ठल रखुमाईचे दर्शन घेण्याबरोबरच वारकऱ्यांची सेवा करणे महत्त्वाचे असते. माझ्या सहकाऱ्यांसमवेत वारकऱ्यांच्या आरोग्याची सेवा करण्याची संधी मिळाली आहे. आणि हे कार्य करताना मला प्रत्यक्ष पांडुरंगाचे दर्शन घेतल्याचा आनंद मिळतो. वारकऱ्यांची सेवा करण्याची संधी मिळत आहे, हे मी अहोभाग्य समजतो.” दरम्यान महाप्रसादाचा भाविकांनी लाभ घेतला. श्री दत्त साई सेवा ट्रस्ट, चंद्ररंग चॅरिटेबल ट्रस्ट, आर्ट ऑफ लिव्हिंग, दिवंगत आमदार लक्ष्मणभाऊ जगताप मित्र परिवार आणि श्री दत्त साई सेवा कुंज आश्रम भक्त परिवार यांच्या संयुक्त विद्यमाने महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. भाविकांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे गुरुपौर्णिमा महोत्सव श्रद्धा, भक्ती आणि सेवाभावाचा सुंदर संगम ठरला.

### शहराच्या पर्यटनाला मिळणार नवी ओळख; ‘अप्पु घर’ हायटेक होणार

पिंपरी : दैनिक संध्या

गेली ३५ वर्षे पिंपरी-चिंचवडकरांच्या बालगोपाळांच्या आणि शहरवासीयांच्या आठवणींचा कणा राहिलेले आणि शहराच्या पर्यटन ओळखीचे केंद्र असलेले निगडी येथील इंदिरा गांधी उद्यानातील ‘अप्पु घर’ (Appu Ghar) अम्युझमेंट पार्क आता नव्या आणि अत्याधुनिक रूपात पाहायला मिळणार आहे. तब्बल १८ कोटी ६० लाखांच्या खासगी गुंतवणुकीतून या पार्कचे संपूर्ण कायापालट करण्यात येणार असून, यासंदर्भातील महत्त्वाचा प्रस्ताव स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे यांनी उपसुचनेसह मंजूर केला आहे. पिंपरी-चिंचवड शहरातील सर्वात जुने मनोरंजनालय म्हणून अप्पु घर ओळखले जाते. मात्र, काळाच्या ओघात येथील बहुतांश राईड्स २० ते ३५ वर्षे जुन्या झाल्या आहेत. जुन्या आणि जीर्ण झालेली यंत्रसामग्री व राईड्समुळे आजची नवी पिढी याकडे आकर्षित होत नसल्याने पर्यटकांच्या संख्येत मोठी घट झाली आहे, ज्याचा थेट परिणाम महसुलावर होत होता. बाजारात येत असलेल्या नव्या पर्यटन स्थळांशी स्पर्धा करणे कठीण झाल्यामुळे अप्पु घराचे संपूर्ण आधुनिकीकरण करणे काळाची गरज बनले होते. कोरोना प्रादुर्भावाच्या कठीण काळात १६ मार्च २०२० ते जानेवारी २०२२ या कालावधीत अप्पुघर बंद ठेवावे लागले होते. या कालावधीत चालकाला झालेले व्यावसायिक नुकसान व अटी-शर्तीनुसार भाडेदरात वाढ करून, करार संपण्याच्या कालावधीनंतर अतिरिक्त २ वर्षे मुदतवाढ देण्याचा प्रस्ताव प्रशासनाने तयार केला होता. हाच अत्यंत महत्त्वाचा विषय स्थायी समितीचे सभापती अभिषेक बारणे यांनी योग्य त्या उपसुचनांसह मंजूर केला आहे. मे. पुष्पक अम्युझमेंटच्या माध्यमातून या प्रकल्पात तब्बल १८ कोटी ६० लाखांची खासगी गुंतवणूक केली जाणार आहे. आधुनिक राईड्स आणि आकर्षणे: पार्कमध्ये लॉग् फ्ल्युम (पाण्यावरील घसरगुंडी), फ्लॉइंग सिनेमा, ३६०° इमर्सिव्ह डोम, हॉरर हाऊस, मिरर मेझ व इन्फिनिटी टनल, नायगारा कृत्रिम धबधबा, किड्स ट्रॅफिक पार्क, आर्केड गेम्स, एआर-व्हीआर झोन आणि इंटरॅक्टिव्ह सेल्फी झोन यांसारख्या अत्याधुनिक व थरारक राईड्सची भर पडणार आहे सर्वसमावेशक सुविधा: पार्कचे ‘नेचर थीम’ व ‘किड्स थीम’वर आधारित सुशोभीकरण केले जाणार असून, डिजिटल तिकीट प्रणाली, क्यू मॅनेजमेंट, स्मार्ट पार्किंग, आधुनिक फूड कोर्ट, पिण्याच्या पाण्याची व ड्रेनेजची उत्तम व्यवस्था केली जाणार आहे.

# मतदारसंघातील वीज समस्या १ महिन्याच्या आत सोडवा

■ पिंपरी (दै. संध्या)

पिंपरी विधानसभा मतदारसंघातील वाढती वीज समस्या आणि वारंवार खंडित होणारा वीजपुरवठा यावर तात्काळ ठोस उपाययोजना काढण्यासाठी आमदार अमित गोरखे यांच्या प्रमुख उपस्थितीत सावरकर भवन, निगडी प्राधिकरण येथे २८ जुलै रोजी उच्चस्तरीय सर्वपक्षीय बैठक पार पडली. या बैठकीत आमदार अमित गोरखे यांनी नागरिकांच्या समस्या मांडत महावितरणच्या अधिकाऱ्यांना चांगलेच धारेवर धरले आणि वीजप्रश्न तातडीने मार्गी लावण्यासाठी सक्त निर्देश दिले.

पिंपरी मतदारसंघातील शाहूनगर, संभाजीनगर, काळभोरनगर, निगडी प्राधिकरण, मोहननगर, मोरवाडी, विद्यानगर आणि आकुर्डी परिसरातील नागरिकांना वारंवार वीजपुरवठा खंडीत होण्याच्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. सलग दोन दिवस वीज नसणे, तांत्रिक बिघाड झाल्यानंतर दुरुस्तीचे काम उशिरा होणे यांसारख्या गंभीर समस्यांचा पाढा नागरिकांनी या बैठकीत वाचला. नागरिकांच्या या तक्रारी गांभीर्याने ऐकून घेत आमदार अमित गोरखे यांनी अधिकाऱ्यांसमोर तीव्र नाराजी व्यक्त केली.

बैठकीत घेण्यात आलेले महत्त्वाचे निर्णय १. तक्रार निवारण: प्रत्येक बुधवारी 'तक्रार निवारण दिन' पाळण्यात येईल तसेच आगामी २८ ऑगस्टपर्यंत (१ महिन्याचा कालावधी) वीज समस्यांबाबत विशेष आढावा घेऊन प्रलंबित तक्रारींचे प्राधान्याने निवारण केले जाईल. २. कर्मचारी वाढ: वाढत्या वीज मागणीचा विचार करून आवश्यक त्या ठिकाणी तातडीने कर्मचारी संख्या वाढविण्यात येईल (यासाठी प्रशासनाला १ महिन्याचा अवधी देण्यात आला आहे). ३. नवीन सब-स्टेशन: भविष्यातील वीजपुरवठा अधिक सक्षम करण्यासाठी नवीन सब-स्टेशन उभारणीच्या प्रक्रियेला गती दिली जाईल.




४. विशेष कक्ष: नागरिकांच्या फोनद्वारे येणाऱ्या तक्रारींचे त्वरित निराकरण करण्यासाठी एक विशेष तक्रार निवारण केंद्र सुरू करण्यात येणार आहे.

'नागरिकांचा त्रास कोणत्याही परिस्थितीत खपवून घेतला जाणार नाही. वीज हा मूलभूत प्रश्न असून, सुरळीत वीजपुरवठा मिळण्यासाठी महावितरणने तातडीने आपली यंत्रणा सुधारली पाहिजे. यासाठी महावितरण प्रशासनाने एका महिन्याच्या आत विशेष उपाययोजना कराव्यात. जनतेच्या समस्या सोडवण्यासाठी सदैव कटिबद्ध आहोत.' - आमदार अमित गोरखे वीज पुरवठ्याबाबत काही अडचण, तक्रार किंवा समस्या असल्यास महावितरणच्या (MSEB) नवीन हेल्पलाइन क्रमांकावर जारी करण्यात आले असून समस्या जाणवल्यास संपर्क साधावा.

या महत्त्वपूर्ण बैठकीस उपमहापौर सौ. शर्मिलाताई बाबर, नगरसेविका श्रीमती अनुराधाताई गोरखे, नगरसेविका सौ. सुप्रियाताई चांदगुडे, नगरसेवक श्री. अमित गावडे, माजी नगरसेवक श्री. राजू दुर्गे, कला, क्रीडा, साहित्य व सांस्कृतिक समितीचे सभापती श्री. कैलास कुटे, भारतीय जनता युवा मोर्चाचे माजी प्रदेश अध्यक्ष श्री. अनुप मोरे, महावितरणचे संबंधित वरिष्ठ अधिकारी तसेच मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते. या बैठकीनंतर महावितरण प्रशासनाकडून वीज समस्येवर लवकरच सकारात्मक व ठोस कार्यवाही होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

## लवकरच सर्वसमावेशक ‘शौचालय धोरण’ लागू होणार..!

■ पिंपरी (दै. संध्या)

पिंपरी-चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील वाढते शहरीकरण, झपाट्याने होणारे नागरिकीकरण आणि लोकसंख्येच्या तुलनेत निर्माण होणाऱ्या गरजा लक्षात घेऊन महापालिकेच्या वतीने एक अत्यंत महत्त्वपूर्ण आणि सर्वसमावेशक ‘पिंपरी-चिंचवड महानगरपालिका शौचालय धोरण’ तयार करण्यात आले आहे. महापालिकेच्या आज पार पडलेल्या स्थायी समितीच्या बैठकीत स्थायी समितीचे सभापती अभिषेक बारणे यांनी या सर्वसमावेशक धोरणाला अधिकृत मान्यता दिली आहे.

शहरातील सार्वजनिक आरोग्य, स्वच्छता, पर्यावरण संरक्षण आणि नागरिकांचे जीवनमान उंचावणे यासाठी शौचालय सुविधांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. सार्वजनिक ठिकाणी उघड्यावर शौचास जाण्याची प्रवृत्ती पूर्णपणे रोखणे, सार्वजनिक व सामुदायिक शौचालयांची उपलब्धता वाढवणे आणि अस्तित्वात असलेल्या शौचालयांची नियमित देखभाल व व्यवस्थापन करणे हा या धोरणाचा मुख्य उद्देश आहे.

सध्या शहरात शौचालयांची सद्यस्थिती, उपलब्ध सुविधा, लोकसंख्येच्या तुलनेत आवश्यक शौचालयांची संख्या, विविध भागांमधील मागणी, सार्वजनिक ठिकाणे, बाजारपेठा, वाहतूक केंद्र, उद्याने, धार्मिक स्थळे, झोपडपट्टी व दाट लोकवस्तीचे भाग, प्रमुख रस्ते व इतर गर्दीची ठिकाणे यांचा सखोल विचार करून या नवीन धोरणाचे नियोजन करण्यात आले आहे. सर्वसमावेशक सुविधा: महिला, बालके, ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग व्यक्ती तसेच तृतीयपंथी नागरिकांच्या विशेष गरजा लक्षात घेऊन सर्वसमावेशक व सुलभ शौचालय व्यवस्था निर्माण करणे.

पायाभूत सुविधा व नियोजन: शौचालयांची स्थान निश्चिती, वापर, देखभाल-दुरुस्ती, स्वच्छता, पाणीपुरवठा, मलनिसारण व्यवस्था, विद्युत व्यवस्था, प्रकाशयोजना, आणि सुरक्षा यांचे चोख नियोजन.

## उपमहापौर बाबर यांच्या हस्ते पिंपरीत राज्यातील पहिल्या तृतीयपंथीय समुपदेशन केंद्राचे उद्‌घाटन!

■ पिंपरी (दै. संध्या)

पिंपरी-चिंचवड महानगरपालिका आणि 'नारी द वुमन' संस्थेच्या संयुक्त विद्यमाने तृतीयपंथीय समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी महत्त्वपूर्ण पाऊल उचलत तृतीयपंथीय समुपदेशन केंद्राचे उद्‌घाटन उपमहापौर शर्मीलाताई बाबर यांच्या हस्ते गुरुवारी (दि.२३ जुलै) सायंकाळी सावित्रीबाई फुले सभागृह, पिंपरी येथे उत्साहात पार पडले. या कार्यक्रमात विविध क्षेत्रातील मान्यवरांनी तृतीयपंथीय समाजाला सन्मानाने जगण्याचा अधिकार, रोजगार, शिक्षण, कौशल्य विकास आणि सामाजिक स्वीकार यावर भर देत मनोगत व्यक्त केले.कार्यक्रमाचे आयोजन नारी द वुमन संस्थेचे संस्थापक अध्यक्ष आसिफ शेख व उपाध्यक्षा अर्चना मेंगडे यांनी केले होते.



या कार्यक्रमाला उपमहापौर शर्मीलाताई बाबर, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, ज्येष्ठ पत्रकार नाना कांबळे,सामाजिक समरसता गतिविधी पश्चिम महाराष्ट्र प्रांत सहसंयोजक विलास लांडगे,सामाजिक समरसता गतिविधी प्रांत मंडळाचे सदस्य ॲड. मुकुंद यदमळ,डॉ. आम्रपाली मोहिते यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

यावेळी उपमहापौर बाबर म्हणाल्या की, समाजाने तृतीयपंथीयांकडे दयेच्या नव्हे तर समानतेच्या आणि सन्मानाच्या दृष्टीने पाहिले पाहिजे. परमेश्वराने निर्माण केलेल्या प्रत्येक व्यक्तीला समान अधिकार असून, तृतीयपंथी असणे हा कोणताही शाप नसून तो निसर्गाचा स्वीकार आहे.रोजगाराच्या माध्यमातून तृतीयपंथीयांना सक्षम बनविणे आवश्यक आहे. 'नारी द वुमन' संस्थेचे संस्थापक अध्यक्ष आसिफ शेख, उपाध्यक्षा अर्चना मेंगडे, ज्येष्ठ पत्रकार नाना कांबळे तसेच या उपक्रमाशी संबंधित सर्व कार्यकर्त्यांचे कौतुक करावे तेवढे कमी आहे. तृतीयपंथीयांच्या सन्मानासाठी आणि त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सुरू झालेले हे समुपदेशन केंद्र राज्यातील इतर स्थानिक स्वराज्य संस्थांसाठीही प्रेरणादायी ठरेल.महानगरपालिका विविध कौशल्य प्रशिक्षण आणि रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देत आहे.

## पिंपरी-चिंचवडसाठी स्वतंत्र टपाल विभाग स्थापन करा

■ पिंपरी (दै. संध्या)

पिंपरी - पिंपरी-चिंचवड शहर झपाट्याने विस्तारत आहेच. २०११ मध्ये १७ लाख असलेली शहराची लोकसंख्या आजमितीला ३० लाखांपर्यंत पोहोचली आहे. मोठ्या प्रमाणावर निवासी विकास, पायाभूत सुविधा, मेट्रो विस्तार आणि औद्योगिक वाढ यामुळे कार्यक्षम सार्वजनिक सेवांची मागणी सातत्याने वाढत आहे. त्यासाठी पिंपरी-चिंचवडसाठी स्वतंत्र टपाल विभाग स्थापन करण्याची मागणी खासदार श्रीरंग बारणे यांनी केंद्र सरकारकडे केली आहे.

खासदार बारणे यांनी केंद्रीय दूरसंचार मंत्री ज्योतिरादित्य शिंदे यांची दिल्लीत भेट घेतली. शहरात स्वतंत्र टपाल विभाग स्थापन करण्याची गरज त्यांना समजावून सांगितली. याबाबतचे सविस्तर निवेदन दिले आहे. त्यात खासदार बारणे यांनी म्हटले आहे की, १९७० च्या दशकात महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने (एमआयडीसी) पिंपरी-चिंचवड व परिसरातील गावांमध्ये औद्योगिक वसाहती विकसित केल्यानंतर या भागात वेगाने औद्योगिक आणि नागरी विकास झाला. या परिसराचा नगरपालिका ते १९८२ मध्ये पिंपरी-चिंचवड महानगरपालिका असा प्रवास झाला आणि त्यानंतर हे शहर भारतातील अग्रगण्य औद्योगिक व आर्थिक केंद्र म्हणून विकसित झाले. टाटा मोटर्स, बजाज ऑटो, फोर्स मोटर्स, फिनोलेक्स यांसारख्या प्रमुख उद्योगांनी शहराच्या विकासात मोलाचे योगदान दिले आहे. तसेच राजीव गांधी इन्फोटेक पार्क आणि इतर सेवा क्षेत्रातील गुंतवणुकीमुळे नागरीकरणाला अधिक गती मिळाली. परिणामी, महाराष्ट्रासह देशभरातील रोजगार शोधणाऱ्यांसाठी पिंपरी-चिंचवड हे एक प्रमुख आकर्षणकेंद्र बनले आहे.

२०११ मध्ये सुमारे १७ लाख असलेली शहराची लोकसंख्या आज जवळपास ३० लाखांपर्यंत पोहोचली आहे. मोठ्या प्रमाणावर निवासी विकास, पायाभूत सुविधा, मेट्रो विस्तार आणि औद्योगिक वाढ यामुळे कार्यक्षम सार्वजनिक सेवांची मागणी सातत्याने वाढत आहे.

पिंपरी-चिंचवड शहराची स्वतंत्र प्रशासकीय, औद्योगिक आणि आर्थिक ओळख निर्माण झाली आहे. मात्र, टपाल प्रशासन अद्यापही पुणे शहर पूर्व टपाल विभागाच्या अखत्यारीत असल्यामुळे प्रशासन आणि सेवा वितरणात अनेक अडचणी निर्माण होत आहेत. त्यामुळे स्वतंत्र टपाल विभागाची आवश्यकता आहे. लोकसंख्येतील झपाट्याने वाढ, नागरी विस्तार आणि वाढती लोकसंख्या यामुळे टपाल सेवांची मागणी मोठ्या प्रमाणात वाढली आहे.

तक्रार निवारण, दावे, प्रशासकीय कामकाज यासाठी नागरिकांना पुण्यातील कार्यालयात जावे लागते. पिंपरी-चिंचवड महानगरपालिका हद्दीतील १ मुख्य टपाल कार्यालय, त्याअंतर्गत ३० उपटपाल कार्यालये व ८ शाखा टपाल कार्यालये. एवढ्या विस्तृत कार्यक्षेत्रामुळे प्रशासकीय कामाचा ताण मोठ्या प्रमाणात वाढला असून त्याचा परिणाम कार्यक्षमता, देखरेख आणि नागरिकांना मिळणाऱ्या सेवांवर होत आहे.स्वतंत्र पिंपरी-चिंचवड टपाल विभाग स्थापन झाल्यास दोन्ही शहरांमधील व्यवस्थापन अधिक प्रभावी होईल आणि सेवा दर्जात सुधारणा होईल.

## माता, पिता व गुरुजनांना अभिमान वाटेल असे कर्तृत्व सिद्ध करा

■ पिंपरी (दै. संध्या)

पिंपरी, पुणे (दि. २९ जुलै २०२६) जीवनातील महत्त्वाची चार वर्षे अभियांत्रिकीची पदवी मिळवण्यासाठी द्यावी लागतात. पीसीयू मधील उच्च विद्या विभूषित प्राध्यापकांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी आपल्या करिअरचा पाया उभारावा, त्यासाठी पीसीईटीने गुणवत्ताधिष्ठित शिक्षणव्यवस्था उभारली आहे, त्याचा लाभ घ्यावा आणि आपल्या माता, पिता व गुरुजनांना अभिमान वाटेल असे कर्तृत्व सिद्ध करावे असे मार्गदर्शन पीसीयूचे कुलपती हर्षवर्धन पाटील यांनी केले. पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या साते, वडगाव मावळ येथील पिंपरी चिंचवड विद्यापीठ कॅम्पस मध्ये स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजीच्या विद्यार्थ्यांचा दीक्षारंभ हा स्वागत समारंभ आयोजित करण्यात आला होता. यावेळी अध्यक्षीय भाषण करताना हर्षवर्धन पाटील यांनी मार्गदर्शन केले. प्रथम वर्ष बीटेक च्या गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, लार्सन अँड टुब्रो कंपनीचे जनरल मॅनेजर के. वेंकटेशन, पीसीयुचे कुलगुरू डॉ. संतोष सोनवणे, पीसीयूचे सल्लागार डॉ. शितलकुमार रवंदळे, संचालक, आऊटरीच अँड ॲडमिशन्स प्रमुख डॉ. रामदास बिरादार आदी उपस्थित होते. आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी पीसीयूच्या उत्कृष्ट पायाभूत सुविधांचे कौतुक केले. विद्यार्थ्यांना शिस्त, क्रीडा, सहशैक्षणिक उपक्रम आणि लिंक्डइन सारख्या व्यावसायिक नेटवर्किंग प्लॅटफॉर्मचा प्रभावी वापर करून प्रत्येक संधीचे सोने करावे असे सांगितले. के. वेंकटेशन यांनी विद्यार्थ्यांनी स्वतःच्या प्रगतीची जबाबदारी घ्यावी. अभियांत्रिकीची मूलभूत तत्त्वे आत्मसात करून समस्या सोडविण्याची क्षमता विकसित करावी.

# निगडी सेक्टर क्र. २२ मधील पुनर्वसित घरांना मालमत्ता करात मिळणार सवलत!

■ पिंपरी (दै. संध्या)

पिंपरी-चिंचवड शहरातील सेक्टर क्र. २२, निगडी येथील जेएनएनयुआरएम (JNNURM) अंतर्गत पुनर्वसित झोपडपट्टीधारकांना मुंबई महानगरपालिकेच्या धर्तीवर मालमत्ता करामध्ये सवलत मिळणार आहे. आमदार महेशदादा लांडगे यांनी विधानसभेत केलेल्या मागणीला आता स्थानिक लोकप्रतिनिधी नगरसेवक प्रा उत्तम केंदळे आणि नगरसेवक बापू घोलप यांचा पाठिंबा मिळाला असून त्यांनी महानगरपालिकेतील आज (दि.२७) रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेत उपसूचनेद्वारे सर्वसाधारण सभेत ठराव करण्यात आला आहे. राज्य शासनाकडे यासंदर्भातील प्रस्ताव विचाराधीन आहे.आमदार महेशदादा लांडगे यांनी यापूर्वी विधानसभेत चिखली घरकुल तसेच ईडब्ल्यूएस (EWS) आणि पुनर्वसन योजनांतील रहिवाशांना करामध्ये सवलत देण्याची मागणी केली होती. या मागणीच्या अनुषंगाने शासन स्तरावर सुध्दा प्रस्ताव तयार करण्यात आला आहे.

दरम्यान, पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे नगरसेवक प्रा उत्तम केंदळे आणि नगरसेवक बापू घोलप यांनी १५ एप्रिल २०२६ रोजी महापालिका आयुक्तांना पत्र देऊन सेक्टर क्र. २२ मधील झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पातील रहिवाशांना मालमत्ता करामध्ये सवलत देण्याची मागणी केली होती. त्यामध्ये



महानगरपालिका अधिनियमातील कलम १२९(१-अ) चा उल्लेख करण्यात आला असून, विशेष विकास प्रकल्पांतील इमारती व जमिनींवर राज्य शासनाच्या मान्यतेने कमी दराने मालमत्ता कर आकारण्याची स्पष्ट तरतूद असल्याचे नमूद करण्यात आले आहे.


प्रसिद्धी माध्यमांना प्रतिक्रिया देताना प्रा उत्तम केंदळे यांनी सांगितले की,सध्या सेक्टर क्र. २२ मधील पुनर्वसित घरांवर प्रचलित दराने मालमत्ता कर आकारला जात आहे. मात्र, या परिसरातील बहुतांश कुटुंबे पूर्वीची झोपडपट्टीधारक असून मोलमजुरी, कष्टाची कामे करून आपला उदरनिर्वाह करतात. त्यामुळे त्यांच्यावर पडणारा मालमत्ता कराचा आर्थिक बोजा कमी करण्यासाठी सवलत देणे आवश्यक आहे.यापूर्वीही मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीतील पुनर्वसन प्रकल्पांमध्ये राहणाऱ्या झोपडपट्टीधारकांना राज्य शासनाच्या मंजुरीने सवलतीच्या दराने मालमत्ता कर आकारला जात आहे. त्याच धर्तीवर पिंपरी-चिंचवड शहरातील जेएनएनयुआरएम, बीएसयूपी (BSUP), एसआरए (SRA), ईडब्ल्यूएस आणि इतर पुनर्वसन योजनांतील रहिवाशांनाही समान न्याय मिळणार आहे.

नगरसेवक प्रा उत्तम केंदळे आणि नगरसेवक बापू घोलप यांनी या संदर्भात महापालिकेने राज्य शासनाकडे प्रस्ताव पाठवून तातडीने मंजुरी मिळवावी, अशी विनंती केली आहे. शासनाने या प्रस्तावाला मंजुरी दिल्यास सेक्टर क्र. २२ मधील सुमारे ३,४४० आणि शहरातील सर्वच पुनर्वसित घरांवरील मालमत्ता कराचा भार कमी होऊन हजारो नागरिकांना मोठा आर्थिक दिलासा मिळणार आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे

### आधार प्रमाणीकरण अत्यंत आवश्यक - जयश्रीताई नायकवाडी

**चाकण : दैनिक संध्या**



पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमुक्ती योजना २०२६ अंतर्गत गुरुवार अखेर पर्यंत ४३ हजार ३७१ इतक्या शेतकऱ्यांनी आपले सरकार सेवा केंद्रावर जावून आधार प्रमाणीकरण करुन घेतले आहे. आधार प्रमाणीकरण करून घेणे अत्यंत आवश्यक असल्याचे चाकण नगरपरिषदेच्या उपनगराध्यक्षा जयश्रीताई नायकवाडी यांनी सांगितले. जयश्रीताई नायकवाडी यांनी सांगितले की," आधार प्रमाणीकरण करुन घेतल्यानंतरच गरजूंच्या कर्ज खात्यात रक्कम जमा होणार आहे. तसेच नवीन पीक कर्ज घेण्यासही शेतकरी पात्र होणार आहेत. त्यामुळे आपले आधार प्रमाणीकरण करुन घेणे अत्यंत गरजेचे आहे. कर्जमुक्ती योजनेअंतर्गत पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे १ लाख, ८ हजार ३० आणि विविध वाणिज्य बँकेचे १७ हजार अशी एकूण १ लाख २२ हजार ७८६ इतक्या खात्याची माहिती पोर्टलवर अपलोड करण्यात आली आहे. त्यापैकी पहिल्या यादीमध्ये ६४ हजार, ६६४ शेतकरी कर्जमुक्ती योजने करिता पात्र झाले आहेत." उद्योजक विशालभाऊ नायकवाडी यांनी सांगितले की," शासनाकडून प्रत्येक कुटुंबाला विविध प्रकारच्या योजना पुरविल्या जातात. त्या योजनांचा लाभ सर्वांना मिळाला पाहिजे. त्यासाठी आवश्यक असणाऱ्या कागदपत्रांची पूर्तता करणे अपेक्षित आहे."

### सराईत चोराकडून चोरीच्या सात मोटारसायकली जप्त

**चाकण : दैनिक संध्या**

पिंपरी - चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या अंतर्गत चाकण उत्तर पोलीस स्टेशनच्या तपास पथकाने मोटार सायकल चोरीच्या गुन्ह्यांचा यशस्वी छडा लावत एका सराईत मोटारसायकल चोरास अटक केली. त्याच्या कडून चोरीच्या एकूण सात मोटारसायकली जप्त केल्या आहेत. चाकण उत्तर पोलीस स्टेशन हद्दीत वारंवार मोटारसायकल चोरीच्या घटना घडत असल्याने वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली तपास पथक यांनी वेगवेगळे पथक तयार केले. तपासा दरम्यान मिळालेली गोपनीय माहिती व सीसीटीव्हीच्या आधारे चाकण पोलिसांनी आरोपी अशोक मधुकर सोनवणे (रा. राळेगण, थेरपाळ ता. पारनेर, जि. अहिल्यानगर) यास ताब्यात घेतले. त्याच्याकडे करण्यात आलेल्या चौकशीत आरोपी सोनवणे याने चाकण उत्तर, चाकण दक्षिण, यवत, उरुळी कांचन आदी पोलीस स्टेशनच्या हद्दीत मोटारसायकलींची जबरी चोरी केल्याची कबुली दिली. आरोपी सोनवणे याच्यावर बीएनएस कलम ३०३(२) अन्वये दाखल असलेल्या सात गुन्ह्यांचा उलगडा करण्यात आला आहे. चोरीच्या सात मोटार सायकली जप्त करण्यात आल्या आहेत. सदरची कारवाई वरिष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र कदम यांच्या मार्गदर्शनाखाली चाकण उत्तर पोलीस स्टेशन तपास पथकाचे इन्चार्ज पोलीस उपनिरीक्षक चंद्रशेखर मोरखंडे, पोलीस हवालदार भैरोबा यादव, प्रीतम ढमढेरे, योगेश कोळेकर, महेश कोळी, शिवा लोखंडे, अक्षय सांडभोर या पथकाने केली.

### शासकीय योजनांचा लाभ सर्वसामान्य नागरिकांना मिळावा : राहुलदादा कांडगे

**चाकण : दैनिक संध्या**

शासकीय योजनांचा लाभ सर्वसामान्य नागरिकांना मिळणे अत्यंत गरजेचे आहे. यासाठी गरजूंकरता आयुष्यमान हेल्थ कार्ड शिबिरांची नितांत आवश्यकता असल्याचे विचार उद्योजक राहुलदादा कांडगे यांनी व्यक्त केले. चाकण नगरपरिषदेच्या महिला व बालकल्याण समितीच्या सभापती व नगरसेविका रुपाली कांडगे यांच्या पुढाकारातून व क्रांतिवीर संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने चाकण येथे आयोजित करण्यात आलेल्या मोफत आयुष्यमान हेल्थ कार्ड व ईश्रम कार्ड शिबिराच्या उदघाटन प्रसंगी कांडगे बोलत होते. याप्रसंगी उद्योजक योगेश राजापूरकर, अमर इंगळे, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते किसनराव कांडगे, राहुल कळसाईत आदींसह विविध क्षेत्रातील प्रतिष्ठित मान्यवर, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कांडगे पुढे म्हणाले," शासनाच्या विविध प्रकारच्या महत्त्वपूर्ण योजनांचा प्रत्यक्ष लाभ गरजूंना मिळणे अपेक्षित आहे. गरजू कुटुंबांना आरोग्य व सामाजिक सुरक्षा मिळावी, या उद्देशाने हे शिबिर आयोजित करण्यात आले होते. येथून पुढे असेच नवनवीन उपक्रम व पुढील टप्प्यात विविध प्रकारची शिबिरे आयोजित करण्यात येणार आहेत."

### कानिफनाथ महाराज की जय.....दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबराचा जयघोष

**पुरंदर : दैनिक संध्या**

पुरंदर तालुक्यातील बोपगाव श्रीक्षेत्र कानिफनाथ गडावर आषाढ शुध्द गुरुपौर्णिमा पारंपारिक पद्धतीने ऊत्साहात साजरी झाली. यावेळी हजारो भाविक भक्तांनी कानिफनाथ महाराज की जय दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा असा जयघोष करत श्री कानिफनाथ महाराज, नवनाथ महाराज, सद्गुरु दत्तात्रय महाराज व गडावरील देवी देवतांचे दर्शन घेतले. गुरुपौर्णिमा उत्सवाचे आयोजन श्री नवनाथ देवस्थान पंचायत कमिटी ट्रस्टचे अध्यक्ष ज्ञानोबा फडतरे ,उपाध्यक्ष दिपक फडतरे, सचिव जयवंत फडतरे ,खजिनदार नागेश फडतरे ,संचालक शिवाजी जगदाळे , प्रकाश(नाना)फडतरे ,प्रकाश(आप्पा )फडतरे , सुरेश फडतरे ,महादेव फडतरे ,नितीन फडतरे, रमेश फडतरे,मंगेश फडतरे, सोनबा फडतरे, व्यवस्थापक संतोष गोफणे , पांडुरंग बाठे व बोपगावकर ग्रामस्थ यांनी केले. गुरुपौर्णिमेनिमित्त श्रीक्षेत्र कानिफनाथ गडावर पहाटे ५ ते ६ वा. श्रीनाथांचा अभिषेक, स.६ ते.६.३० महाआरती, स. ७ ते ९ संतांची अभंगवाणी, स. ९ वा. नाथ साहेबांच्या ओव्या गायन ,स.९.३० नाथबाबांची पालखी सोहळा मिरवणूक, स. १० वा. नाथ संचार आखाडा, दु. १२ वा. महा आरती, दु. १२.१५ वा. महाप्रसाद पौर्णिमा मंडळ बोपगाव, संध्याकाळी ७ वा.महाआरतीचे आयोजन करण्यात आले होते.

### वाघापूर येथे पर्यावरण रक्षणासाठी वृक्षारोपण

**चाकण : दैनिक संध्या**

कायम दुष्काळाची परिस्थिती, पाण्याचे दुर्भिक्ष्य आणि उजाड माळराने अशी ओळख असलेल्या वाघापुर ता. पुरंदर पंचक्रोशीत गेल्या चार वर्षांपासून सातत्याने वृक्षारोपण व संवर्धनासाठी काम करणाऱ्या आपुलकी सोशल फाउंडेशन या संस्थेने नुकतेच वाघापुर येथील माणकेश्वर मंदिर परिसरात यावर्षी आठशे देशी वृक्षांची लागवड करून पर्यावरण रक्षणासाठी आपले योगदान दिले. यापूर्वीही सुमारे दोन हजार वृक्ष लागवड करून उन्हाळ्यात पाण्याचे दुर्भिक्ष्य असताना टँकर द्वारे पाणी घालून वृक्षांची जोपासना केली आहे. वाघापुर येथील आपुलकी फौंडेशन ही संस्था शिक्षण, आरोग्य व पर्यावरण या क्षेत्रात गेली अनेक वर्षे विविध उपक्रम घेवून ग्रामविकासाचे काम करत आहे. यावेळी वृक्षारोपण कार्यक्रमास पुरंदर तालुका सामाजिक वनीकरण विभागाच्या क्षेत्रीय अधिकारी सौ. यशश्री भालेराव , वाघापुर गावातील अनेक तरूण, ग्रामस्थ, पंचक्रोशीतील अनेक संस्थांचे पदाधिकारी उपस्थित होते.

# दुचाकी चोरी करणाऱ्या सराईत टोळीचा खेड पोलिसांनी केला पर्दाफाश

■ राजगुरुनगर (दै. संध्या)



चैनीची हौस भागवण्यासाठी दुचाकी चोरी करणाऱ्या सराईत टोळीचा पर्दाफाश करण्यात खेड पोलिसांना यश आले आहे. पोलिसांनी सापळा रचून दोन आरोपींना अटक केली असून, त्यांच्याकडून तब्बल १७ दुचाकी जप्त करण्यात आल्या आहेत. तसेच १४ चोरीच्या गुन्ह्यांची उकल करण्यात आली असल्याची माहिती पोलीस उपविभागीय अधिकारी अमोल मांडवे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे रोहित आप्पासाहेब कानगुडे (वय २२, रा. नांदगाव) आणि चंद्रशेखर अनिल पवार (रा. नांदगाव) अशी आहेत.

बारामती येथे वाहतूक नियमन करत असताना पोलीस अंमलदार दत्तात्रय भोसले आणि प्रकाश कांबळे यांना एमएच-१२-टीई-९४६८ क्रमांकाची स्प्लेंडर मोटारसायकल संशयास्पद वाटली. ई-चलन यंत्राद्वारे तपासणी केली असता ही दुचाकी चोरीची असल्याचे निष्पन्न झाले. सदर मोटारसायकल निमगाव खंडोबा येथून चोरीला गेल्याची नोंद खेड पोलीस ठाण्यात होती.

घटनेची माहिती मिळताच खेड पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सुभाष चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक श्रीकांत गोडगे ,पोलीस हवालदार बिडकर, पोलीस हवालदार सचिन गिलबीले, पोलीस अंमलदार महेश गोसावी, पोलीस अंमलदार सुरज राक्षे, पोलीस अंमलदार संकेत कवडे, पोलीस अंमलदार गोकुळ कोळी, पोलीस अंमलदार सुदर्शन माताडे, महिला पोलीस अंमलदार वैशाली कांबळे यांच्या पथकाने आरोपींना ताब्यात घेतले. सखोल चौकशीत आरोपींकडून एकूण १७ मोटारसायकली जप्त करण्यात आल्या असून, १४ चोरीच्या गुन्ह्यांचा उलगडा झाला. तपासात आरोपींनी खेड पोलीस ठाणे हद्दीतील ५, शिक्रापूर येथील ३, मंचर येथील ३ तसेच पारगाव, म्हाळुंगे आणि वडूज पोलीस ठाण्यांच्या हद्दीतील प्रत्येकी १ असे एकूण १४ गुन्हे केल्याची कबुली दिली असल्याचे अमोल मांडवे यांनी सांगितले. ही कारवाई पुणे ग्रामीणचे पोलीस अधीक्षक संदीप सिंह गिल, अप्पर पोलीस अधीक्षक डॉ. शुभम कुमार, उपविभागीय पोलीस अधिकारी अमोल मांडवे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक सुभाष चव्हाण, सहायक पोलीस निरीक्षक अभिजीत कुदळे, पोलीस उपनिरीक्षक महेश गरड, पोलीस उपनिरीक्षक श्रीकांत गोडगे, सहा फौजदार शंकर भवारी, पोलीस हवालदार संतोष घोलप, पोलीस हवालदार बापुसाहेब बिडकर, पोलीस हवालदार सचिन गिलबीले, पोलीस हवालदार सुनिल बांडे, पोलीस हवालदार रमेश दाते, पोलीस अंमलदार महेश गोसावी, पोलीस अंमलदार सुरज राक्षे, पोलीस अंमलदार संकेत कवडे, पोलीस अंमलदार गोकुळ कोळी, पोलीस अंमलदार सुदर्शन माताडे, महिला पोलीस अंमलदार वैशाली कांबळे यांनी यशस्वी रित्या पार केली.

## ऋतुजा गुंजाळची विभागीय भूकरमापक पदावर निवड



■ नारायणगाव (दै. संध्या)

मंगळवारी नारायणगाव बस स्थानक येथे महाराष्ट्र शासनाच्या भूमी अभिलेख(महसूल व वन विभाग) अंतर्गत विभागीय भूकरमापक पदावर निवड झालेल्या कु. ऋतुजा धाया गुंजाळ हिचा जाहीर सत्कार करण्यात आला.

वडिलांचे छत्र नसतानाही आईने अपार कष्ट घेत, मुलीला शिक्षण देत आणि प्रत्येक पावलावर खंबीर साथ देत तिला घडवले.

ऋतुजाच्या या यशामागे तिच्या आईची जिद्द, त्याग आणि अथक मेहनत उभी आहे. हे यश प्रत्येक आईसाठी आणि संघर्षातून वाटचाल करणाऱ्या प्रत्येक मुलीसाठी प्रेरणादायी आहे.

कु. ऋतुजा गुंजाळ हिचे आणि तिच्या कष्टाळू आईचे सर्वांनी अभिनंदन केले आणि तिला पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## न्यू विस्डम इंटरनॅशनल स्कूलचा पालखी सोहळा उत्साहात

■ कोरेगावमुळ (दै. संध्या)

वाडेबोल्हाई-शिरसवडी येथे एकादशी निमित्त न्यू विस्डम इंटरनॅशनल स्कूलच्या विद्यार्थ्यांच्या वतीने काढण्यात आलेला पालखी सोहळा विठ्ठलाच्या नामगजरात उत्साहाच्या पार पडला. सालाबादप्रमाणे यंदाही पालखी सोहळ्याचे उत्साहपूर्ण आयोजन न्यू विस्डम इंटरनॅशनल स्कूलच्या माध्यमातून करण्यात आले.सकाळी ९.०० वाजता आयोजित करण्यात आलेल्या या सोहळ्यात शाळेतील असंख्य विद्यार्थ्यांनी वारकरी वेशभूषा परिधान करुन दिंडीत उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. टाळ, मृदंग, वीणा आणि हरिनामाच्या गजरात निघालेल्या दिंडीमुळे संपूर्ण वाडेबोल्हाई व शिरसवडी परिसर भक्तिमय वातावरणाने भारावून गेला. या कार्यक्रमास शाळेच्या संस्थापिका तथा चेअरमन डॉ.सुजाता रणसिंग, श्रुतिका रणसिंग, शाळेच्या माजी मुख्याध्यापिका मेरी मॅडम तसेच मुख्याध्यापिका सुप्रिया साळवी यांची प्रमुख उपस्थिती लाभली. याशिवाय शाळेतील सर्व शिक्षकवृंद,कर्मचारी, पालक आणि परिसरातील नागरिकांनीही मोठ्या संख्येने सहभाग घेतला. या पालखी सोहळ्याच्या दिंडीचे आगमन बोल्हाई माता मंदिरात झाल्यानंतर पालखीचे दर्शन घेण्यात आले. त्यानंतर विद्यार्थ्यांनी अभंग,भक्तिगीते,नृत्य व सांस्कृतिक कार्यक्रम सादर करुन वारकरी परंपरेचा संदेश प्रभावीपणे मांडला. उपस्थितांनी विद्यार्थ्यांच्या सादरीकरणाचे मनापासून कौतुक केले.

भारतीय संस्कृती, अध्यात्म आणि वारकरी परंपरेची ओळख विद्यार्थ्यांना व्हावी तसेच त्यांच्यामध्ये संस्कार, भक्तीभाव आणि सामाजिक ऐक्याची भावना दृढ व्हावी, या उद्देशाने आम्ही न्यू विस्डम इंटरनॅशनल स्कूलच्या वतीने दरवर्षी विद्यार्थ्यांचा पालखी सोहळा आयोजित करीत आहोत. याला स्कूलच्या विद्यार्थी,शिक्षक,कर्मचारी,पालक व परिसरातील ग्रामस्थ यांचा प्रतिसाद लाभत असल्याबद्दल सर्वांचे आम्ही आभारी आहोत




या कार्यक्रमास शाळेच्या संस्थापिका तथा चेअरमन डॉ.सुजाता रणसिंग, श्रुतिका रणसिंग, शाळेच्या माजी मुख्याध्यापिका मेरी मॅडम तसेच मुख्याध्यापिका सुप्रिया साळवी यांची प्रमुख उपस्थिती लाभली. याशिवाय शाळेतील सर्व शिक्षकवृंद,कर्मचारी, पालक आणि परिसरातील नागरिकांनीही मोठ्या संख्येने सहभाग घेतला. या पालखी सोहळ्याच्या दिंडीचे आगमन बोल्हाई माता मंदिरात झाल्यानंतर पालखीचे दर्शन घेण्यात आले.त्यानंतर विद्यार्थ्यांनी अभंग,भक्तिगीते,नृत्य व सांस्कृतिक कार्यक्रम सादर करुन वारकरी परंपरेचा संदेश प्रभावीपणे मांडला. उपस्थितांनी विद्यार्थ्यांच्या सादरीकरणाचे मनापासून कौतुक केले.

## स्काऊटर-गाईडर उजळणी वर्ग उत्साहात संपन्न

■ जेजुरी (दै. संध्या)



पुणे भारत स्काऊट्स अँड गाईड्स, जिल्हा कार्यालय पुणे, जिल्हा परिषद शिक्षण विभाग पुणे व पंचायत समिती शिक्षण विभाग, पुरंदर यांच्या संयुक्त विद्यमाने शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मधील एकदिवसीय युनिट नोंदणी व स्काऊटर-गाईडर उजळणी वर्ग स्व. श्रीमती कमलाबाई माणिकचंद मुथा प्रशाला, सासवड येथे उत्साहात संपन्न झाला.

पुरंदर तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी तथा सहाय्यक जिल्हा आयुक्त (स्काऊट) राजेश बामणे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि तालुका समन्वयक जितेंद्र कुंजीर यांच्या नियोजनातून या उजळणी वर्गाचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात स्काऊट-गाईड चळवळीचे जनक लॉर्ड बेडन पॉवेल यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून व गाईड प्रार्थनेने करण्यात आली. या उजळणी वर्गास तालुक्यातील अनेक शाळांतील स्काऊटर व गाईडर यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

प्रास्ताविकात पुणे जिल्हा स्काऊट संघटक दिगंबर करंडे यांनी उजळणी वर्गाचे उद्दिष्ट स्पष्ट केले. यानंतर तालुका समन्वयक जितेंद्र कुंजीर यांनी मार्गदर्शन करताना शिक्षकांनी सकारात्मक दृष्टिकोनातून विद्यार्थीहित व राष्ट्रउभारणीचे कार्य करावे, तसेच राष्ट्रभिमुख विद्यार्थी घडविण्याची ताकद स्काऊट-गाईड चळवळीत असल्याचे सांगितले. प्रशालेचे प्रभारी मुख्याध्यापक बाळगोंडा पाटील यांनी उपस्थितांचे स्वागत करून उजळणी वर्गास शुभेच्छा दिल्या. जिल्हा प्रशिक्षण आयुक्त (स्काऊट) दिलीप नेवसे यांनी शिक्षक राष्ट्रनिर्मितीचे कार्य करतात. स्काऊट-गाईड चळवळीमुळे विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुण, शिस्त, साहस, धाडस व सेवाभाव विकसित होतो. ही चळवळ पुरंदर तालुक्यातील सर्व शाळांमध्ये प्रभावीपणे राबविण्यात येणार असल्याचे सांगितले. जिल्हा संघटक (गाईड) उषा हिवराळे यांनी स्काऊट-गाईड चळवळीचा इतिहास सांगून मार्गदर्शन केले. तसेच सहचिटणीस मीनल जाधव, जिल्हा गाईड संघटक रूपाली आरू आणि पुरंदर तालुका स्काऊट-गाईड समन्वयक रमेश बोरावके यांनी विविध विषयांवर मार्गदर्शन केले. उजळणी वर्गात स्काऊट-गाईड चळवळीचा इतिहास, लॉर्ड बेडन पॉवेल यांचे कार्य, युनिट नोंदणी प्रक्रिया, अभ्यासक्रमाची ओळख, संघपद्धती, वर्षभराचे नियोजन, सामाजिक उपक्रम, प्रार्थना, झेंडा गीत, नियम, वचन, ध्येय, संघकोपरा, हस्तांदोलन, खरी कमाई, सेवाकार्य तसेच विविध पूरक उपक्रम व क्लॅपचे प्रकार यांची सविस्तर माहिती देण्यात आली. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी संतोष सोनवणे, विनोद उमाप तसेच विद्यालयातील गाईड व शालेय कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. आयोजनात प्रवीण खैरनार, संजय भिंताडे, राजाराम पिसाळ आणि संदीप गोरे यांनी सहकार्य केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संतोष सोनवणे यांनी केले.

# नाणेघाट परिसरातील प्रस्तावित जलविद्युत प्रकल्पाला आदिवासी भागातून विरोध

■ जुन्नर (दै. संध्या)

तालुक्यातील पश्चिम आदिवासी भागातील नाणेघाट परिसरातील अंजनावळे व घाटघर येथे प्रस्तावित असलेल्या जलविद्युत प्रकल्पा संदर्भात आदिवासी भागात तीव्र संतापाची लाट उसळली असून या प्रकल्पाला आदिवासी भागातील नागरिकांकडून तीव्र विरोध केला जात आहे.पेसा कायद्यानुसार ग्रामसभेच्या ठरावाला कायदेशीर महत्त्व असून २१ ऑगस्ट पूर्वी आदिवासी भागातील सर्व ग्रामपंचायतींनी विशेष ग्रामसभा घेऊन प्रस्तावित प्रकल्पामुळे, होणारे पर्यावरणीय परिणाम, जमिनींचे नुकसान व स्थानिक नागरीकांवर होणारे परिणाम याबाबत ठराव मंजूर करावेत असे आवाहन यावेळी अतुल बेनके यांनी स्थानिक रहिवाशांना मार्गदर्शन करताना केले.

या होणारे प्रकल्पाच्या उभारणीने भविष्यात आदिवासी भागातील शेतकरी भूमिहीन होऊन पर्यावरण, जैवसंपदा यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान व माणिकडोह धरणाच्या पाणीपातळीवर होणारा परिणाम या संभाव्य धोक्यामुळे आदिवासी भागातील नागरिकांमध्ये असंतोष निर्माण झाल्याची भावना सुकाळवेढेचे सरपंच दत्ता गवारी यांनी व्यक्त करत प्रकल्पासाठी निवडण्यात आलेली जागा ही पेसा व अनुसूचित क्षेत्रात येते. त्यामुळे राज्य शासन, केंद्र शासन अथवा खाजगी व्यावसायिक ही जागा अधिग्रहित करू शकणार नाही. ग्रामसभा हेच सरकार आहे. त्यामुळे या गावातील नागरिकांनी ग्रामसभा घेऊन या प्रकल्पाला विरोध करण्याचे ठराव करावेत असे आवाहन गवारी यांनी केली आहे.

प्रकल्प - फेब्रुवारी २०२२ मध्ये अदानी कंपनीने या प्रकल्पाचा प्रस्ताव राज्य शासनाच्या ऊर्जा विभागाकडे सादर केला होता. या प्रस्तावाबाबत ऊर्जा विभाग आणि कंपनीमध्ये २८ जून २०२२ रोजी सामंजस्य करार झाला. या प्रकल्पाची अंदाजे खर्च सुमारे ७०४८ कोटी रुपये आहे. या प्रकल्पात अंजनावळे (आडोशी) येथे वरचा जलाशय, तर ठाणे जिल्ह्यातील भोरांडे येथे खालचा जलाशय प्रस्तावित आहे. वरच्या जलाशयातील पाणी टर्बाइनद्वारे खाली सोडून वीजनिर्मिती करण्यात येणार असून त्यासाठी भूमिगत वीजगृह, पंप-टर्बाइन यंत्रणा आणि दोन्ही जलाशयांना जोडणारे बोगदे उभारण्यात येणार आहेत. प्रकल्पासाठी सुमारे १६६ हेक्टर जमीन आवश्यक असून त्यामध्ये १०५ हेक्टर बिगर वनजमीन आणि ६० हेक्टर वनजमीन समाविष्ट आहे. आडोशी येथे सुमारे ३० मीटर, तर भोरांडे येथे ६४ मीटर उंचीचे धरण उभारण्याचे प्रस्तावित असुन,या संदर्भात जनसुनावणीकरीता तळेरान, घाटघर, अंजनावळे, देवळे, खटकाळे, निमगिरी, आंबोली, जळवंडी, केवाडी, चावंड, पुर, भिवाडे बुद्रुक, उच्छील, भिवाडे खुर्द, हातविज, इंगळून, आंबे, सोनावळे. या ग्रामपंचायतींना नोटीसा देण्यात आलेल्या आहेत.




दैनिक संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे... निर्भीड दैनिक

# मुल्यप्रस्तावाधारित व्याघ्र संवर्धनासाठी शासन प्रयत्नशील

## मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत आंतरराष्ट्रीय व्याघ्र दिन साजरा

■ मुंबई (दै. संध्या)

नैसर्गिक अधिवास कायम राखत वैज्ञानिक दृष्टीकोणातून राज्यात व्याघ्र संवर्धनाची अंमलबजावणी सुरू आहे. हे कार्य पुढे घेवून जाण्यासाठी नवी पंचसुत्री आखण्यात आली आहे. तसेच मुल्यप्रस्तावाधारित व्याघ्र संवर्धनासाठी शासन प्रयत्नशील असल्याचे, प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे केले. आंतरराष्ट्रीय व्याघ्र दिनाच्या औचित्याने वन विभागाद्वारे येथील भारतीय व्यवस्थापन संस्थेत (आयआयएम) आयोजित परिषदेत मुख्यमंत्री बोलत होते. वनमंत्री गणेश नाईक, शिक्षण राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर, वित्त व नियोजन राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल, मुख्यमंत्र्यांचे मुख्य आर्थिक सल्लागार प्रवीण परदेशी, वन विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव मिलींद म्हैसकर, प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख) श्रीनीवास राव यांच्यासह कंबोडीया, भुतान आणि बांग्लादेशातील प्रतिनिधी यावेळी उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, वाघ हा नैसर्गिक अधिवास आणि अन्न साखळीचा केंद्रबिंदू आहे. त्यांच्या संवर्धनातून पर्यावरणाचे व वनांचे संरक्षण होते. म्हणूनच राज्यात वैज्ञानिक दृष्टीकोणातून व्याघ्र संवर्धन कार्य सुरू आहे. राज्यातील 6 व्याघ्र प्रकल्पांच्या कोअर भागांतून गावांचे स्थलांतरण करण्यात आले व नवीन बफर क्षेत्र तयार करण्यात आले. वनविभागाच्या नवीन धोरणामुळे व्याघ्र प्रकल्पा शेजारील गावकऱ्यांनी पुनर्वसन व स्थलांतरासाठी पुढाकार घेतला आहे. मानव वन्यजीव संघर्ष दुर करण्यासाठी व्याघ्र प्रकल्पालगत गावांमध्ये नियोजनबद्ध कार्यपद्धती आखण्यात आली आहे. व्याघ्र हालचालीसाठी कॅमेरा ट्रॅकींग, एआय आधारित अर्ली वॉर्निंग सिस्टीम आदी उपाय योजना करण्यात आल्या आहेत. यामुळे वाघ, जैवविविधता आणि पर्यटन यांच्या संवर्धनासाठी नवी परिसंस्था उभी राहिली आहे. परिणामी 2014 मध्ये राज्यात असलेली वाघांची 190 ही संख्या वाढून 444 झाली आहे व नवीन वाघ गणनेत ही संख्या 600 च्या वर गेल्याचे चित्र दिसेल, असे त्यांनी सांगितले.



जगातील व्याघ्र संख्येच्या 75 टक्के वाघ भारतात आहे आणि भारतातील वाघांच्या संख्येत महाराष्ट्र तिसऱ्या स्थानावर आहे. गेल्या दोन दशकांपासून व्याघ्र संवर्धनासाठी उचलण्यात आलेल्या महत्वाच्या पाऊलांमुळे देशात वाघांच्या संख्येत महाराष्ट्र पहिल्या स्थानाकडे मार्गक्रमण करित आहे. वाघांच्या अस्तित्वाचे महत्व समजून घेत त्याचा मानवाच्या चरितार्थ व अस्तित्वासोबत समन्वय करून मुल्यप्रस्तावाधारित व्याघ्र संवर्धनासाठी शासनाचे प्रयत्न सुरू आहेत. मानव वन्यजीव संघर्ष कमी करणे, व्याघ्र अधिवास हरित उपजिविका अभियान राबविणे, व्याघ्र संवर्धनासाठी सीएसआर निधी उपलब्ध करून देण्यासाठी सीएसआर धोरण आखणे, शाश्वत पर्यटन धोरण तयार करून रोजगार निर्मिती करणे आणि पर्यटन वाढवतांना वनसंरक्षण व संवर्धनासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देणे अशी व्याघ्र संवर्धनासाठी पंचसुत्री आखण्यात आल्याचे मुख्यमंत्री म्हणाले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनात वनविभागाचा चेहरामोहरा बदलत आहे. या विभागाच्या विकासासाठी सर्वसहकार्य मिळत आहे. म्हणूनच व्याघ्र संवर्धनासोबतच नवनवीन संकल्पनांच्या अंमलबजावणीतून वनविभागाचे कार्य पुढे जात आहे. राज्यात 300 कोटी वृक्षारोपणाचा ध्यास विभागाने घेतला असून जास्तीत जास्त रोप तयार करण्यासाठी राज्यात 5 ठिकाणी टिश्यु कल्चर प्रयोगशाळा उभारण्यात आल्याचे, वनमंत्री गणेश नाईक यांनी सांगितले. आंतरराष्ट्रीय व्याघ्र दिनाच्या औचित्याने वनविभागाद्वारे आयोजित याविशेष परिषदेच्या माध्यमातून राज्यातील व्याघ्र प्रकल्पांतून पर्यटनाला चालना व रोजगार निर्मिती होईल आणि येत्या काळात अशा आयोजनांना व्यापक स्वरूप प्राप्त होईल असा, विश्वास शालेय शिक्षण राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी व्यक्त केला.

वनविभागाच्या पुढील वाटचालीसाठी व व्याघ्र संवर्धनाच्या दिशेने महत्वाचे पाऊल टाकत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत या कार्यक्रमात महत्वाचे सामंजस्य करार करण्यात आले. या आयआरसीटीसी आणि वनविभागादरम्यान शाश्वत वन्यजीव पर्यटनाला चालना देण्यासाठी सामंजस्य करार करण्यात आला. बायएफ आणि वनविभाग यांच्या एचडीएफसी बँकेच्या परिवर्तन सीएसआर उपक्रमाद्वारे नागपूर जिल्ह्यातील पारशिवनी तालुक्यात समृद्धी प्रकल्प राबविण्यासाठी सामंजस्य करार करण्यात आला. आरोहा ग्रुप, महिंद्रा हॉलिडेज ॲंड रिसॉर्ट इंडिया लिमिटेड आणि महाराष्ट्र वनविभाग यांच्यात शाश्वत पर्यटनावर आधारित पंचतारांकित लक्झरी प्रकल्प विकसित करण्यासाठी सामंजस्य करार असे एकूण 11 सामंजस्य करार करण्यात आले.

'समुदाय आधारित जीवनोपयोगी उपक्रम आणि हरित अर्थव्यवस्था', 'व्याघ्र संवर्धनासाठी सीएसआर गुंतवणूक', 'महाराष्ट्र-भारताचे प्रमुख वाघ (टायगर) पर्यटन गंतव्यस्थान' आणि 'मनुष्य-वाघ सहअस्तित्व आणि परिसंस्थेचे संवर्धन' विषयांवर विषयतज्ज्ञांचे सादरीकरण झाले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते व्याघ्र संवर्धनात उल्लेखनीय कार्यासाठी एशियाटिक बिग कॅट सोसायटीचे राष्ट्रीय पुरस्कार प्रदान करण्यात आले. तत्पूर्वी, प्रधान वनसंरक्षक एम एस रेड्डी यांनी प्रास्ताविक केले. मुख्यमंत्र्यांचे मुख्य आर्थिक सल्लागार प्रवीण परदेशी यांनी नागपूर ग्रोथच्या माध्यमातून व्याघ्र संवर्धनासाठी करण्यात आलेल्या विविध उपाय योजनांबाबत माहिती दिली.

# शेतकऱ्यांच्या आर्थिक सक्षमतेकडे वाटचाल

■ मुंबई (दै. संध्या)

राज्यातील कर्जबाजारी शेतकऱ्यांना दिलासा देऊन त्यांना पुन्हा पीक कर्जासाठी पात्र करणे, नियमित कर्जफेडीला प्रोत्साहन देणे आणि संपूर्ण प्रक्रिया डिजिटल व पारदर्शक पद्धतीने राबविणे, हा पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६ चा मुख्य उद्देश आहे. सुमारे रूपये ३६ हजार ५८५ कोटींची तरतूद आणि ५६ लाख शेतकऱ्यांना लाभ देणारी ही योजना ग्रामीण अर्थव्यवस्थेला नवी दिशा देणारी ठरत आहे.

महाराष्ट्रातील शेती नैसर्गिक आपत्ती, हवामानातील बदल आणि बाजारातील अनिश्चिततेमुळे अनेकदा संकटात सापडते. कर्जाची परतफेड न झाल्यास शेतकरी नव्याने पीक कर्ज घेण्यास अपात्र ठरतो आणि शेतीतील गुंतवणूक कमी होते. ही परिस्थिती लक्षात घेऊन शासनाने शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी ही योजना सुरू केली आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या लोककल्याणकारी कार्याला अभिवादन म्हणून या योजनेला त्यांचे नाव देण्यात आले आहे. या योजनेसाठी सुमारे रूपये ३६ हजार ५८५ कोटींची आर्थिक तरतूद करण्यात आली असून सुमारे ५६ लाख शेतकऱ्यांना लाभ मिळणार आहे. १ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२५ या कालावधीत घेतलेल्या अल्पमुदत पीक कर्जांचा यामध्ये समावेश आहे. ३० सप्टेंबर २०२५ अखेर थकीत आणि ३१ मार्च २०२६ पर्यंत परतफेड न झालेल्या पात्रता कर्जांना या योजनेचा लाभ मिळेल. योजनेत रूपये २ लाखांपर्यंत थेट कर्जमुक्ती, दोन लाखांपेक्षा जास्त थकीत कर्जासाठी वन टाइम सेटलमेंट (ओटीएस) सुविधा आणि नियमित कर्जफेड करणाऱ्या पात्र शेतकऱ्यांसाठी रूपये ५० हजारांपर्यंत प्रोत्साहनपर लाभ देण्यात येणार आहे. जमीनधारणेची कोणतीही अट नसून राष्ट्रीयकृत, खाजगी, प्रादेशिक ग्रामीण, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका आणि प्राथमिक कृषी पतसंस्थांकडील पात्र पीक कर्जांचा समावेश करण्यात आला आहे. योजनेची अंमलबजावणी महाआयटी विकसित डिजिटल प्रणालीद्वारे केली जात आहे. बँका, महसूल विभाग, आयकर विभाग आणि इतर शासकीय यंत्रणांकडील माहिती एकत्रित करून पात्र लाभार्थ्यांची यादी सॉफ्टवेअरच्या माध्यमातून तयार करण्यात आली आहे. त्यामुळे मानवी हस्तक्षेप कमी होऊन पारदर्शकता आणि विश्वासार्हता वाढली आहे.

# परभणी-मुदखेड रेल्वे मार्गाच्या आधुनिकीकरणासाठी १६३ कोटी मंजुर

■ नवी दिल्ली(दै. संध्या)

भारतीय रेल्वेने दक्षिण-मध्य रेल्वेच्या नांदेड विभागातील परभणी-मुदखेड दुहेरी रेल्वे मार्गाच्या आधुनिकीकरणासाठी महत्वाचा निर्णय घेताना १६३ कोटींच्या प्रकल्पाला मंजुरी दिली आहे. या प्रकल्पाअंतर्गत मार्गावरील विद्यमान इलेक्ट्रीक ट्रॅक्शन (विद्युत पुरवठा) प्रणालीचे संपूर्ण आधुनिकीकरण करण्यात येणार असून, त्यामुळे या मार्गावरील प्रवासी तसेच मालवाहतूक रेल्वेची क्षमता आणि गती दोन्हीमध्ये लक्षणीय वाढ होणार आहे. विशेष म्हणजे, भविष्यात 'वंदे भारत एक्स्प्रेस'सारख्या वेगवान रेल्वेगाड्यांचे अधिक कार्यक्षम संचालन करण्यासाठीही हा प्रकल्प महत्वाचा ठरणार आहे.

या प्रकल्पांतर्गत १६४ रेल्वे ट्रॅक मार्गावर सध्या कार्यरत असलेली १x२५ केव्ही इलेक्ट्रिक ट्रॅक्शन प्रणाली बदलून अत्याधुनिक आणि अधिक क्षमतेची २x२५ केव्ही प्रणाली बसविण्यात येणार आहे. त्याचबरोबर वाढीव वीजभार हाताळण्यासाठी आवश्यक असलेल्या वीज पुरवठा यंत्रणा, उपकेंद्रे आणि संबंधित पायाभूत सुविधांचेही आधुनिकीकरण केले जाणार आहे. यामुळे रेल्वेगाड्यांना अधिक स्थिर आणि अखंड वीजपुरवठा उपलब्ध होईल, तसेच रेल्वे वाहतुकीतील अडथळे कमी होण्यास मदत होईल.

# डिजिटल नकाशांतून जलसमृद्धीकडे...!!

■ मुंबई (दै. संध्या)

प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना २.०अंतर्गत वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे यांनी अत्याधुनिक भौगोलिक माहिती प्रणाली (Geographic Information System – GIS) विकसित करून राज्यातील ५७,८५८ सूक्ष्म पाणलोट नकाशे यंत्रणेच्या वेबसाईटवर प्रथमच सर्वसामान्यांसाठी विनामूल्य उपलब्ध करून दिले आहेत. त्यामुळे पाण्याचे शास्त्रशुद्ध नियोजन, भूजल पुनर्भरण, जलसंधारणाची प्रभावी अंमलबजावणी आणि ग्रामस्तरावरील विकास नियोजनाला नवी गती मिळाली आहे. आधुनिक तंत्रज्ञान, लोकसहभाग आणि शाश्वत जलव्यवस्थापन यांच्या संगमातून जलसमृद्ध महाराष्ट्र घडविण्याच्या दिशेने राज्याने उचललेले हे एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे.

"पाण्याचा प्रत्येक थेंब अमूल्य आहे; परंतु त्या प्रत्येक थेंबाचे शास्त्रशुद्ध नियोजन हीच खरी जलसुरक्षेची गुरुकिल्ली आहे." एखाद्या गावात नवी विहीर कोठे घ्यावी? पाणी कोणत्या दिशेने वाहते? डोंगराच्या उतारावर सलग समतल चर (Continuous Contour Trenches – CCT) नेमके कुठे घ्यावेत? शेततळे, सिमेंट नाला बांध (CNB), गॅबियन किंवा इतर जलसंधारणाची कामे कोणत्या ठिकाणी सर्वाधिक परिणामकारक ठरतील? एखाद्या भागात भूजल पुनर्भरणाची क्षमता किती आहे? या प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी पूर्वी अनेक दिवस क्षेत्र पाहणी, कागदी नकाशे, स्थानिक अनुभव आणि विविध विभागांकडील माहितीवर अवलंबून राहावे लागत असे. आज मात्र ही परिस्थिती पूर्णपणे बदलली आहे. संगणकाच्या पडद्यावर किंवा मोबाईलच्या स्क्रीनवर एका क्लिकमध्ये संपूर्ण पाणलोट डोळ्यासमोर उभा राहतो.

# जुने कर्ज माफ, अन् एका दिवसातच मिळणार नवे पीक कर्ज

■ मुंबई (दै. संध्या)

निसर्गाचा लहरीपणा, सततच्या दुष्काळामुळं मराठवाड्यासह राज्यातील शेतकरी कायम आर्थिक संकटात असतो. या दुष्टचक्रातून बळीराजाला कायमचे बाहेर काढण्यासाठी राज्य शासनाने 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना' राबवण्यास सुरुवात केली आहे. 25 जुलै रोजी या योजनेची पहिली यादी जाहीर झाली आहे. राज्याचे सहकार आयुक्त दीपक तावरे यांनी या योजनेच्या पारदर्शक अंमलबजावणीबाबत सविस्तर सांगितले आहे. या योजनेत केवळ कर्जमाफीच नाही, तर शेतकऱ्याला तत्काळ पुन्हा उभे करण्याची मोठी ताकद आहे. पहिल्या टप्प्यातील यादीत मराठवाडा विभागातील जवळपास सहा लाखांहून अधिक शेतकरी पात्र झाले आहेत.

एरवी कोणतीही कर्जमाफी झाली, तरी नवीन पीक कर्ज मिळण्यासाठी बँकांचा 'कुलिंग ऑफ पिरियड' (Cooling-off Period) असतो. यासाठी बँका अनेक महिने किंवा चक्क एक वर्ष वाट पाहायला लावतात. पण या योजनेत शासनाने एक 'मास्टरस्ट्रोक' लगावला आहे. सहकार आयुक्तांनी सर्व बँकांना स्पष्ट निर्देश दिले आहेत, की या कर्जमाफीनंतर हा 'कुलिंग ऑफ पिरियड' फक्त एका दिवसाचा असेल.

म्हणजेच शेतकऱ्याने आज 'आपले सरकार सेवा केंद्रात' जाऊन स्वतःचे आधार प्रमाणीकरण पूर्ण केले. त्याची कर्जमाफीची प्रक्रिया पूर्ण झाली, की त्याला अवघ्या एका दिवसात नवीन पीक कर्ज मिळू शकेल. आगामी हंगामासाठी बी-बियाणे आणि खते घेण्यासाठी शेतकऱ्याला कोणाकडेही हात पसरावे लागणार नाहीत. ही या संपूर्ण योजनेची सर्वात मोठी आणि क्रांतीकारी जमेची बाजू आहे. या योजनेच्या पहिल्या टप्प्यात राज्यातील तब्बल 16 लाख 96 हजार (सुमारे १७ लाख) शेतकरी कर्जमुक्त होत आहेत. या माध्यमातून 13 हजार 600 कोटी रुपयांची थेट कर्जमाफी दिली जात आहे. विशेष म्हणजे, या पहिल्या यादीत मराठवाड्याचा वाटा सर्वात मोठा आहे. जवळपास सहा लाख 37 हजार 935 मराठवाड्यातील शेतकऱ्यांना पहिल्या टप्प्यात लाभ मिळणार आहे.

राज्यातील सर्वाधिक लाभार्थी असलेल्या राज्यातील पहिल्या पाच जिल्ह्यांमध्ये मराठवाड्यातील दोन जिल्ह्यांचा समावेश आहे. एकट्या जालना जिल्ह्यात एक लाख सात हजार 505, तर छत्रपती संभाजीनगरमध्ये एक लाख पाच हजार 128 शेतकऱ्यांना लाभ मिळत आहे.

# डिजिटल नकाशांतून जलसमृद्धीकडे...!! विकास नियोजनाला मिळाली गती

■ मुंबई (दै. संध्या)

प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना २.०अंतर्गत वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे यांनी अत्याधुनिक भौगोलिक माहिती प्रणाली (Geographic Information System - GIS) विकसित करून राज्यातील ५७,८५८ सूक्ष्म पाणलोट नकाशे यंत्रणेच्या वेबसाईटवर प्रथमच सर्वसामान्यांसाठी विनामूल्य उपलब्ध करून दिले आहेत. त्यामुळे पाण्याचे शास्त्रशुद्ध नियोजन, भूजल पुनर्भरण, जलसंधारणाची प्रभावी अंमलबजावणी आणि ग्रामस्तरावरील विकास नियोजनाला नवी गती मिळाली आहे. आधुनिक तंत्रज्ञान, लोकसहभाग आणि शाश्वत जलव्यवस्थापन यांच्या संगमातून जलसमृद्ध महाराष्ट्र घडविण्याच्या दिशेने राज्याने उचललेले हे एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे.

पाण्याचा प्रत्येक थेंब अमूल्य आहे; परंतु त्या प्रत्येक थेंबाचे शास्त्रशुद्ध नियोजन हीच खरी जलसुरक्षेची गुरुकिल्ली आहे." एखाद्या गावात नवी विहीर कोठे घ्यावी? पाणी कोणत्या दिशेने वाहते? डोंगराच्या उतारावर सलग समतल चर (Continuous Contour Trenches - CCT) नेमके कुठे घ्यावेत? शेततळे, सिमेंट नाला बांध (CNB), गॅबियन किंवा इतर जलसंधारणाची कामे कोणत्या ठिकाणी सर्वाधिक परिणामकारक ठरतील? एखाद्या भागात भूजल पुनर्भरणाची क्षमता किती आहे? या प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी पूर्वी अनेक दिवस क्षेत्र पाहणी, कागदी नकाशे, स्थानिक अनुभव आणि विविध विभागांकडील माहितीवर अवलंबून राहावे लागत असे.

आज मात्र ही परिस्थिती पूर्णपणे बदलली आहे. संगणकाच्या पडद्यावर किंवा मोबाईलच्या स्क्रीनवर एका क्लिकमध्ये संपूर्ण पाणलोट डोळ्यासमोर उभा राहतो. नदी-नाले, ओघोळ, जमिनीचा उतार, मातीचा प्रकार, गावांच्या सीमा, गट क्रमांक, भूजल पुनर्भरणाची क्षमता आणि जलसंधारणाच्या उपचारांची योग्य ठिकाणे यांची माहिती आता डिजिटल स्वरूपात उपलब्ध झाली आहे. या परिवर्तनामागे आहे, प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना (WDC:PMKSY २.०) अंतर्गत वसुंधरा




पाणलोट विकास यंत्रणा, पुणे यांनी उभारलेली आधुनिक भौगोलिक माहिती प्रणाली (GIS). या उपक्रमाचे सर्वात मोठे यश केवळ GIS तंत्रज्ञानाचा वापर नव्हे, तर महाराष्ट्रातील ५७,८५८ सूक्ष्म पाणलोट (Micro Watershed) नकाशे प्रथमच सर्वसामान्य नागरिकांसाठी विनामूल्य उपलब्ध करून देणे, ही या उपक्रमाची ऐतिहासिक कामगिरी आहे. शासनाच्या तांत्रिक दालनात मर्यादित असलेली माहिती आज प्रत्येक शेतकरी, ग्रामपंचायत, विद्यार्थी, संशोधक आणि नागरिकापर्यंत पोहोचली आहे. ही केवळ डिजिटल सेवा नाही; तर जलसंधारणाच्या ज्ञानाचे लोकशाहीकरण आहे. जलसंधारणासमोरील वाढती आव्हाने महाराष्ट्र हा भौगोलिकदृष्ट्या विविधतेने नटलेला प्रदेश आहे. कोकणातील मुसळधार पाऊस, विदर्भातील उष्ण हवामान, मराठवाड्यातील दुष्काळी परिस्थिती, पश्चिम महाराष्ट्रातील सिंचन व्यवस्था आणि सह्याद्रीच्या पर्वतरांगा.. प्रत्येक भागाची जलस्थिती वेगळी आहे. परंतु या सर्व भागांना एकच समान आव्हान आहे, ते म्हणजे पावसाचे पाणी अधिकाधिक प्रमाणात जमिनीत मुरविणे आणि भविष्यासाठी साठवणे. हवामान बदलामुळे पावसाचा कालावधी कमी होत आहे, तर अल्पावधीत अतिवृष्टीचे प्रमाण वाढत आहे. परिणामी मोठ्या प्रमाणावर पाणी वाहून जाते. त्याचबरोबर मृदा धूप वाढते, भूजल पातळी घटते आणि शेतीची उत्पादकता कमी होते. अशा परिस्थितीत प्रत्येक थेंबाचे नियोजन शास्त्रीय पद्धतीने करणे ही काळाची गरज बनली आहे. यासाठी केवळ जलसंधारणाची कामे करणे पुरेसे नसते.

## थोडक्यात पण महत्वाचे

### आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या कुलगुरूपदी डॉ. गिते यांची नियुक्ती

मुंबई : शासकीय वैद्यकीय महाविद्यालय नाशिक येथे अधिष्ठाता (डीन) पदावर कार्यरत असलेल्या डॉ. वेंकट शाहुबाई अर्जुनराव गिते यांची नाशिक येथील आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या कुलगुरूपदी नियुक्ती करण्यात आली आहे. राज्यपाल तथा विद्यापीठाचे कुलपती जिष्णु देव वर्मा यांनी डॉ. वेंकट गिते यांची कुलगुरुपदावर नियुक्ती जाहीर केली. त्यांची नियुक्ती पाच वर्षांसाठी करण्यात आली आहे. ले. ज. डॉ. माधुरी कानिटकर यांचा कुलगुरूपदाचा कार्यकाळ दि. १४ ऑक्टोबर २०२५ रोजी संपल्यामुळे हे पद रिक्त झाले होते. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे कुलगुरु प्रा. संजीव सोनवणे यांच्याकडे विद्यापीठाच्या कुलगुरूपदाचा अतिरिक्त कार्यभार सोपवण्यात आला होता. डॉ. गिते यांनी २००१ मध्ये एम.एस. (शल्यचिकित्सा) आणि २०१० मध्ये डीएनबी (यूरोलॉजी) पदवी प्राप्त केली. त्यांनी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सुपरस्पेशालिटी ब्लॉक, छत्रपती संभाजीनगर येथे यूरोलॉजी विभागाचे प्राध्यापक व विभागप्रमुख म्हणून काम केले आहे. त्याशिवाय ते शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नाशिक येथे अधिष्ठाता म्हणून कार्यरत आहेत. शासकीय व्यवस्थेत कॅडव्हर किडनी प्रत्यारोपण कार्यक्रम सुरू करण्यामध्ये त्यांचे मोलाचे योगदान आहे. तसेच महाराष्ट्र शासनाच्या आरोग्य विभागाच्या अवयव प्रत्यारोपण कार्यक्रमाचे ते सल्लागार सदस्य आहेत.

### कर्जमुक्ती योजनेच्या उर्वरित याद्या लवकरच जाहीर होणार

मुंबई : राज्य शासनाच्या महत्त्वाकांक्षी 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६' अंतर्गत पात्र शेतकऱ्यांची पहिली यादी जाहीर करण्यात आली आहे. उर्वरित पात्र शेतकऱ्यांच्या याद्याही लवकरच प्रसिद्ध करण्यात येणार आहेत. ज्या शेतकऱ्यांची नावे जाहीर झालेल्या यादीत नाहीत, त्यांनी घाबरून जाऊ नये, असे आवाहन सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी केले आहे. सहकार मंत्री बाबासाहेब पाटील म्हणाले की, या योजनेअंतर्गत राज्यातील सुमारे ५६ लाख पात्र शेतकऱ्यांना कर्जमुक्ती आणि प्रोत्साहनपर लाभ मिळणार आहे. पात्र शेतकऱ्यांनी ॲग्रीस्टॅकवर नोंदणी करून आधार प्रमाणीकरणाची प्रक्रिया तातडीने पूर्ण करावी. आतापर्यंत १६ लाख ९६ हजार पात्र शेतकऱ्यांची कर्जमुक्तीची पहिली यादी जाहीर करण्यात आली आहे. यामध्ये ७.०३ लाख शेतकरी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांचे, तर ९.९३ लाख शेतकरी व्यापारी व राष्ट्रीयकृत बँकांचे असून, एकूण ₹१३,३३६ कोटींच्या कर्जमुक्तीचा समावेश आहे. योजनेतील पात्र लाभार्थ्यांची यादी संबंधित बँकांनी महाआयटीने विकसित केलेल्या पोर्टलवर अपलोड केली.

### मराठा आरक्षण कक्ष पूर्ण क्षमतेने कार्यान्वित करा

मुंबई, दि. २९ : मराठा आरक्षण कक्षाचे कामकाज अधिक गतिमान आणि प्रभावी करण्यासाठी पुढील सात दिवसांमध्ये आवश्यक अधिकारी व कर्मचाऱ्यांची पदे भरून हा कक्ष पूर्ण क्षमतेने कार्यान्वित करण्याचे निर्देश जलसंपदा मंत्री (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) तथा मराठा आरक्षण उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे-पाटील यांनी दिले. मराठा समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक स्थितीबाबत तसेच इतर संलग्न बाबींवरील शिफारशींच्या अंमलबजावणीचा आढावा घेण्यासाठी मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळ उपसमितीची बैठक झाली. बैठकीस उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील, सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्यासह विविध विभागाचे सचिव तसेच वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. या बैठकीत मराठा समाजाशी संबंधित प्रलंबित विषय आणि शैक्षणिक सवलती व सोयी-सुविधांबाबतचा आढावा घेवून अंमलबजावणीबाबत कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले. मराठा समाजातील विद्यार्थ्यांना इतर मागासवर्गीय (ओबीसी) विद्यार्थ्यांप्रमाणे सर्व शैक्षणिक सवलती व सोयी-सुविधा देण्याबाबत सामान्य प्रशासन विभागाच्या ५ जून २०२६ च्या शासन निर्णयाची सर्व संबंधित प्रशासकीय विभागांनी विनाविलंब व तात्काळ अंमलबजावणी करावी, असे स्पष्ट निर्देश मंत्री विखे-पाटील यांनी दिले.

## थोडक्यात पण महत्वाचे



### सर्वसामान्य, गरजूंसाठी मेहनत घेवून पारदर्शकतेने काम करू या : बावनकुळे

**भिवंडी : दैनिक संध्या**

शासन आणि प्रशासन हे सर्वसामान्यांचे लोकसेवक आहेत. त्यामुळे सर्वसामान्य गरजूंसाठी मेहनत घेऊन पारदर्शकतेने काम करू या,असे प्रोत्साहनात्मक उद्गार महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज येथे काढले. जिल्हाधिकारी कार्यालयात महसूल मंत्री श्री.बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली महसूल, भूसंपादन, मुद्रांक शुल्क व नोंदणी विभागाची आढावा बैठक पार पडली, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी आमदार किसन कथोरे, निरंजन डावखरे, माधवी नाईक, विक्रांत पाटील, कुमार आयलानी, जितेंद्र आव्हाड, विभागीय आयुक्त रुबल अग्रवाल, जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ,अपर जिल्हाधिकारी हरिश्चंद्र पाटील, निवासी उपजिल्हाधिकारी डॉ.संदीप माने, जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख नितीन पाटील यांच्यासह जिल्ह्यातील सर्व उपजिल्हाधिकारी, प्रांताधिकारी, तहसिलदार, मुद्रांक अधीक्षक उपस्थित होते. सुरुवातीस जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी विषयनिहाय महसूल मंत्री महोदयांना संगणकीय सादरीकरणाद्वारे जिल्ह्यातील महसूल विभागाचा कामकाज आढावा सादर केला. याबाबत श्री.बावनकुळे यांनी उपस्थित अधिकाऱ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, हे शासन सर्वसामान्यांसाठी काम करणारे शासन आहे. प्रशासन म्हणून आपली नैतिक जबाबदारी आहे की शेवटच्या घटकापर्यंत आपले शासकीय लाभ पोहोचायला हवेत. आपण लोकांचे सर्व प्रकारे रक्षक बनले पाहिजे. आपले काम पारदर्शकपणे मानवी संवेदना जागृत ठेवून करावे. अनावधानाने झालेली चूक निश्चित क्षमापित केली जाईल मात्र विशिष्ट हेतूने, निष्काळजीपणाने, बेफिकीरपणाने केलेली चूक कदापि माफ केली जाणार नाही तर त्याबाबत संबंधिताला कठोरात कठोर शासन मात्र नक्कीच केले जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. जिल्ह्यातील रस्त्यांची मोजणी, रस्त्यांचे सीमांकन आधी प्रकारची कामे 26 जानेवारी 2017 पर्यंत कोणत्याही परिस्थितीत पूर्ण करावीत, असे निर्देशही त्यांनी जिल्हा प्रशासनाला दिले आहेत. जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ हे राज्यातील सर्वोत्कृष्ट पाच जिल्हाधिकाऱ्यांपैकी एक असल्याचे नमूद करून त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांचे अभिनंदन केले, त्यामुळे भविष्यातही ठाणे जिल्ह्यात अधिकाधिक चांगली, लोकाभिमुख, नाविण्यपूर्ण कामे होतील,असा विश्वासही व्यक्त केला.



### भिवंडी तालुक्यातील जेष्ठ नागरिकांना मोफत अन्न धान्य किट वाटप

**भिवंडी : दैनिक संध्या**

मौजे भिनार ता भिवंडी जि ठाणे येथे जनकल्याण आदिवासी सामाजिक संस्थेच्या वतीने भिवंडी तालुक्यातील १५० जेष्ट नागरिकांना मोफत अन्न धान्य किट रोजच्या वापरातील(तांदूळ,साखर तेल कडधान्य व इतर) अशा जीवनावश्यक वस्तूंचे वाटप करण्यात आले या वेळी उपस्थित जनकल्याण आदिवासी सामाजिक संस्थापक अध्यक्ष तथा आदिवासी सेवक महाराष्ट्र शासन श्री महादेव घाटाळ ,श्रमिक मोर्चा ठाणे जिल्हा अध्यक्ष श्री मंदार घाणेकर भिनार ग्राम पंचायत सरपंच श्री भरत घाटाल शिवसेना महिला आघाडी उप तालुका प्रमुख सौ शोभा जाधव चिंबीपाडा ग्रामपंचायत आदिम आधार आदिवासी ग्रामीण पतसंस्था संचालक श्री सुरेश जाधव मा सरपंच तथा सदस्या सौ लता डवला सोनाले ग्रामपंचायत मा उप सरपंच श्री अनिल भेकरे इतर पदाधिकारी व कार्यकर्ते जेष्ठ नागरिक यांच्या उपस्थित धान्य वाटप कार्यक्रम करण्यात आला.

# गुन्ह्यांच्या तपासासाठी सक्षम तपास कार्यप्रणालीची गरज

## सायबर गुन्हेगारी तपास यंत्रणेतील तज्ज्ञांचे मत : ‘इन्व्हेस्टीगेशन मास्टरक्लास’चा तिसरा दिवस

■ पुणे (दै. संध्या)

तंत्रज्ञान ज्याप्रमाणे बदलत आहे त्याप्रमाणे गुन्ह्यांची व्याप्ती आणि प्रकार बदलत आहेत. पारंपारिक पद्धतीने गुन्हे होण्याऐवजी आता घरबसल्या स्मार्टफोन वापरून फसवणुकीपासून ते देशाच्या सुरक्षिततेला धोका निर्माण होईल इतके गंभीर गुन्हे होत आहेत. त्यामध्ये केवळ साधन म्हणून स्मार्टफोनचा वापर केला जातो. अशावेळी जेव्हा गुन्हा करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर होतो, तेव्हा गुन्ह्याचा तपास करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञान गरजेचे आहे. डिजिटल गुन्ह्यांच्या तपासासाठी सायबर साक्षरता ही गरजेची आहे, असे मत सायबर गुन्हेगारी तपास यंत्रणेतील तज्ज्ञांनी व्यक्त केले.

ट्रान्सेडेंटल टेक्नॉलॉजीज, तंत्रज्ञान विभाग - सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, यांच्या संयुक्त विद्यमाने पुनीत बालन ग्रुपच्या सहकार्याने पुणे विद्यापीठाच्या जिऑलॉजी विभागामध्ये आयोजित करण्यात आलेल्या 'इन्व्हेस्टीगेशन मास्टरक्लास' सायबर सुरक्षा संदर्भातील कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये सायबर क्षेत्रातील गुन्हेगारी तपास यंत्रणांमधील तज्ज्ञांनी सायबर आणि डिजिटल गुन्ह्यांचा तपास करण्यासाठी आवश्यक तंत्रांची माहिती दिली. ट्रान्सेडेंटल टेक्नॉलॉजीजचे प्रमुख डॉ. केतन अत्रे यावेळी उपस्थित होते.



यावेळी बोलताना सोनल कामल म्हणाल्या, डिजिटल स्वरूपामध्ये गुन्हा घडल्यानंतर ज्या ठिकाणी गुन्हा घडला आहे, त्या ठिकाणी असणाऱ्या पुराव्यांमध्ये कोणत्याही प्रकारची छेडछाड करता कामा नये. त्या ठिकाणी असलेल्या कॉम्प्युटर, हार्ड डिस्क, पेन ड्राईव्हपासून ते विविध प्रकारच्या वायर, राउटर यांच्यापर्यंत विविध मशीन योग्य प्रकारे हस्तगत करणे गरजेचे आहे. ज्यावेळी कॉम्प्युटर जप्त करण्यात आला आहे, तो कॉम्प्युटर जसाच्या तसा तपासासाठी हस्तगत करणे गरजेचे आहे, त्यामध्ये कोणत्याही प्रकारची छेडछाड झाली तर तपास करताना अडथळे निर्माण होऊ शकतात. युगल पाठक म्हणाले, गुन्ह्यांसाठी वापरण्यात आलेले मोबाईल फोन हस्तगत केल्यानंतर अली टूल , एडीबी, प्लॅटफॉर्म टूल अशा प्रकारच्या टूल्सचा वापर करून मोबाईल हिस्टरी जाणून घेता येते. मोबाईल हस्तगत केल्यानंतर तो पूर्णतः नेटवर्क फ्री करण्यासाठी तो अॅल्युमिनियम फाईलमध्ये गुंडाळला जाणे गरजेचे आहे, तरच तो मोबाईल कोणत्याही नेटवर्कमध्ये येऊ शकत नाही आणि त्यामध्ये पुन्हा छेडछाड करणे शक्य होणार नाही.

दिल्ली पोलिसांच्या क्राईम विभागातील वरिष्ठ वैज्ञानिक अधिकारी डॉ. दृष्टी भूपतानी यांनी गुन्हेगारी घटनास्थळ तपासणी (Crime Scene Investigation) विषयावर अत्यंत प्रभावी व प्रात्यक्षिक सत्र घेतले. त्यांनी प्रत्यक्ष गुन्हेगारी घटनास्थळाची निर्मिती करून शस्त्रे व इतर पुरावे दाखवत पुरावे ओळखणे, संकलित करणे व जतन करण्याच्या शास्त्रीय पद्धतींचे मार्गदर्शन केले. हे सत्र सहभागींसाठी अत्यंत ज्ञानवर्धक व उत्स्फूर्त ठरले. सीमा सुरक्षा दल (BSF), गृह मंत्रालय (MHA) येथील सेकंड-इन-कमांड श्री. संजय शर्मा यांनी दहशतवादी वित्तपुरवठा (Counter Terror Financing) व मनी लॉन्डरिंग प्रतिबंध (Anti-Money Laundering) या विषयावर अत्यंत प्रभावी व संवादात्मक सत्र घेतले. दहशतवादी संघटनांच्या आर्थिक जाळ्याची कार्यपद्धती, निधीचा मागोवा घेण्याच्या पद्धती आणि तपासातील महत्त्वाच्या बाबी त्यांनी उदाहरणांसह उलगडून सांगितल्या. हे सत्र सहभागींसाठी अत्यंत ज्ञानवर्धक, रंजक आणि प्रेरणादायी ठरले. संजय शर्मा यांनी टेररिस्ट फायनान्सिंग अँड मनी लॉन्ड्रीग, उदित शर्मा यांनी इन्वेस्टीगेटिंग सायबर क्राईम्स , फलिंदर डी एम यांनी इन्वेस्टीगेटिव्ह फिंगरप्रिंट अँड हॅन्ड रायटिंग डॉक्युमेंट्स या संदर्भात या कार्यशाळेमध्ये मार्गदर्शन केले.

## मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रमास मुदतवाढ; सुधारित वेळापत्रक जाहीर

■ पुणे (दै. संध्या)

भारत निवडणूक आयोगाने मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरिक्षण (Special Intensive Revision) कार्यक्रमाचे सुधारित वेळापत्रक जाहीर केले असून, राज्यातील काही भागात झालेल्या मुसळधार पावसामुळे पुनरिक्षणाच्या कामावर झालेल्या परिणामाची दखल घेत ही मुदतवाढ देण्यात आली आहे. कोकण, मुंबई तसेच राज्यातील काही भागात झालेल्या अतिवृष्टीमुळे विशेष सखोल पुनरिक्षणाच्या कामकाजावर परिणाम झाला होता. या पार्श्वभूमीवर कार्यक्रमातील मुदत वाढविण्याची विनंती राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांमार्फत भारत निवडणूक आयोगाकडे करण्यात आली होती. त्यानुसार आयोगाने सुधारित कार्यक्रम जाहीर केला आहे. सुधारित वेळापत्रकानुसार मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (BLO) यांच्याकडून गृहभेटींचा कालावधी ३० जून ते ८ ऑगस्ट २०२६ असा राहणार आहे. मतदान केंद्रांचे सुसूत्रीकरण व पुनर्रचनेचे कामही ८ ऑगस्टपर्यंत पूर्ण करण्यात येणार आहे.

## अमानुष लाठी चार्ज प्रकरणाबाबत आजाद समाज पार्टीचे आंदोलन

■ नांदेड (दै. संध्या)

दिल्ली येथील निष्पाप विद्यार्थ्यावर मोदी प्रेमी दिल्ली पोलीस प्रशासनाने सरकार बेकायदेशीर आदेश घेवून लाठी चार्ज केलेल्या प्रकरणाचा निषेध आझाद समाज पार्टी व भीम आर्मीच्या वतीने प्रा. प्रभाकर वाघमारे जिल्हा प्रभारी नांदेड येथे यांच्या नेतृत्वाखाली जिल्हाधिकारी कार्यालया समोर आंदोलन करण्यात आले. वरील घटनेचा,केंद्र शासनाचा व महाराष्ट्र शासनाचा निषेध नोंदवण्यात आला आणि त्या निवेदन देवून त्यामध्ये केंद्रीय शिक्षण मंत्री,पंतप्रधान, गृहमंत्री व इतर दोषींनी तात्काळ राजीनामा द्यावा व निष्पाप




विद्यार्थ्यांवर जे खोटे गुन्हे दाखल केले ते मागे घ्यावेत.जे विद्यार्थी या देशाचे भविष्य आहेत अशा पिढीवर लाठी चार्ज करून त्यांना दडप शाहित घेण्याचे काम केंद्र शासनाने केले असून त्या शासनाचा निषेध आजाद समाज पार्टीच्या माध्यमातून आणि भीम आर्मी च्या वतीने करण्यात आला आहे. या आंदोलनासाठी आजाद समाज पार्टीच्या महिला जिल्हा प्रभारी सौ.संध्याताई कांबळे यांनी महत्त्वाची भूमिका बजावली असून कार्यक्रमासाठी पार्टीचे जिल्हाध्यक्ष विनायक लोहकरे,नांदेड दक्षिण जिल्हाध्यक्ष किरण सदावर्ते,जिल्हा महासचिव गंगाधर गंगासागर,लोहा कंधार विधानसभा अध्यक्ष नामदेव बुद्धे,नांदेड उत्तर विधानसभा अध्यक्ष नागेश वाघमारे,भोकर विधानसभा अध्यक्ष संतोष लोखंडे, नांदेड दक्षिणचे बाजीराव धोंगडे, गोविंद चाटशे,संतोष गाडे आनंदराव गाडे,आशिष लोखंडे, पवन वाघमारे,भीम आर्मीचे जिल्हाध्यक्ष स्वप्नील भोसीकर, देवानंद जोंधळे आदिंच्या निवेदनावर सह्या आहेत.

## निवासी मुकबधिर विद्यालय येथे अजितदादांची जयंती साजरी

■ कऱ्हावागज (दै. संध्या)

दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना अभिवादन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.कार्यक्रमाच्या सुरुवातीला अनंतराव गायकवाड यांनी सर्व पाहुण्यांचे स्वागत केले.निवासी मुकबधिर विद्यालय कऱ्हावागज येथे प्रथमतः स्वच्छता करण्यात आली.

विद्यालयाच्या अध्यक्षा रामेश्वरी जाधव यांनी विद्यालयाची प्राथमिक माहिती दिली. यानंतर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून श्री. रामदास चव्हाण यांना निवडण्यात आले. अनुमोदन श्री.हरिभाऊ जाधव यांनी दिले. प्रास्ताविक श्री.कैलास शिंदे यांनी केले. यानंतर दिव्यांग विद्यार्थ्यांना काही खुणा




करून काही तोंडी माहिती सांगण्यात आली.तसेच दिव्यांग विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले व ट्रॉफी आणि सर्टिफिकेट देण्यात आले.हे सर्व विद्यार्थी गुणवंत होते.तसेच बारामती दौंड इंदापूर इत्यादी तालुक्यातून काही कार्यकर्ते आलेले होते.चांगल्या कार्यकार दिव्यांग कार्यकर्त्यांना ट्रॉफी देऊन गौरव करण्यात आले.तसेच प्रमुख पाहुणे श्री.नंदकुमार फुले यांनी काही माहिती विद्यार्थ्यांना सांगितली. तसेच काही कायदेविषयक माहिती प्रहारचे रामदास चव्हाण यांनीही सांगितली व सर्वांना मार्गदर्शन केले.या कार्यक्रमाचे नियोजन कैलास शिंदे,दत्तात्रय शिंदे व हरिभाऊ जाधव यांनी केले होते. कार्यक्रमाला विशेष उपस्थिती म्हणून पुणे जिल्ह्याचे कार्याध्यक्ष श्री.गणेश शेडगे व प्रथमेश बनसोडे उपस्थित होते. या कार्यक्रमासाठी लहू भिलारे, सुनील जाधव, मिलिंद साळवे, विजयराव थोरात, संग्राम जाधव, गायकवाड, सुभाष इंगोले बाळासाहेब जामदार उपस्थित होते. नंतर हरिभाऊ जाधव यांनी आभार मानले.

## (SIR) : एन्युमरेशन फॉर्म भरण्याची मुदत ८ ऑगस्टपर्यंत वाढविली

■ पुणे (दै. संध्या)

भारत निवडणूक आयोगाने मतदार यादीच्या विशेष संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रमांतर्गत एन्युमरेशन फॉर्म भरण्याची मुदत ८ ऑगस्ट २०२६ पर्यंत वाढविली आहे. त्यामुळे २१४ पुणे कँटोन्मेंट विधानसभा मतदारसंघातील सर्व पात्र मतदारांनी आपला एन्युमरेशन फॉर्म तातडीने भरून घ्यावा, असे आवाहन मतदार नोंदणी अधिकारी सिद्धार्थ भंडारे यांनी केले आहे. मतदारांनी एन्युमरेशन फॉर्म ऑफलाईन पद्धतीने संबंधित मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांच्याकडे किंवा ऑनलाईन पद्धतीने voters.eci.gov.in या संकेतस्थळावर भरावा. तसेच फॉर्म भरण्याबाबत कोणतीही अडचण अथवा अधिक माहितीसाठी संबंधित मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांच्याशी तात्काळ संपर्क साधावा. मुदतीत एन्युमरेशन फॉर्म न भरल्यास संबंधित मतदाराचे नाव प्रारूप मतदार यादीत समाविष्ट होणार नाही. त्यामुळे सर्व पात्र मतदारांनी अंतिम मुदतीची वाट न पाहता तातडीने एन्युमरेशन फॉर्म भरून विशेष संक्षिप्त पुनरिक्षण प्रक्रियेत सहभागी व्हावे, असे आवाहनही मतदार नोंदणी अधिकारी श्री. भंडारे यांनी केले आहे.

# ठाण्याला नवीन अतिरिक्त जिल्हाधिकारी कार्यालयासह दोन तहसील कार्यालय होणार

ठाणेकरांच्या मालमत्ता आणि हक्क सुरक्षेसाठी शासन कटिबद्ध : छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान लोकाभिमुख आणि गतिमान कारभाराचे उत्तम उदाहरण : महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे

### ठाणे जिल्ह्यातील तब्बल ७६ हजार कुटुंबांना शासकीय योजनांचा थेट लाभ देण्यात यश

■ भिवंडी (दै. संध्या)

‘छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत समाधान शिबिराच्या माध्यमातून ठाणे जिल्ह्यातील तब्बल ७६ हजार कुटुंबांना शासकीय योजनांचा थेट लाभ देण्यात यश आले असून, हे अभियान लोकाभिमुख आणि गतिमान कारभाराचे उत्तम उदाहरण ठरले आहे, असे प्रतिपादन राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज येथे केले.

त्याबरोबरच ठाण्याला नवीन अतिरिक्त जिल्हाधिकारी कार्यालय आणि दोन नवीन तहसील कार्यालय देखील होणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस महोदयांचा जन्मदिवस आणि माजी उपमुख्यमंत्री स्वर्गीय अजित दादा पवार यांच्या जयंतीचे औचित्य साधून राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या संकल्पनेतून आणि ठाणे जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांच्या पुढाकारातून ठाण्यातील गडकरी रंगायतन समोरील शिवसमर्थ विद्यालयात आज आयोजित ‘छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिराच्या कार्यक्रमात ते बोलत होते.

यावेळी आमदार संजय केळकर, आमदार मंदाताई म्हात्रे, आमदार निरंजन डावखरे, आमदार विक्रांत पाटील, आमदार माधवी नाईक, आमदार रविंद्र फाटक, आमदार किसन कथोरे, आमदार कुमार आयलानी, ठाणे महानगरपालिकेचे उपमहापौर कृष्णा पाटील, जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी रणजीत यादव, अपर जिल्हाधिकारी हरिश्चंद्र पाटील, निवासी उपजिल्हाधिकारी डॉ. संदिप माने यांच्यासह सर्व उपजिल्हाधिकारी, प्रांताधिकारी, तहसिलदार, अॅड. संदीप लेले यांच्यासह विविध विभागाचे पदाधिकारी आणि मोठया संख्येने नागरीक उपस्थित होते.

महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे कार्यक्रमस्थळी जल्लोषात स्वागत करण्यात आले. कार्यक्रमस्थळी प्रवेश केल्याबरोबर त्यांनी विविध शासकीय स्टॉल्सला भेट देऊन पाहणी केली. त्यानंतर महसूल मंत्री श्री. बावनकुळेंसह उपस्थित मान्यवरांनी छत्रपती शिवाजी महाराज आणि माजी उपमुख्यमंत्री स्वर्गिय अजितदादा पवार यांच्या प्रतिमांना पुष्प अर्पण करुन अभिवादन केले.

महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी ठाणे जिल्हा प्रशासन आणि जिल्हाधिकाऱ्यांच्या नियोजनबद्ध कामाचे विशेष अभिनंदन केले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसाच्या औचित्याने राबविण्यात आलेल्या या सेवा उपक्रमात महसूल खात्यासह महिला व बालविकास, क्रीडा, आरोग्य, कृषी, पशुसंवर्धन आणि आदिवासी विकास अशा सर्वच विभागांनी एकत्र येत राज्यात १० लाख कुटुंबांना लाभ देण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. यात ठाणे जिल्ह्याने अव्वल कामगिरी केली असून आमदार संजय केळकर यांनी एकट्या आपल्या मतदारसंघात ८ हजार कुटुंबांना लाभ मिळवून दिला, तर भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या पुढाकाराने रक्तदान शिबिराचे यशस्वी आयोजन करण्यात आले, असे महसूल मंत्री श्री.बावनकुळे यांनी नमूद केले.

महसूल मंत्री श्री. बावनकुळे यांनी यावेळी ठाणे आणि पालघर परिसरासाठी शासनाने घेतलेल्या अनेक महत्त्वाच्या निर्णयांची माहिती दिली. कल्याण-अंबरनाथ भागात कृषी उत्पन्न बाजार समिती व मल्टी-मॉडेल हब उभारणीसाठी, तसेच वाढवण बंदराला जोडणाऱ्या प्रकल्पांसाठी महसूल विभागाने मोफत जमीन उपलब्ध करून दिली आहे. याशिवाय पर्यावरण रक्षणासाठी ७३.७३ एकर जागा कांदळवनासाठी, ठाण्यात अॅग्री-युनिट व कन्व्हेन्शनल सेंटर, बीएसएनएलच्या ६० टॉवर्ससाठी जमीन, अंबरनाथ येथे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नवोदय विद्यालय, तसेच मीरा-भाईंदर येथे एमटीपी प्लांट व कोस्टल रोडसाठी २५ एकर जागा देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. मीरा-भाईंदरमधील ३१८ एकर व पिंपरी येथील १३ एकर जमिनीला 'वर्ग-२' चा दर्जा देऊन झोपडपट्टी विकास व शासकीय जमिनींचे संरक्षण करण्यात आले असून,२६८ कर्मचाऱ्यांचा अनुकंपातत्त्वावर भरतीचा प्रश्नही निकाली काढण्यात आला आहे.



नागरिकांना दिलासा देणाऱ्या कायदेशीर निर्णयांवर प्रकाश टाकताना श्री. बावनकुळे यांनी सांगितले की, बिगरशेती (NA) परवानग्यांची अट पूर्णपणे रद्द करण्यात आली असून तुकडेबंदी कायदा मागे घेण्यात आला आहे. यामुळे १५ ऑक्टोबर २०२३ पूर्वी ठाण्यात बांधण्यात आलेल्या लहान प्लॉट्सवरील सुमारे १ लाख कुटुंबांना कायदेशीर हक्क मिळणार आहेत. तसेच १ जानेवारी २०११ पूर्वी शासकीय जागांवर असलेल्या सर्व घरांना पट्टे वाटप करून ते नियमित केले जाणार आहेत. येत्या डिसेंबरच्या अधिवेशनात राज्यातील सर्व फ्लॅटधारकांना हक्काचे 'प्रॉपर्टी कार्ड' देण्याचा आणि जगातील अत्याधुनिक 'लँड टायटलिंग कायदा' (Land Titling Act) मंजूर करण्याचा ऐतिहासिक निर्णय शासन घेणार आहे. यामुळे डिजिटल चिपयुक्त स्मार्ट प्रॉपर्टी कार्ड मिळेल आणि जमिनीची १५ दिवसांत मोजणी, नोंदणी व म्युटेशन ही प्रक्रिया अत्यंत पारदर्शक व सुलभ होईल, असा विश्वास महसूल मंत्री श्री. बावनकुळे यांनी यावेळी व्यक्त केला.

महसूल मंत्री श्री. बावनकुळे यांनी यावेळी या शिबिरास उपस्थित नागरिकांच्या अडचणी, तक्रारी, समस्यांची लेखी निवेदने स्वीकारली आणि त्यांच्या निवेदनांवर त्वरीत कार्यवाही करण्याचे संबंधितांना आदेश दिले.

आमदार संजय केळकर यांनी संपूर्ण राज्यात आणि ठाण्यात ‘महाराजस्व अभियान’ यशस्वीपणे राबवल्याबद्दल महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या संकल्पाचे तसेच जिल्हाधिकारी व महसूल प्रशासनाच्या प्रयत्नांचे विशेष कौतुक केले. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली सुरू झालेल्या लोककल्याणकारी योजनांचा लाभ तळागाळातील प्रत्येक नागरिकापर्यंत पोहोचवणे हेच महायुती सरकारचे मुख्य ध्येय असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

या शिबिरात उभारण्यात आलेल्या २० हून अधिक स्टॉल्सचा आणि विविध शासकीय सेवांचा लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वांनी जास्तीत जास्त फायदा घ्यावा, असे आवाहनही त्यांनी आपल्या भाषणातून केले. आमदार मंदाताई म्हात्रे यांनी 'महाराजस्व अभियाना'च्या माध्यमातून शासकीय सेवा जनतेच्या दारात आणल्याबद्दल आणि प्रकल्पग्रस्तांचे प्रलंबित प्रश्न सोडवल्याबद्दल महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे आभार मानले. या अभियानामुळे महसूल प्रशासन अधिक जागृत व गतिमान झाले असल्याचे सांगत, त्यांनी नवी मुंबईतील नागरिकांसाठी १५ ऑगस्टनंतर असेच भव्य शिबिर आयोजित करण्याची मागणी केली.

आमदार निरंजन डावखरे यांनी ब्रिटिशकालीन क्लिष्ट महसुली कायद्यांमध्ये अमूलाग्र बदल करून ते लोकहितार्थ सुलभ केल्याबद्दल महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे कौतुक केले. 'महाराजस्व अभियाना'च्या माध्यमातून समाजातील शेवटच्या घटकापर्यंत (अंत्योदय) योजनांचे लाभ पोहोचत असून, या शिबिरासाठी अहोरात्र मेहनत घेणाऱ्या महसूल अधिकाऱ्यांच्या तत्परतेचा त्यांनी विशेष गौरव केला. आमदार विक्रांत पाटील यांनी बिगरशेती (NA) मंजुरी रद्द करणे, शेत-रस्ते अतिक्रमणमुक्त करणे आणि २०११ पूर्वीची बांधकामे नियमित करणे यांसारख्या ऐतिहासिक महसुली निर्णयांबद्दल महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे कौतुक केले. 'महाराजस्व अभियाना'च्या माध्यमातून मंत्रालयातील योजना थेट जनतेच्या दारात आणून एकाच छताखाली हजारो लाभार्थ्यांना तात्काळ लाभ मिळवून दिल्याबद्दल त्यांनी आभार व्यक्त केले.

आमदार माधवी नाईक यांनी आपल्या भाषणात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे कौतुक करताना सांगितले की, राज्य सरकारने राबवलेल्या विविध लोककल्याणकारी योजनांमुळे महिलांना सक्षम आणि स्वावलंबी बनविण्याचे मोठे काम झाले आहे. छत्रपती शिवाजी महाराजांप्रमाणेच हे रयतेचे राज्य असल्याचे सांगत, सर्व लाभार्थ्यांनी या योजनांची माहिती अधिक लोकांपर्यंत पोहोचवून राज्य सुजलाम सुफलाम करण्यासाठी सहभाग नोंदवावा, असे आवाहनही त्यांनी केले.

ठाणे जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी प्रास्ताविकात, ‘छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियाना’च्या पहिल्या टप्प्यात 76 हजार लाभार्थ्यांना लाभ दिल्याचे सांगत आदिवासी बांधवांना हक्काचा ७/१२ देण्याचा आणि ५ ब्रास मोफत रेती वाटपाचा निर्णय प्रभावीपणे राबवल्याचे स्पष्ट केले.

जिल्ह्यातील सर्व १८ विधानसभा मतदारसंघांत हे अभियान यशस्वीपणे राबवून महसुली प्रक्रिया सुलभ व पारदर्शक करण्यावर प्रशासनाचा भर असल्याचे त्यांनी नमूद केले. यावेळी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे आणि उपस्थित मान्यवरांच्या हस्ते 'सामाजिक अर्थसहाय्य योजना', 'वनहक्क कायदा' आणि 'गौण खनिज नियम' या तीन महत्त्वपूर्ण माहिती पुस्तकांचे प्रकाशन करण्यात आले.